ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४२ | अंक १२ | पाने ५६ | जुलै २०१५ | मूल्य १० रु.

## आंतरराष्ट्रीय संबंधात भविष्यातील नवी धोरणे

आर्थिक विकासासाठी भारताची आर्थिक मुत्सद्देगिरी
– राम उपेंद्र दास

भारताची आंतरराष्ट्रीय व्यापारातील दूरदृष्टीता
– डॉ. नितिन ज्ञा. चौधरी

भारत-चीन संबंध युद्धापेक्षा विकास बरा
– भावना गोखले

(विशेष लेख)
बहुराष्ट्रीयतेची माघार, प्रादेशिक सहकार्याची आगेकूच ?
– दिलीप सिन्हा



(फोकस)
मोदी सरकारचे पहिले वर्ष : परराष्ट्र संबंधात संरक्षणाची महत्वाची भूमिका
– अशोक बन्सल









मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी , केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक १२ ❖ ❖ जुलै २०१५ ❖ ❖ मूल्य १० रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कांचल**

संपादक
**भावना गोखले**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | |
|---|---|
| **वार्षिक** | : रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ७३० |


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **भारत आणि शेजारील राष्ट्रे : पुनरुर्जीवितासाठी रेटा - एक नवीन दिशा** | - अचल मल्होत्रा | ५ |
| **भारताची आंतरराष्ट्रीय व्यापारातील दूरदृष्टीता** | - डॉ. नितिन ज्ञा. चौधरी | ११ |
| **आर्थिक विकासासाठी भारताची आर्थिक मुत्सद्देगिरी** | - राम उपेंद्र दास | १९ |
| **भारत-चीन संबंध - युद्धापेक्षा विकास बरा** | - भावना गोखले | २८ |
| **बहुराष्ट्रीयतेची माघार, प्रादेशिक सहकार्याची आगेकूच ? (विशेष लेख)** | - दिलीप सिन्हा | ३४ |
| **मोदी सरकारचे पहिले वर्ष: परराष्ट्र संबंधात संरक्षणाची महत्वाची भूमिका** | - अशोक बन्सल | ३९ |
| **दूरवैद्यक आणि आरोग्य विकास** | - डॉ. सुजाता वॉरियर | ४४ |



योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

## भारताची प्रगतीकडे वाटचाल

एखाद्या देशाची स्थिती व नियती ही लष्करी इच्छाशक्तीपेक्षाही त्या देशाने राजनैतिक पातळीवर केलेल्या कामगिरीवर अवलंबून असते, असे आंतरराष्ट्रीय संबंधातील तज्ज्ञांचे मत आहे. हे विधान हे भारताच्या बाबतीत विशेषत्त्वाने खरे आहे. एक देश म्हणून आपल्या राष्ट्रभिमानाचे नेहमीच सर्वांकडून कौतुक होत आले आहे. भारताची आंतरराष्ट्रीय ओळख ही शांतताप्रेमी देश म्हणून आहे, त्याचवेळी आपला सीमेवर लढणाऱ्या वर्दीतील जवानांनाही सलामच आहे. पण त्याच्या जोडीला राजनैतिक पातळीवर जे काम होते आहे त्याकडे आतापर्यंत दुर्लक्ष केले जात होते पण आता त्यात बदल घडत आहे. मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमे भारतीय राजनीतीची यशोगाथा सांगत आहेत. जरी त्यांना राजनीतीमधील गुंतागुंतीच्या संकल्पना माहिती नसल्या तरी राजनैतिक प्रयत्न कसे चालू आहेत व त्याचे फायदे देश घडवण्यासाठी कसे मिळत आहेत याची पुरेपूर जाणीव त्यांना आहे.

उदारीकरण व जागतिक व्यापारातील बदलते प्रवाह यांनी भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधात मोठा बदल घडवून आणला आहे. अंतर्मुख अर्थव्यवस्थेकडून आपण जागतिक एकात्म अर्थव्यवस्थेशी जुळवून घेणारे आहोत अशी भारताची प्रतिमा आंतरराष्ट्रीय पातळीवर होत आहे. अतिशय सावध व जपून पावले टाकत भारताने मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय पुढाकार घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या शपथविधीच्यावेळी सार्क देशांच्या प्रमुखांना निमंत्रित केले होते. तज्ज्ञांनी त्याचे वर्णन हे राजनैतिक बंड केले होते. पंतप्रधानांनी नंतरच्या काळात म्हणजे एक वर्षभरात एकोणीस देशांना भेट दिली, त्यात विकसित व विकसनशील देशांचा समावेश होता, त्यांच्या या दौऱ्याने परराष्ट्र संबंधांचे नवे दालन खुले केले. वर्षभरात आपल्या शेजारसंबंधांना अधिक विस्तृत आयाम देण्यात आला. महत्वाच्या देशांशी सामरिक भागीदारी वाढवण्यात आली. नेपाळमध्ये मोठा भूकंप झाला त्यावेळी भारताने अजिबात वेळ न गमावता मदतीचा हात पुढे केला. भूकंपामुळे ढिगाऱ्यात अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी लष्करासह पथके पाठवून मदतकार्य केले. गेली अनेक वर्षे संयुक्त राष्ट्रांच्या शांतीसेनेच्या मोहिमात भारताने जास्तीत जास्त सहभाग घेऊन जागतिक पातळीवर मोठी कामगिरी केली आहे.

भारत हा आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या मंचावरचा दुसरा देश आहे, ज्याने जागतिक पातळीवरच्या संबंधांना उत्तेजना दिली. आताच्या प्रवाहानुसार जे देश काहीसे निद्रिस्त होते तेही भारताशी संबंध वाढवण्यात स्वारस्य दाखवू लागले आहेत. भारतात उच्च कुशलता असलेल्या मनुष्यशक्तीची कमी नाही त्यामुळे कुठलाही देश भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशांकडे दुर्लक्ष करू शकत नाही व भारत हा वाढती अर्थव्यवस्था असलेला देश चीनला मागे टाकत आहे किंबहुना आर्थिक विकास दरात भारताने चीनवर जवळपास मात केली आहे.

आर्थिक क्षेत्र, मानवी विकास व आंतरराष्ट्रीय संबंधात भारताने जी प्रगती केली आहे त्यामुळे जगाचे आपल्याकडे लक्ष आहे. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर संयुक्त राष्ट्रांनी २१ जून २०१५ हा दिवस योग दिन म्हणून साजरा करण्याचे मान्य केले. आता दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा होईल.

आंतरराष्ट्रीय समुदायाकडून असलेल्या आव्हानांना तोंड देण्याचा प्रयत्न भारताकडून चालू आहे, त्यासाठी सातत्याने प्रयत्न व धोरणात्मक पुढाकार हे मार्ग अवलंबले जात आहेत. १९४७ ते २०१५ दरम्यान भारताची ताकद वाढतच गेली आहे, नियतीने भारताला घडविण्याऐवजी भारताने त्याच्या नियतीला घडवले आहे व आंतरराष्ट्रीय सलोख्यात योग्य स्थान मिळवले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा मंडळात भारताला स्थायी सदस्यत्व मिळणे बऱ्याच काळापासून अपेक्षित आहे व ते स्थान भारताला मिळवून देणारा दिवस आता दूर नाही अशी आशा करू या.

# भारत आणि शेजारील राष्ट्रे : पुनरुज्जीवितासाठी रेटा – एक नवीन दिशा

**— अचल मल्होत्रा**




**सध्याची जागतिक अर्थव्यवस्था देशांमधील परस्पर संबंध, वाढती स्पर्धा, आणि स्वतःचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व आबाधित राहण्यासाठी प्रत्येक देश घेत असलेले परिश्रम बघता, असा प्रश्न पडतो की, सिमा प्रश्नांवरील न निघालेले तोडगे, परस्पर संबंधात निर्माण झालेली वाढती कटूता थोपविणे आवश्यक आहे. एकीकडे जागतिक व्यापारिकरण प्रक्रियेत उद्योगांद्वारे आर्थिक वृद्धी वाढविण्यावर जोर देण्याच्या प्रयत्नात आपण मुळतत्वांना विसरत चाललो का ? हा प्रश्न तर दुसरीकडे पुन्हा सुदृढ आंतरराष्ट्रीय संबंधांसाठी पुर्नरुजिवीतेसाठी रेटा देण्याच्या आपण प्रयत्नात आहोत. खरे काय ? पुर्नरुजीवन ही एक नवी दिशा ठरेल का ?**

२०१४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांनंतर एकस्थिर आणि भक्कम शासन नवी दिल्लीत स्थापन झाले. यातून संपूर्ण आंतरराष्ट्रीय समूहात, (यात शेजारीही आले) भारताच्या स्थानाला गांभीर्याने घेण्याचा संदेश मिळाला. आंतरराष्ट्रीय घडामोडींबाबत दिलेल्या आश्वासनानुसार पंतप्रधान मोदींनी मागील वर्षात एकंदर एकोणीस देशांना भेटी दिल्या आणि कितीतरी महत्वाच्या नेत्यांना नवी दिल्लीत आमंत्रण दिले. या सर्व प्रक्रियेत त्यांनी प्रादेशिक वा द्विपक्षीय किंवा अनेकपक्षीय पध्दतीने सर्व महत्वाच्या जागतिक नेत्यांशी विचारविनिमय केला.

विद्यमान सरकारच्या आत्तापर्यंतच्या मुत्सद्दी निर्णयांवरून 'शेजाऱ्यांना प्रथम प्राधान्य' हा विचार परराष्ट्रीय धोरणात प्रमुख आहे हे पुरेसे स्पष्ट होत आहे. श्री. मोदींनीं पंतप्रधान म्हणून शपथ घेण्याच्या आधीपासून शेजाऱ्यांशी सलोखा प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. पंतप्रधान मोदींच्या मागील वर्षी २६ मे ला झालेल्या शपथविधीचेनिमंत्रण सर्व सार्क देशांच्या राज्यप्रमुखांना दिले गेले. हे निमंत्रण एक सर्वोत्कृष्ट धडाडीचे पाऊल होते. भारतातील नवीन राजकीय परिस्थितीत दक्षिण आशियातील शेजारी राष्ट्रांशी संबंध आणि त्या प्रदेशाची एकात्मता याला महत्व आले आहे हा खणखणीत संदेश यातून दिला गेला.

या संपूर्ण प्रदेशातील राष्ट्रांचे प्रमुख, शासनप्रमुख यांच्या त्या समारंभातील उपस्थितीने भारताच्या सौहार्दाला तसाच प्रतिसाद देण्याच्या त्यांच्या इच्छेवर शिक्कामोर्तब झाले. हा प्रसंग म्हणजे प्राथमिक संपर्क प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने एक उत्तम संधी ठरली. त्याच्या पाठोपाठ प्रादेशिक आणि आंतराष्ट्रीय परिषदांच्या मिषाने अनेक भेटी आणि बैठकींची देवाणघेवाण झाली. पहिल्या वर्षात पंतप्रधानांनी ज्या देशांना भेटी दिल्या त्यात सार्क परिषदेतील सात राष्ट्रांपैकी चार देश भूतान, नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश आणि चीन हे देश होते. राजकीय, सुरक्षा आणि व्यूहात्मक स्थितीचा विचार करता कदाचित बाकीच्या तीन सार्क सदस्य राष्ट्रांच्या भेटीची आखणी करायला कदाचित काही वेळ जावा लागला. या दरम्यान अफगणिस्तानच्या राष्ट्राध्यक्षांनी एप्रिलमध्ये भारतास भेट दिली आणि पंतप्रधान मोदींनी त्यांच्या नवी दिल्लीतील शपथविधी प्रसंगी पाकिस्तान आणि मालदिवच्या पंतप्रधानांशी गाठभेट घेतली, थोडक्यात एका वर्षाच्या कालावधीत पंतप्रधान आपल्या शेजारी राष्ट्राच्या सर्व प्रमुखनेत्यांशी किमान एकदा किंवा क्वचित त्याहून जास्तवेळा भेटले.

भारताचे या भागातील विशिष्ट देशांशी नातेसंबंध कसे आकाराला येत आहेत याचा विचार करण्यापूर्वी दक्षिण

आशियाकडे एक विभाग म्हणून दृष्टीक्षेप टाकावा लागेल. कमीत कमी शब्दात बोलावयाचे तर तो गुंतागुंतीचा विभाग आहे. या प्रदेशातील देशांना समान वारसा आणि ऐतिहासिक दुवे आहेत. त्याचवेळेस या देशांमध्ये धार्मिक, वांशिक, भाषिक आणि राजकीय विविधता आढळते. दक्षिण आशिया हा रक्तलांच्छित आंतरराज्य आणि यादवी युध्द यांची जणू रंगभूमीच आहे. या विभागाने स्वांतंत्र्य चळवळी पहिल्या, लष्करी हुकुमशाही अनुभवली आणि अजूनही त्याला बंडाळी, धार्मिक मूलत्ववाद दहशतवाद यांनी घेरले आहे. भरीसभर ड्रग्ज आणि अवैध मानवी व्यापार या समस्यांनीही ग्रासले आहे. धार्मिक सहिष्णुतेचे मोजमाप लावले तर या विभागातील देशात लवचिक निधार्मिकता ते अत्यंत ताठर मूलतत्ववाद, अशी सर्व प्रकारची विचारसरणी आढळते. दक्षिण आशिया हा अत्यंत कमी एकात्म झालेला भाग म्हणून जगात ओळखला जातो. सार्क अस्तित्वात येऊन तीस वर्षे झाली तरी त्या चळवळीची प्रगती अत्यंत मंद आणि संथ आहे. लोकशाही विचारसरणीचे शासन ही संकल्पना एवढयातच या भागात मूळ धरू लागली आहे आणि आत्ता कुठे यापैकी काही देशातील आर्थिक वाढीचे दर भविष्य काळाच्या दृष्टीने चांगले ठरू लागले आहेत.

या सर्व विभागात भारताचे नेमके स्थान काय? आकार आणि लोकसंख्येत भारत सर्वात मोठा आहे. आजपर्यंत तरी तेथील लोकशाही जोमदार असल्याचे दिसून आले आहे. इतरांच्या मानाने त्याची अर्थव्यवस्था भक्कम आहे. त्याची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उत्तरोत्तर सुधारत आहे आणि जागतिक स्तरावर महत्वाची भूमिका बजावण्यासाठीच तो देश आहे या दृष्टीतून त्याच्याकडे पाहिले जाते. त्यामुळे दक्षिण आशियात भारतापुढे इतर देश अगदीच खुजे ठरू लागले आहेत. २६ नोव्हेंबर २०१४ ला पंतप्रधान मोदींनी भूतानला दिलेल्या भेटीत दक्षिण आशियाई देशाच्या स्वातंत्र्याला भारताच्या विकसनशीलतेमुळे कुठलाही धोका नसल्याचे स्पष्ट केले त्यांनी प्रत्येक क्षेत्रात व्यापार, गुंतवणुक, सहकार्य, अर्थसहाय्य या पाच स्तंभाचा उद्घोष करुन सार्क देशांद्वारे हे साध्य असल्याचे सांगितले.

**बांगलादेश :**

१९७१च्या बांगला मुक्ती संग्रामात भारताने जी भूमिका बजावली तिचे जरी बांगला देशात कौतुक असले आणि कृतज्ञ जाणीव असली तरी भारत आणि बांगला देशातील संबंधात चढ उतार राहिले आहेत. शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग पक्षाचा दृष्टीकोन भारताच्या बाजूने असला तरी बेगम खालिदा झिया यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेश नॅशनल पार्टी आणि बांगलादेश जमात इस्लामी या राजकीय शक्तींचा सूर मात्र भारतविरोधी राहिला आहे. मागच्या काही वर्षात बांगलादेशावर बी.एन.पी. किंवा अवामी लीग पक्षाची राजवट आलटून पालटून रहिली आणि त्यामुळे त्यां संबंधात कधी प्रगती तर कधी साचलेपण आले, बांगलाभूमीतून भारतीय बंडखोरांनी केलेल्या भारतविरोधी कारवाया, बांगलादेशातून भारतात होणारे अवैध स्थलांतर, ईशान्येकडील सामाजिक तणाव, सरहद्दीवर होणारी तस्करी, तिस्ता नदीच्या पाण्याचे वाटप इ. कारणांनी आपल्या संबंधामध्ये कुरबुरी वाढल्या. मागील काही वर्षात शेख हसीनांच्या राजवटीने भारताच्या सुरक्षा विषयक प्रश्नांकडे लक्ष दिले. मात्र त्याच्या बदल्यात बांगलादेशाला पुरेसा लाभ मिळाला नाही असा एक दृष्टीकोन आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी ६ जून २०१५ दरम्यान बांगलादेशला भेट दिली. १९७४ साली सीमारेषेबाबत करार झाला असला तरी त्यापुढील सरकारला त्यावर संसदेत मंजुरी घेता आली नव्हती. अनेक कारणांपैकी मुख्य कारण होते ते म्हणजे पश्चिम बंगाल आणि आसाम राज्य सरकारने त्याबाबत उपस्थित केलेल्या हरकती. या सीमाकरांरावर यावेळेसच्या भेटीत मुख्य भर होता तो पंतप्रधान मोदींनी अतीमानतेने केंद्र आणि राज्यसरकारांच्या मत निश्चितीसाठी घेण्यात आलेल्या निर्णय आणि चालना प्रक्रियेचा, त्यामुळेचं शंभरावी घटनादुरूस्ती विधेयक बिनविरोध सादर झाले. १९७४ सालचा भू सीमा करार त्याचप्रमाणे त्याबाबतचे २०११चे नियम दोन्ही सदनात मंजूर होऊ शकले.

संसदेतील या विधेयकामुळे ४०९६ किमी सीमारेषेचा प्रश्न सुटला. भारत, बांगलादेशातील परवृत्त प्रदेशामध्ये राहणाऱ्या पन्नास हजार लोकांना नवीन

ओळख मिळाली. त्याचप्रमाणे इतरही अनेक जमेच्या बाजू आहेत. सर्वात महत्वाची बाजू म्हणजे त्यामुळे बंडखोरांच्या कारवाया, मानवी व्यापार, अवैध घुसखोरी, तस्करी इ. रोखण्यासाठी करावे लागणारे सीमेचे व्यवस्थापन सुलभ झाले.

या भेटीचा एक महत्वाचा परिणाम म्हणजे बांगलादेशाशी केलेला एक करार. त्यामुळे बांगलादेशाच्या प्रदेशातून व्यापार आणि प्रवासासाठी भारतीयांना जाता येईल. ईशान्य आणि इतर भारतीय भाग यांच्यातील दळणवळण यामुळे सुधारेल. पूर्वी यासाठी चिंचोळया आणि दुबळया सिलीगुडी प्रदेशावर (ज्याला कोंबडीची मान असे नाव आहे) अवलंबून राहावे लागायचे. ढाका-शिलाँग-गुवाहाटी आणि कोलकत्ता-ढाका-आगरताळा या बस सेवांमुळे ही या प्रदेशातील जमिनीवरच्या दळणवळणाचा नवा अध्याय सुरू होत आहे. या शिवाय किनाऱ्यावरील जहाजांबाबतच्या करारामुळे मालवाहतुकीसाठी जहाजांना लागणारा वेळ कमी होणार आहे. त्यामुळे इतरही अनुषंगिक फायदे होणार आहेत. तितकाच महत्वाचा म्हणजे बांगलादेशाच्या चितगाव आणि मोंगला बंदरांचा भारताला वापर करू देण्यासाठी झालेल्या सामंजस्याचा करार. बांगलादेशाने या वेळेस या बंदराचा वापर करू देण्याची सांगड तिस्तेशी घातली नाही ही उल्लेखनीय बाब होय.

बांगलादेशातील विशेष भारतीय आर्थिक क्षेत्रामुळे बांगला देशातील भारतीय गुंतवणूक वाढेल. यामुळे बांगला देशाच्या व्यापारातील तुटीवर उपाय सापडेल. शिवाय रोजगारही वाढेल दोनशे कोटी डॉलरचे कर्ज मिळाल्यामुळे बांगलादेश वेगवेगळे विकासाचे प्रकल्प हाती घेऊ शकेल. उदाहरणार्थ सार्वजनिक वाहतूक, रस्ते, रेल्वे आंतरदेशीय कालवे बंदरे, शिक्षण, आरोग्य इ. यामुळे भारताच्या माल, प्रकल्प आणि सेवा निर्यातीलाही वाव मिळेल.

भारत आणि बांगलादेशातील संबंध आता गुणात्मक रीत्या नवीन टप्प्यात पोहचले आहेत. त्या संबंधातील स्थैर्य आता निश्चित झाले आहे, भविष्यकालीन द्विपक्षीय त्याचप्रमाणे त्या विभागातील पाण्याचे वाटप, उर्जा क्षेत्र (नागरी आण्विक शक्ती) अवकाश,व्यापार, गुंतवणूक इ. विषयात सहकार्य वाढवणे, द्विपक्षीय व्यापारातील अडथळे दूर करणे कोणताही अडथळा नसलेले अनेकविध प्रकारचे दळणवळण, परिणामकारक सीमा व्यवस्थापन इ. एकंदर अनेक गोष्टी प्रत्यक्षात आणण्याचा उद्देश पंतप्रधानांच्या या भेटीमागे आहे. या भेटीमुळे बांगलादेशाचा भारताच्या क्षमतेबद्दल विश्वास वाढलाआहे.

**अफगाणिस्तान:**

मागील अनेक वर्षे अफगाणिस्तान खडतर काळामधून जात आहे अफगाणिस्तानमधील सध्याची स्थिती ही भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेषगांभीर्यने घ्यावी अशी आहे. नाटो सैन्य आता माघारीच्या स्थितीत आहे. अफगाणिस्तान मधील राजकीय बदल हे ही फार सहजतेने झालेले नाहीत (भारताला तालिबानचे पुनरागमन परवडणारे नाही. जर अफगाणिस्तानात पाकिस्तानची प्रतिनिधी राजवट असेल आणि त्यात मूलतत्वावाद्यांचे वर्चस्व असेल तरीही ते भारताच्या हिताचे होणार नाही.) मागील वर्षी सप्टेंबरमध्ये मोहम्मद अश्रफ घानी यांनी अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला. त्यांच्या एकंदर भूमिकेतून तरी परराष्ट्रीय धोरणात भारताला फारसे वरचे स्थान नाही असेच दिसून आले. इंग्लंड व सौदी अरेबियाशिवाय चीन आणि पाकिस्तानला त्यांनी भेट दिली आणि पदभार स्वीकारल्यानंतर ही बऱ्याच महिन्यांनी एप्रिल २८, २९ तारखेला त्यांनी भारताला भेट दिली. याबद्दल भारतात बऱ्याच जणांनी भुवया उंचावल्या. अफगाणिस्तानने पाकिस्तान धार्जिणे धोरण भारताला डावलून घेण्याचा निर्णय घेतला आहे का? असाही प्रश्न विचारला गेला. अफगाण राष्ट्राध्यक्षांनी त्यांच्या दिल्ली वास्तव्यात मात्र या प्रकारची मते खोडून काढण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला.भारतीय टीव्ही चॅनेल एन.डी. टीव्ही ने त्यांना विचारले की, त्यांनी ज्या क्रमाने इतर देशाना भेटी दिल्या त्यातून त्यांचा प्राधान्यक्रम दिसतो का? याबद्दल उत्तर देताना त्यांनी एक लोकप्रिय म्हण वापरली "देर आये दूरूस्त आये" (कधीच न येण्यापेक्षा उशिर चांगला) याबाबत शंका दूर करण्याच्या हेतूने त्यांनी २८ एप्रिल २०१५च्या संयुक्त पत्रकात एक उल्लेख सूचकपणे केला. त्यात म्हटले आहे की. "या विभागाची शांती, समृध्दी आणि सुरक्षितता अभेद्य आहे आणि

एकमेकांप्रती आदरयुक्त संबंध हे इतर देशांना व देशाच्या गटांना अभिप्रेरित करण्याकरता असतील." याच पत्रकात अफगाण अध्यक्षांनी भारताच्या अफगाणिस्तानशी असलेल्या पायाभूत संबंधाचा आणि अफगाणिस्तानच्या परदेश धोरणातील प्राधान्य पाच वर्तुळापैकी चार वर्तुळात भारताचा समावेश असल्याचा पुनरूच्चार केला.

अशी चांगल्या संबंधाची ग्वाही देणारी कितीही विधाने असली तरी अफगाणिस्तानमधील स्थैर्य आणि त्याच्याशी मैत्री ही भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने अफगाणिस्तानमधील घडामोडींवर लक्ष ठेवण्याची जाणीव भारतीय नेतृत्वाला आहे. भारताचा अफगाणिस्तानाशी द्विपक्षीय करार झाला आहे. त्यानुसार भारताने २०० कोटी डॉलर अफगाणिस्तानला दिले आहेत. पायाभूत सुविधा विकास, लोकशाहीशी निगडित संस्थांना बळकट करणे, अफगाणसेनेची प्रशिक्षणाद्वारे क्षमता वाढविणे आणि याद्वारे अफगाणिस्तानच्या स्थैर्याला मदत करणे हा त्यामागचा हेतू आहे आणि तो भारताच्या प्राधान्य मुद्यांपैकी वरच्या क्रमांकावर आहे.

**पाकिस्तान :**

१९४७च्या भारताच्या फाळणीपासून भारत पाक संबंध कधीच सुरळित नव्हते या दोन देशात १९४८, १९६५, १९७१ आणि नंतर १९९९ मध्ये कारगिल अशी युध्दे झाली तर भारताच्या सर्व सीमांवरून भारताशी दहशतीचे युध्द सतत चालू आहे. क्वचित संबंध सुरळित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले पण प्रत्येकवेळी पहिले पाढे पंचावन्न हीच वेळ आली.

नवीन सरकारने कामकाज सुरू केले तेव्हा पाकिस्तानशी संबंध अगदीच ओहोटीला होते पंतप्रधानांच्या मे शपथविधी समारंभाला सर्व सार्क देश / राजवटीच्या प्रमुखांना बोलावून संबंध सुरळित करण्यासाठी पहिली सुरूवात झाली. सुरवातीला आढेवेढे घेऊन पाकिस्तानचे नवाज शरीफ समारंभात आले आणि दोन देशांनी विदेश सचिव स्तरावर संवाद प्रस्थापित करायचे मान्य केले. विदेश सचिवांनी जेव्हा इस्लामाबादला भेट द्यायचे ठरवले त्याचवेळेस पाकिस्तानच्या उच्चायुक्तांनी दिल्ली मध्ये काश्मीरच्या फुटीरवाद्यांना भेट द्यायचा निर्णय घेतला. त्यावेळी इस्लामाबादची भेट रद्द करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला.जरी पाक च्या उच्चायुक्तांनी काश्मिरमधील अलगता वाद्यांना भेटणे हे नवीन नसले तरी भारताने आपल्या सचिवांची नियोजित भेट रद्द करून अशा गोष्टींना भारत कडाडून विरोध करेल हा संदेश दिला. भारत सरकारच्या प्रसिध्दी पत्रकात असे म्हटले होते. "हुरियतच्या तथाकथित नेत्यांना पाक उच्चायुक्तांनी बोलावून पाकिस्तान भारताशी संबंध सुधारण्याच्या तळमळीबाबत प्रश्न उपस्थित केले आणि पाकचा नकारात्मक दृष्टीकोन आणि भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये ढवळाढवळ करण्याचे प्रयत्न हे अजून चालूच आहेत. हेच यातून दिसले. अशा परिस्थितीतपुढील आठवडयात भारताचे विदेश सचिव इस्लामाबादला जाऊन काही भरीव साध्य होणार नाही असेच दिसते." मागील वर्षी सप्टेंबर मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या संसदीय सत्रात पाकिस्तानने काश्मीर प्रश्न पुन्हा आंतरराष्ट्रीय करण्याचा प्रयत्न केला आणि वातावरण अजूनच गढूळ झाले.

१९७२ च्या सिमला करारात पाकिस्तानने काश्मीर ही द्विपक्षीय बाब राहील हे मान्य केले होते याचा इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

३ मार्च २०१५ला सार्क यात्रेचा भाग म्हणून सरकारने परराष्ट्र सचिव पाकिस्तानला पाठवायचे ठरविले आणि काही प्रसारमाध्यमांनुसार भारत पाकिस्तान क्रिकेट सामने पुन्हा खेळायचे ठरले. यासर्वांमुळे भारताच्या पाकिस्तान धोरणाबद्दल टीकाकारांनी प्रश्न उपस्थित केले. या सर्व संदर्भात परराष्ट्र मंत्री श्रीमती सुषमा स्वराज यांचे ३१ मार्च २०१५च्या पत्रकारपरिषदेत केलेले विधान महत्त्वाचे ठरते. भारताच्या पाकिस्तान धोरणात धरसोड वृत्ती असल्याचा त्यांनी इन्कार केला. त्या असेही म्हणाल्या की सुरूवातीपासूनच सरकारने संवादाचे तीन मुद्दे निश्चित केले आणि ते वारंवार पाकिस्तानाला कळवले. या धोरणावर भारत ठाम होता आणि त्यांचे पालन कटाक्षाने केले गेले होते. यातले पाहिले तत्व होते की सर्व मुद्दे शांतीपूर्ण संवादाने सोडविले जातील. हा संवाद भारत आणि पाकिस्तान

यांच्यातच होईल त्यात तिसरा देश सहभाग घेणार नाही. आणि सर्वात शेवटी चर्चा आणि संवाद हे शांतीपूर्ण वातावरणात आणि सिमला करार व लाहोर ठारावानुसार होईल.

पुढे काय होईल हे जरी आज सांगता आले नाही तरी पाकिस्तान सोबतच्या वादाची मुळे ही काश्मीरमध्ये नसून ती शक्तीशाली सैन्य, प्रभावी आय. एस. आय. मूलतत्ववादी शक्ती व दबावगट आणि लोकशाही मार्गाने निवडून आलेले पण दुबळे सरकार अशा पाकिस्तानमधील सत्तेच्या अनेक केंद्रात आहेत. जोवर या सत्तांचे केंद्रात भारताशी संबंध जुळवण्याबाबत एकमय होत नाही तोवर दृश्य प्रगती दिवास्वप्नच ठरेल.

**श्रीलंका**

एलटीटीई २००९ मध्ये विसर्जित झाल्यावर भारताने श्रीलंकेच्या बाबत बहुपेडी दृष्टीकोन स्वीकारला या धोरणाचे अनेक पैलू होते १) श्रीलंका सरकारने श्रीलंकेतील तामिळांच्या बाबतीत दिलेले आश्वासन पाळावे आणि सत्तेचे अर्थपूर्ण हस्तांतरण आणि १३व्या दुरूस्तीची कालबध्द अंमलबजावणी करावी हे श्रीलंका सरकार वर बिंबवणे, २) तेरावी दुरूस्ती कमकुवत होऊ नाही याची खात्री पटवण्यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न करण्याच्या आश्वासनांचा श्रीलंकेतील तामिळांसाठी पुनरूच्चार व भविष्यात समता, न्याय, आत्मसन्मान मिळेल याची ग्वाही देणे, ३) दीर्घकाळ चाललेल्या यादवी युध्दाने वाईट परिणाम झालेल्या उत्तर श्रीलंकेची पुनर्बांधणी, ४) भारतातील तमिळ नेतृत्वाच्या शक्य त्या मागण्या मान्य केल्या तरी विदेशनीती ठरवताना व्यापक राष्ट्रीय हिताचे निर्णय घेण्याचा केंद्राचा विशेष अधिकार अबाधित ठेवणे आणि संकुचित प्रादेशिक प्राधान्याच्या मागण्यांना महत्व न देणे, ५) चीनने श्रीलंकेशी सख्य जोडण्याच्या प्रयत्नांवर लक्ष ठेवणे श्रीलंका चीनकडे झुकते आहे का हे पाहणे, ६) मासेमारांच्या प्रश्नावर तोडगा काढणे

दुर्दैवाने श्रीलंकेतील माजी राष्ट्राध्यक्ष महिंद्र राजपक्षे यांनी आश्वासन देऊनही श्रीलंकेतील तामिळ अल्पसंख्याकांना सत्ता हस्तांतरण करण्याचे वचन प्रत्यक्षात आणले नाही. त्यांनीही चीनचे पान पुढे टाकले. त्यांच्या चीन धार्जिण्या धोरणामुळे चीनला श्रीलंकेतील मोक्याची आणि महत्वाची जागा काबीज करता आली.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव अधिकार परिषदेत श्रीलंका सरकारने लिट्टे विरूध्दच्या युध्दात मानवी हक्कांचे उल्लंघन केल्याबाबतचा ठराव जेव्हा चर्चेला आला तेव्हा भारताने २०१२ आणि २०१३ साली श्रीलंकेविरूध्द मतदान केले. हे अर्थातच श्रीलंकेला आवडले नाही. २०१४ सालच्या ठरावात भारताने मतदानात भाग घेतला नाही पण याने श्रीलंकेचे पुरेसे सांत्वन झाले नाही.

आता भारत आणि श्रीलंका येथे दोन्हीकडे नवीन सरकार आली आहेत, चार उच्चस्तरीय भेटी एकामागोमाग एक घडल्या आहेत. यावर्षी जानेवारीत श्रीलंकेत सत्तापालट झाल्यानंतर श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री भारतात आले. भारताचे परराष्ट्र मंत्री श्रीलंकेला गेले, श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांनी भारताला भेट दिली आणि भारतीय पंतप्रधानांनी श्रीलंकेला भेट दिली. बदललेल्या नेतृत्वाचा दोन राष्ट्रातील संबंध सुधारण्याचा हेतू यातून स्पष्ट दिसतो. श्रीलंकेच्या घटनेतील तेराव्या दुरूस्तीची अंमलबजावणी पुर्णपणे करून तमिळांकडे सत्तेचे हस्तांतरण करणे, श्रीलंकेमधील गटांमध्ये खऱ्या अर्थाने समेट घडवून आणणे, मच्छीमार लोकांची सुरक्षितता आणि भारताच्या सुरक्षेबाबतच्या चिंतांबाबत संवेदनशीलते खेरीज आता व्यापार आणि वाणिज्य, समुद्र सुरक्षा सागरी अर्थव्यवस्था या विषयांवर नवीन भर देण्यात येत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे दोन्ही बाजूंकडे नवीन सुरूवात करण्याची आणि आपले संबंध वरच्या पातळीवर नेण्याची तीव्र राजकीय इच्छाशक्ती आहे. श्रीलंकेतील नवीन नेतृत्व आता व्यवहार्य दृष्टीकोन घेईल आणि भारत व चीन यासोबत संबंधात समतोल राखेल अशी आपण अपेक्षा करूया.

**नेपाळ**

मागील काही वर्षात अनेकविध कारणांनी भारत आणि नेपाळ यांच्या संबंधात एक प्रकारचे साचलेपण आले आहे. १९५०च्या भारत आणि नेपाळमधील मैत्री आणि शांततेबाबत सुधारणा करावी अशी मागणी नेपाळमधील राष्ट्रवादी घटक करू लागले आहेत. हा करार भारत आणि नेपाळमधील विशेष संबंधांचा आधारस्तंभ

आहे. या करारांतर्गत नेपाळच्या नागरीकांना आजपर्यंत भारतात सुविधा आणि संधींच्या बाबतीत भारतीय नागरीकां इतकेच हक्क मिळाले हया फायद्याला दुसरी उपमा नाही. सगळीकडून पर्वतीय क्षेत्रामुळे वेढल्याने नेपाळचे जे तोटे होतात त्याची झळ भरून काढणारा हा करार आहे. भारत नेपाळ यांच्यात भारत-भूतानप्रमाणे जलविद्युत प्रकल्पासाठी सहकार्य मिळायला नको यासाठी नेपाळमधील हितसंबंधी प्रयत्नशील आहेत. यामुळे जलविद्युत संबंधी प्रचंड साधनसंपत्ती असूनही नेपाळ वीज आयात करतो आणि सीमेवरील भारतातील राज्यांना दरवर्षी नेपाळमधील पुराचा तडाखा बसतो जे प्रकल्प करण्याचे भारताने आश्वासन दिले त्याची अंमलबजावणी भारत फार संथ करतो अशी तक्रार नेपाळमध्ये होते. दहा वर्षाहून अधिक काळ नेपाळ राजकीय स्थित्यंतराच्या अवघड अवस्थेतून जात आहे. एकसत्ताक राज्य पध्दतीचा अस्त त्यांनी अनुभवला. माओ बंडखोरींचा उदय आणि अवनती त्यांने पाहिली. माओवादींना मुख्य प्रवाहात परत आलेले पाहिले, लोकशाहीचा जन्म झाला आणि आता नेपाळमध्ये नवीन घटनेचे लिखाण चालू आहे.

मागील वर्षी ऑगस्टमध्ये पंतप्रधान मोदींनी नेपाळला भेट दिली ती अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरली. भारतीय पंतप्रधानांनी सतरा वर्षानंतर दिलेली ती भेट होती. पदभार स्वीकारल्यानंतर तीन महिन्याच्या आत पंतप्रधानांनी ही भेट दिली. त्याआधी भारत नेपाळ संयुक्त आयोगाची बैठक झाली होती, तेवीस वर्षात प्रथमच दोन्ही परराष्ट्रमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. नेपाळच्या संसदेत आणि विधीमंडळाला उद्देशून भाषण करणारी ती एकमात्र विदेशी व्यक्ती आहेत.

नेपाळी लोकांच्या संवेदना लक्षात घेऊन १९५० चा शांती आणि मैत्रीच्या करारात सुधारणा करावी तो अद्ययावत करावा हे ठरले "नवीन करार सध्याच्या वस्तुस्थितीवर आधारित असेल आणि अनेकांशी पैलूंवर आधारित आणि फार खोलवर असलेले संबंध पुरोगामी दृष्टया वाढण्याचा प्रयत्न करेल". (पंतप्रधान मोदींच्या नेपाळला ४ ऑगस्टला २०१४ रोजी दिलेल्या भेटीचे संयुक्त वार्तांकन) नेपाळच्या मनातील अविश्वासाला उद्देशून पंतप्रधानांनी आश्वासन दिले आहे की, नेपाळच्या अंतर्गत बाबतीत ढवळाढवळ करण्याची भारताची बिल्कुल इच्छा नाही तर नेपाळ सोबत उपविभागीय आणि द्विपक्षीय सहकार्य करण्याची भारताची इच्छा आहे. अनेक प्रकल्पांसाठी कालावधी ठरवून देण्यात आला उदा. पंचेश्वर विकास प्रकल्प आणि अपरकर्नाली जलविद्युत प्रकल्पाचा प्रकल्प विकास करार. संभाव्य सहकार्यासाठी कितीतरी नवीन क्षेत्रं शोधण्यात आली. एकंदर भारत नेपाळ संबंधांना नवीन झळाळी देण्यासाठी आवश्यक असा प्रयत्न केला गेला. नाते योग्य दिशेने वाढविण्यासाठी भारत खरोखर इच्छूक आहे आणि नेपाळी लोकांचा भारत आश्वासन पूर्ण करेल यावर बराच विश्वास आहे हे मात्र नक्कीच कोणालाही दिसून येईल.

एकंदरीत दक्षिण आशियातील एका वर्षाची व्यापक आणि उत्साही राजनीती बऱ्याच प्रकारे उपयुक्त ठरली. त्यामुळे परस्परातील अविश्वास कमी झाला. भारत आश्वासन पूर्ण करण्याची क्षमता बाळगतो हा विश्वास वाढला, असलेले संबंध सुधारले, काही नाती परत जुळू लागली. सध्याच्या आव्हानांची दखल घेण्यात आली आणि उद्दिष्टांची आखणी करण्यात आली. विकास आणि समृध्दी, दीर्घकाळच्या, (जमीन, समुद्र आणि हवेतील दळणवळण याद्वारे) आर्थिक एकात्मतेसह प्रादेशिक एकात्मतेसाठी शांतीपूर्ण सह अस्तित्वाची आवश्यकता असल्याचा पुनरूच्चार करण्यात आला. ज्या क्षेत्रात सर्व सदस्यांनी एकत्र काम करणे अवघड आहे तेथे द्विपक्षीय किंवा उपविभागीय पध्दतीने काम करावे म्हणजे इच्छूक सदस्य एकत्र येऊन काम पुढे सरकते हा सुक्ष्म संदेश मात्र सर्वत्र पोहचला आहे. आत्तापर्यंत मिळालेले लाभ मजबूत करण्यासाठी कालबध्द पाठपुरावा करण्याची गरज आहे. मेहनत घेऊन वचन आणि शब्द खरे करण्याची आणि न सुटलेल्या प्रश्नांना परिणाम कारक रित्या सामोरे जाण्याची आवश्यकता आहे.


*(लेखक **अचल मल्होत्रा** हे अर्मोनिया आणि जिऑर्जिया येथे भारतीय राजदूत म्हणून कार्यरत, संयुक्त राष्ट्रसंघ तसेच संघटनेत भारताचे कायम स्वरुपी प्रतिनिधी म्हणून कार्यरत. सध्या दिल्ली येथे शेजारील राष्ट्रांच्या संबंध राखरखाव विभागात संचालक म्हणून कार्यरत.)*

**संपर्कासाठी मेल :**

**achal_malhotra@hotmail.com**

# भारताची आंतरराष्ट्रीय व्यापारातील दूरदृष्टीता

— डॉ. नितिन ज्ञा. चौधरी



**जागतिक स्पर्धेत आगेकुच करण्यासाठी आर्थिक उदारीकरण धोरण अंगिकारल्यानंतर दशका-दशकांच्या विकासाची गती बघितल्यास, भारताने अनेक अडथळयांच्या शर्यतीला तोंड देत पुन:स्वावलंबनाचा मार्ग पत्करला आहे. नरेंद्र मोदींचा "मेक इन इंडिया" ही वस्तु स्थिती असून पंचवार्षिक योजनांद्वारे आर्थिक विकासात भारताची घौडदौड चालु आहे. जीएसटीत करण्यात आलेले बदल, सर्व्हीस एक्सपोर्ट इंडिया स्कीम तसेचं "मर्चंडाईज एक्सपोर्ट इंडिया स्किम" या निर्यात वाढीसाठी तयार करण्यात आल्या असून या योजनांद्वारे व्हॅल्यु एडिशन व घरगुती कच्च्या मालाच्या विक्रीला प्रोत्साहित करुन रोजगार वाढीवर भर देण्यात येत आहे. डीजीटल व स्कील इंडिया यांच्याबरोबर ही निर्यात योजना जोडण्याचे प्रावधान आहे. परंतु या सर्वांसाठी गरज आहे ती शक्याशक्यता पडताळण्याची.**

आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक बाबतीत भारताचे वाढते महत्त्व देशाच्या प्रगतीचा आलेख दर्शवीत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेच्या वृध्दीदरात तीव्र गतीने वाढ होत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेचा विकासाचा दर २०१४ मध्ये ३.३ टक्के होता. तो २०१५ मध्ये वाढून ३.५ टक्के आणि २.१६ मध्ये ३.७ टक्के वाढण्याची अपेक्षा आहे. जगात अमेरिकन डॉलरच्या विनिमयदारानुसार भारताची अर्थव्यवस्था १२ व्या क्रमांकाची आहे. क्रयशक्ती समानतेच्या आधारावर अमेरिका, चीन नंतर भारत हा क्रय शक्तीच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. जगात सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा चीन नंतर दुसरा क्रमांक लागतो. आर्थिक क्षेत्रात भारताची ओळख कुशल तंत्रज्ञ, रोजगार पुरविणारा, तसेच जगात लागणाऱ्या विविध बाह्य स्त्रोतांच्या सेवांचा पुरवठादार देश म्हणून होत आहे. भारत अतिकुशल तंत्रज्ञ पुरविणारा जगातील सर्वात मोठा निर्यातक देश आहे. त्याच प्रमाणे औषध निर्माण, जैवतंत्रज्ञान, अतिसूक्ष्म तंत्रज्ञान, दूरसंचार, जहाजनिर्मिती, विमान निर्माण आणि पर्यटन ह्या क्षेत्रांमध्ये भारताची क्षमताही वेगाने वाढतांना दिसत आहे.

हे सर्व मिळविण्याकरिता भारतात अनेक वर्षापासून प्रयत्न करावे लागले. मात्र १९९१ च्या परराष्ट्र धोरणात झालेल्या क्रांतिकारक बदलांमुळे याला मोठे पाठबळ मिळाले. आणि आज स्थिर सरकार अस्तित्वात आल्याने यात तीव्रगतीने वाढ होणे अपेक्षित आहे. भारताचा परकीय व्यापाराचा अभ्यास करीत असताना भारताची सद्यस्थितीत झालेली प्रगती व त्या अनुषंगाने पुढील वाटचाल ठरवावी लागणार आहे.

**भारताचा परकीय व्यापार :**

भारतासारख्या प्रगत विसनशील राष्ट्राच्या विकासाचा आधार येथील परकीय व्यापार हा सुध्दा आहे. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार हे आर्थिक विकासाचे इंजीन असते या मताचे येथे समर्थनही होते. देशात १९९१च्या मुक्तव्यापार धोरणाने विकासाला किंवा प्रगतीच्या वाटचालीला एक नवी दिशा मिळाली आहे. देशात नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उत्पादकतेत वाढ होऊन कृषी, उद्योग, सेवा क्षेत्राच्या विकासाला गती मिळाली आहे. भारताचा जगातील अनेक देशांसोबत वस्तू व सेवांच्या व्यापारात झालेल्या वाढीने देशातील उत्पादन व उत्पन्न वाढीत सुधारणा होण्यास मदत झाली आहे. जागतिक निर्यातीत भारताचा वाटा २००० मध्ये ०.७ टक्के होता

तो २०१३ मध्ये १.७ टक्के झाला आहे, तर जागतिक आयातीमध्ये भारताचा वाटा २००० मध्ये ०.८ टक्के होता, तो २०१३ मध्ये २.५ एवढा वाढला आहे. आयातीपेक्षा निर्यातीत झालेली वाढ निश्चितच कमी आहे. हे विकसनशील राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी निश्चितच योग्य बाब नाही. मात्र भारताच्या परकीय व्यापारात झालेली वाढ या दृष्टिकोनातून बघितल्यास भविष्यात या आधारेच परकीय व्यापाराचा विस्तार करण्यास संधी उपलब्ध होत आहेत.

**भारताची परकीय व्यापाराची सद्यस्थिती :**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारताच्या व्यापारात सातत्याने वाढच होत गेली आहे. भारताने पंचवार्षिक नियोजनाचा अवलंब स्वीकारल्याने परकीय मदतीचा ओघ निर्माण झाला. देशात नवनवीन कारखाने, उद्योग यांच्या माध्यमातून पायाभूत सुविधा निर्माण करण्यास सुरवात झाली. हे सर्व परकीय मदतीशिवाय शक्य नव्हते. १९५०-५१ ते २०१३-१४ या काळात परकीय व्यापारात झालेला बदल पुढील सारणीवरून लक्षात येतो.

**भारताची आयात व निर्यातीतील स्थिती दर्शक तक्ता**

*आकडे कोटी रुपयांमध्ये*

| वर्ष | निर्यात | आयात | व्यापारशेष | वृध्दीदर प्रतिशतमध्ये |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ६०६ | ६०८ | -२ | -०.३३ |
| १९६०-६१ | ६४२ | ११२२ | -४८० | -४२.७८ |
| १९७०-७१ | १५३५ | १६३४ | -९९ | -६.०६ |
| १९८०-८१ | ६७११ | १२५४९ | -५८३८ | -४६.५२ |
| १९९०-९१ | ३२५५३ | ४३१९८ | -१०६४५ | -२४.६४ |
| २०००-०१ | २०३५७१ | २३०८७३ | -२७३०२ | -११.८३ |
| २०१०-११ | ११३६९६४ | १६८३४६७ | -५४६५०३ | -३२.४६ |
| २०१३-१४ | १९०५०११ | २७१५४३४ | -८१०४२३ | -२९.८५ |

**स्त्रोत** : आर्थिक सर्वेक्षण भारत २०१४-१५

यावरून असे लक्षात येते की, भारताच्या परकीय व्यापारात उपरोक्त कालावधित मोठ्याप्रमाणात वाढ झाली आहे. जी निर्यात १९५०-५१ मध्ये ६०८ कोटी रूपये होती त्यामध्ये वाढ होऊन २०१३-१४ मध्ये २७१५४३४ कोटी झाली. म्हणजेच ९९.९८ टक्के वाढ झाली आहे. तसेच निर्यातीच्या तुलनेत आयातीत होणारी वाढ ही सातत्याने अधिक राहली आहे. ही वाढ आपणास वृध्दीदराच्या आधारे दर्शविण्यात आली आहे. ही सर्व आयातीच्या तुलनेत निर्यातीत असलेली घट दर्शवीत असल्याने ऋणात्मक स्वरूपात दर्शविण्यात आली आहे. यानुसार १९७०-७१ चा कालावधी सोडला तर भारतात मोठ्या प्रमाणात व्यापारशेष प्रतिकूल असल्याचे दिसून येते. तसेच स्वातंत्र्यानंतर भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या इतिहासात आजपर्यंत १९७२-७३ (१०४) व १९७६-७७(६८) मध्येच व्यापारशेष आधिक्याचा होता. हे व्यापारातील आधिक्य क्रमशः ५.५७ टक्के व १.३४ टक्के होते.

त्याच प्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापार सुकर होण्यासाठी प्रमुख बाब म्हणजे देशातील विदेशी चलनाचा साठा होय. देशात जसजशी व्यापारात वाढ होत जाईल त्या प्रमाणात विदेशी चलनाच्या साठ्यात वाढ होत जाईल. भारतात १९९०-९१ काळात विदेशी चलनाच्या साठ्यात मोठ्या प्रमाणात घट झाली होती. त्यावेळी भारताने अवलंबिलेल्या मुक्तव्यापार धोरणामुळे आज जगात सर्वाधिक चलन साठा असणाऱ्या राष्ट्रांमध्ये भारताचा ९वा क्रमांक लागतो. प्रथम क्रमांकावर चीन विराजमान आहे. यावरून आज भारतासाठी आंतरष्ट्रीय व्यापारातील महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते.

**सर्वाधिक परकीय चलन साठा असणारे देश**

| अ.क्र. | देश | परकीय चलन साठा दशलक्ष अमेरिकन डॉलर | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | चीन | ३८,९९,२८५ | डिसेंबर २०१४ |
| २ | जपान | १२५००७३ | एप्रिल २०१५ |
| ३ | सौदी अेरबीया | ६८६४३१ | एप्रिल २०१५ |
| ४ | स्वीत्झरलँड | ५८२४८७ | मार्च २०१५ |
| ५ | तायवान आर.पी.चीन | ४१९६०८ | मार्च २०१५ |
| ६ | दक्षिण कोरीया | ३६९९०० | एप्रिल २०१५ |
| ७ | ब्राझील | ३६४४७३ | एप्रिल २०१५ |
| ८ | रशिया | ३६१६०० | जून २०१५ |
| ९ | **भारत** | **३५४२८८** | **जून २०१५** |
| १० | हाँगकाँग | ३४३२१३ | एप्रिल २०१५ |
| ११ | सिंगापूर | २५१९२१ | एप्रिल २०१५ |

**स्त्रोत** : en.m.wikipedia.org

**भारताची विदेशी व्यापाराची रचना :**

भारतात साधारणत: सर्वच क्षेत्रात वस्तू व सेवांची मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे. यामध्ये प्रामुख्याने निर्मित वस्तू अधिक असल्याचे दिसून येते. भारताच्या परकीय व्यापरात निर्यात व आयतीमध्ये असलेले प्रमाण पुढील सारणीवरून लक्षात येते.

**भारतीय वस्तुंचा निर्यात हिस्सा (% मध्ये)**

| वस्तू | २०१३-१४ | २०१४-१५ एप्रिल ते नोव्हेंबर |
|---|---|---|
| कृषी संबंधित वस्तू | १३.७ | १२.५ |
| लोह व खनिजकोळसा सोडून | १.८ | १.५ |
| पुनर्निर्माणीच्या वस्तू | ६३.५ | ६५.९ |
| कच्चे तेल व पेट्रोलीयम उत्पादन कोळश्या सहित | २०.६ | १९.८ |

**स्त्रोत** : आर्थिक सर्वेक्षण भारत २०१४-१५

आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

भारताच्या एकूण निर्यातीत आपणास पुनर्निर्माणीच्या वस्तूंचे प्रमाण सर्वाधिक दिसून येते. हे प्रमाण २०१३-१४ मध्ये ६३.५ टक्के होते तर २०१४-१५ मध्ये ६५.९ टक्के होते. यामध्ये रत्ने व आभूषणांचे प्रमाण सर्वाधिक १३.५ टक्के होते. त्याचप्रमाणे कच्चे तेल व पेट्रोलियम उत्पादन यांचे प्रमाण १९.८ टक्के आणि कृषी संबंधित वस्तूंचे प्रमाण १२.५ टक्के होते. कृषी संबंधित उत्पादनामध्ये चहा, कॉफी, मसाले, समुद्री उत्पादन, फळे, कापूस इत्यादींचा समावेश होतो.

### भारतातील आयातीत वस्तूंचा हिंस्सा २०१४-१५

| वस्तू | २०१३-१४ | २०१४-१५ एप्रिल ते नोव्हेंबर |
|---|---|---|
| खाद्यपदार्थ संबंधित उत्पादन | ३.२ | ३.८ |
| इंधन | ४०.२ | ३७.५ |
| पुनर्निर्माण, वृत्तपत्र कागद | ०.६ | ०.६ |
| भांडवली वस्तू | १२.१ | १०.५ |
| उर्वरक / खते | १.४ | १.६ |
| इतर | ४२.६ | ४६.० |

**स्त्रोत** : आर्थिक सर्वेक्षण भारत २०१४-१५ आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

भारताच्या आयातीमध्ये आजही मोठ्याप्रमाणावर इंधनांवर खर्च करावा लागत आहे. २०१४-१५ मध्ये देशाच्या एकूण आयातीमध्ये ३७.५ टक्के आयात ही इंधनाची करण्यात आली होती. तसेच खाद्यपदार्थामध्ये अन्नधान्या बरोबरच खाद्यतेलांमध्ये मोठ्या प्रमाणात आयात करण्यात आली आहे. देशाच्या एकूण आयातीमध्ये २.४ टक्के आयात ही खाद्यतेलाची आहे. तसेच सोने व रसायनांची आयातही मोठी असल्याचे दिसून येते. ही क्रमश: २०१४-१५ मध्ये ८.८ टक्के व ६.० टक्के होती.

**भारताची परकीय व्यापाराची दिशा :**

जगात आज २४९ देश आहेत मात्र भारताचा व्यापार या सर्वांसह होत नाही. त्यात वाढ करण्यासाठी व्यापार विस्तारीकरणाची भूमिका भारताला अवलंबवावी लागेल. प्रामुख्याने भारताचा व्यापार युरोप, अमेरिका, आशिया व अफ्रिका खंडातील विविध देशांसोबत होत आहे. स्वतांत्र्यानंतर युरोप खंडातील देशांसोबत भारताचा व्यापार मोठ्याप्रमाणात होत असे. कालांतराने बदल होऊन अमेरिका खंडातील देशांसोबत व्यापारात मोठ्याप्रमाणात वाढ झाली. मात्र अमेरिकेमध्ये तसेच युरोपमध्ये अस्तित्वात आलेल्या मंदीमुळे भारताचा व्यापार आशियायी राष्ट्रांसोबत वाढण्यास सुरवात झाली. तसेच अलिकडच्या काळात अफ्रिका खंडातील देशांसोबतही भारताचा परकीय व्यापार वाढला आहे.

### भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारातील आयात व निर्यातीचा हिस्सा २०१४-१५

| क्षेत्र | निर्यात | | आयात | | आयात निर्यात २०१३-१४ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २००४-०५ ते २००७-०८ | २०१०-११ ते २०१३-१४ | २००४-०५ ते २००७-०८ | २०१०-११ ते २०१३-१४ | निर्यात | आयात |
| युरोप | २३.३ | १९.० | २१.६ | १८.० | **१८.६** | **१५.८** |
| अमेरिका | १८.९ | १६.६ | १०.३ | ११.० | **१७.२** | **१२.८** |
| अफ्रिका | ७.८ | ८.९ | ६.३ | ८.५ | **९.९** | **८.१** |
| आशिया | ४८.५ | ५०.२ | ४८.९ | ६०.२ | **४९.४** | **६०.७** |

**स्त्रोत** : आर्थिक सर्वेक्षण भारत २०१४-१५ *आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

२००४-०५ ते २०१३-१४ या कालावधीचे सार्वत्रिक अध्ययन करता, भारताच्या व्यापारात युरोप व अमेरिका क्षेत्रातील देशांचा हिस्सा कमी होत गेला आहे. तर अफ्रिका व आशिया क्षेत्रातील देशांचा वाटा वाढत गेल्याचे सारणीवरून लक्षात येते.

**व्यापार वाढीसाठी शासनाचे प्रयत्न :**

भारत सरकारने नव्याने २०१५-२०२० या कालावधीकरिता व्यापार धोरण तयार केले आहे. देशात **मेक इन इंडिया** च्या माध्यमातून देशाला जागतिक व्यापारात एक प्रमुख निर्यातदार देश बनविण्याचे उद्दिष्ट ठेवून कार्याला प्रारंभही केला आहे. या व्यापार धोरणात शासनाच्या विविध योजनांद्वारे देशातील उद्योजकवर्गाकरिता सर्व स्तरातील उत्पादक वर्गचा समावेश करून त्यांना नावीन्यपूर्ण उत्पादन तंत्राचा वापर करून उत्पादन वाढविण्यासाठी व उत्पादीत मालाचा उपभोग व निर्यातीसाठी उपयोग व्हावा याकरिता प्रोत्साहन दिले जात आहे. भारताचा परराष्ट्र व्यवहार आयातीत घट घडवून आणण्याकरिता **मेक इन इंडिया, स्कील इंडिया** यासारख्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीत अनेक क्षेत्रात नवनवीन संधी निर्माण होत आहेत. पंचवार्षिक व्यापार धोरणात केंद्रसरकारने निर्यातीला चालना देण्यासाठी अपेक्षेप्रमाणे मेक इन इंडीया व इज ऑफ डुंईग बिझनेस या संकल्पनांवर विशेष भर दिला आहे. भारताची सद्यस्थितीतील निर्यात ४६६ अब्ज डॉलर्स होती ती २०२० पर्यंत ९०० अब्ज डॉलर्स करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

भारतात वस्तूची विक्री व सेवा या माध्यमातून निर्यात वाढविण्याकरिता **सर्व्हिस एक्सपोर्ट इंडीया स्कीम** तसचे **मर्चंडाइज एक्सपोर्ट इंडीया स्कीम** या दोन नवीन योजना तयार केल्या आहेत. या योजनांद्वारे **व्हॅल्यू एडिशन** व घरगूती कच्च्या मालाच्या विक्रीला प्रोत्साहित करून रोजगार वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. देशात भांडवली वस्तूंचे उत्पादन वाढवून **मेक इन इंडिया** योजनेबरोबर निर्यात योजना जोडण्याचे प्रावधान आहे. **डिजीटल इंडीया** व **स्कील इंडीया** यांच्या बरोबरही निर्यात योजना जोडण्याचे प्रावधान आहे. याकरिता विविध राज्यातील राज्यसरकारांची मदत घेतली जाईल. याआधारे पर्यावरण संलग्न उत्पादने व संरक्षण साहित्य यांची निर्यात वाढविण्यावर भर असणार आहे.

**आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताची व्युव्हरचना :**

भारताची सद्यस्थितीतील आयात निर्यातीमधील तफावत ही १३५७९५ मिलीयन अमेरिकन डॉलर्स आहे. भारताच्या आयातीत घट आणण्यासाठी प्रामुख्याने भारतीय सैन्याला लागणारे साहित्य व यावर होणारा आयातीचा खर्च बघता यात कपात करून हे साहित्य देशात उत्पादीत करून खर्च कपात करण्यास सुरवात झाली आहे. याच बरोबर भारतातील चलनी नोटांसाठी लागणारा कागद व शाई यांचे उत्पादन देशातच करण्यात यावे यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. मेक इन इंडीया योजना क्रियान्वीत करण्याकरिता जोडीला शासनाने नवीन परकीय व्यापार धोरण २०१५-२०२० या कालावधीकरिता आखले आहे.

- २०२० पर्यंत भारताला जागतिक बाजारपेठेत प्रमुख निर्यातदार देश बनविणे. यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वीकरले जाणारे दर्जेदार उत्पादन तयार करणे. देशातील उत्पादकांना आवश्यक त्या सुविधा सोप्या मार्गाने मिळवून देणे आवश्यक आहे.
- देशातील आर्थिक तसेच सामाजिक प्रश्न बनलेल्या बेरोजगारीकरिता निर्यातीला प्रोत्साहन देणे यासाठी व्हॅल्यू ॲडिशन योजनेवर भर द्यावा लागेल, निर्यात वाढीमुळे रोजगार संधीत वाढ झाली तर खरोखरच अर्थचक्राला वेग प्राप्त होईल.
- भारताच्या विकासात कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचे योगदान जरी वेगवेगळे असले तरी महत्त्व मात्र सारखेच आहे. खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या धोरणानंतर सेवा क्षेत्रात तीव्र गतीने वाढ झाली आहे. त्यामुळे या धोरणात सेवा क्षेत्रातील उत्पादनाला निर्यातक्षम बनविण्यावर भर देण्यात येणार आहे.

देशात आजही मोठ्या प्रमाणावर अनुदानाची गरज भासत आहे, ते सेवा क्षेत्र असो अथवा उद्योग वा कृषी. शासन सबसिडी केव्हा आणि किती देते याची वाट बघितली जाते मात्र आज आपणास यापलिकडचा

विचार करावा लागेल. कारण सबसिडी देणे म्हणजे भिक देण्यासारखे आहे, यापेक्षा योग्य मार्ग म्हणून शासनाने भविष्यात इन्सेंटिव्ह देण्याची तयारी करावी. म्हणजेच भिक मागणाऱ्या हाताला काम देणे आणि कामाला उत्तेजन देवून उत्पन्न मिळविण्यास प्रोत्साहन देणे योग्य ठरेल. यामुळे सर्वच स्तराबरोबर निर्यातदारांमध्ये उत्साह निर्माण होऊन उत्पादन वाढण्यास व निर्यात वाढण्यास सहाय मिळेल.

- भारतातील नोकरशाही व्यवस्था फार त्रासदायक आहे. व्यवसाय परवाना, व्यवसायकर, उद्योग निर्मिती यासाठी नोकरशाहीतून जाणेच अवघड आहे. यासाठी ह्या नोकरशाहीवर योग्य यंत्रणेमार्फत नियंत्रण ठेवून ही नोकरशाही उत्पादन वाढीस व उद्योग निर्मितीस सहायक अशी बनविली जाऊ शकते. हे बघणे.
- नवीन उद्योगांची उभारणी करण्यासाठी उद्योजकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विदेशात उत्पादीत माल विक्रीच्या संधी शोधणे, परकीय चलनात व्यवहार करणे, विदेशातील बँकाच्या नियमनाची माहिती घेणे इत्यादी कामे अशा प्रकराच्या प्रशिक्षणात असावयात आणि यासाठी भारत सरकारने प्रयत्नही चालू केले आहेत.
- देशात श्रम आधारित उद्योगांच्या निर्यातीला चालना देणे, व्हॅल्यू ऐडेड, वृषी उत्पादन, हायटेक प्रॉडक्ट, इकोफ्रेंडली व **ग्रीन प्रॉडक्टावर** भर देवून **झिरो डिफेक्ट** निर्यातीवर भर देण्याची शासनाची योजना असल्याचे दिसून येते. जर **झिरो डिफेक्ट** उत्पादन आंतरराष्ट्रीय बाजारात उतरविले तर आपल्या निर्यातीमध्ये उत्पादनाला जागतिक पातळीवर स्पर्धा फार कमी राहील.
- शासनाने देशांतर्गत नागरिकांना वंचित ठेवून निर्यात वाढविता कामा नये, देशांतर्गत नागरिकांच्या गरजा भागवून अतिरिक्त उत्पादनाची निर्यात करावी.
- भारत एक संघराज्य देश आहे. त्यामुळे शासनाने देशातील प्रत्येक घटकाला आपल्या राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय योजनांमध्ये सामावून घेणे गरजेचे आहे.
- सरकारने जुन्या बंदरांना आधुनिक करण्यासाठी **सागरमाला** ही एक महत्त्वकांक्षी योजना तयार केली आहे. याचा फायदा देशातील उत्पादन परकीय बाजारत पाठविण्यास मदत होईल.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापार विस्तार करायचा असेल तर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बाजारपेठांची निर्मिती करणे गरजेचे आहे. आणि भारतासारख्या एवढा मोठा समुद्र किनारा लाभलेल्या देशाला हे अशक्य नाही.

भारतात आज स्थिर सरकार अस्तित्वात आहे. आणि या एक वर्षाच्या काळात पंतप्रधानांनी अनेक देशांना भेटीही दिल्या आहेत. या माध्यमातून राजकारण आणि प्रशासनातील चाणक्य असलेल्या पंतप्रधानांनी देश हीत लक्षात घेवूनच प्रत्येक भेट घेतली आहे. अमेरिकेसोबत प्रलंबित असलेल्या अणू करारातील अडथळे दूर करणे, बांग्लादेशातील सीमावाद संपविणे, कोरीया मधून विदेशी गुंतवणूकीत प्रोत्साहन मिळविणे, चीन मधून व्यापारात वाढ करणे, अशा अनेक भेटीत अनेक लक्ष साध्य करण्यास सुरवात केली आहे. मात्र आजही देशात जल, परिवहन, वाहतुक, रेल्वे, बंदर, जहाज निर्माण, अक्षय उर्जा, वीज निर्मिती, माहिती तंत्रज्ञान अशा अनेक पायाभूत क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत. त्याच बरोबर सेवा, इलेक्टॉनिक्स निर्मिती, उद्योग क्षेत्रातही अनेक संधी देशात उपलब्ध आहेत. यासाठी शासनाने विदेशी गुंतवणूक दारांना प्रोत्साहित करण्यासाठी गुंतवणूकीच्या अटी सुकर बनविल्या आहेत. भविष्यात नक्कीच भारताचा आयातदार नाही तर एक प्रमुख निर्यातदार देश म्हणून उल्लेख करावा लागेल.

**संदर्भ सूची :**


1. आर्थिक सर्वेक्षण २०१४-१५, भारत सरकार
2. bwww.tradingeconomics.com
3. www.dgft.gov.in



*(**डॉ. नितिन ज्ञा. चौधरी** हे अकोला येथील सिताबाई कलावाणिज्य महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)*

**संपर्कासाठी ई-मेल :**
ndchaudhari1981@gmail.com

# आपल्याला माहित आहे का ?

## वाराणसीमध्ये प्रभावी उर्जा शामक कार्यक्रमाला सुरुवात

वीज बचतीचा मुख्य उद्देश ठेऊन नुकतेच वाराणसी मध्ये 'देशीय प्रभावी प्रकाश कार्यक्रम' अर्थात डोमेस्टिक एफिशिन्ट लायटिंग प्रोग्राम (डी.ई.एल.पी.) तसेच एल.ई.डी. वर आधारित स्मार्ट स्ट्रीट प्रोग्राम राबविण्यात आला.

हा उपक्रम म्हणजे एल.ई.डी. दिव्यांद्वारे कार्यालयीन वेळेत १०,००० मे. वॅट वीज बचतीचे धेय्य ठेवणाऱ्या सरकारी वाचनाचा संदेश आहे. केंद्र आणि राज्य सरकार ई.ई.एस.एल.च्या सहयोगाने उर्जा कार्यक्षमता सेवा मर्यादित अर्थात (ई.ई.एस.एल.) म्हणजे (उर्जा मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेली सार्वजनिक कंपनी) २,२८,४९६ घरगुती ग्राहकांना १३ लाख एल.ई.डी. दिव्यांचे वाटप करणार आहे आणि वाराणसीच्या रस्त्यांवर लावलेले ३६,०७७ पारंपरिक दिवे बदलणार आहे.

ऊर्जा बचत करणाऱ्या एल.ई.डी. दिव्यामुळे वाराणसी मध्ये विजेची मागणी ४५ एम्.डब्लू. पर्यंत कमी होण्याची शक्तचा आहे आणि ह्यामुळे ६८ कोटी रुपयांची बचत होऊ शकते. रस्त्यावरील पारंपारिक दिव्यांचे वीज बचत करणाऱ्या एल.ई.डी. दिव्यांमध्ये रुपांतर करणारा हा नाविन्यपूर्ण व्यवसाय सरकारी यंत्रणेकडून गुंतवणुकीची गरज देखील दूर करतो तसेच विजेच्या जास्त मागणीच्या काळात वीज बचत करतो आणि त्याच वेळेला दिव्यांचा दर्जाही सुधारतो.

ई.ई.एस.एल. स्व खर्चाने अंदाजे ३६,०७७ रस्त्यावरील पारंपरिक दिवे बदली करुन त्या जागी सक्षम असे एल.ई.डी. दिवे लावणार आहे. पुढील ५-७ वर्षात नगरपालिका विजेच्या बचतीतील आणि देखभालीच्या खर्चाच्या बचतीतील काही हिस्सा ई.ई.एस.एल.ला परतफेड करण्यासाठी वापरतील. 'दिव्यांचे विनामुल्य बदली तसेचं अतिशय किंमत' अशा अनेक बहुविध फायद्यामुळे नगरपालिका, उच्च दर्जा, दिर्घायुष्यी, विज करणारे दिवे कुठल्याही भांडवली खर्चाशिवाय स्थापित करु शकेल.

ई.ई.एस.एल. आणि पूर्वांचल विद्युत वितरण निगम लिमिटेड (पी.यु.वि.वि.एन.एल.) संयुक्तपणे संपूर्ण शहरभर डोमेस्टिक एफिशियन्ट लायटिंग प्रोग्रामची अंमलबजावणी करणार आहेत. वाराणसी मधील विजेच्या ग्रीड्शी संलग्न अशा घरगुती ग्राहकांना एल.ई.डी. वितरण कार्यक्रमांद्वारे अंदाजे १३ लाख दिव्यांचे वाटप करण्यात येईल. डी.ई.एल.पी. अंतर्गत २ के.डब्लू. पर्यंत भार असलेल्या प्रत्येक ग्राहकाला ७ डब्लू.चे उच्च दर्जाचे ५ एल.ई.डी. दिवे १० रुपयांच्या प्राथमिक रकमेवर देण्यात येतील. त्यानंतर दर महा ११० रुपये पुढील अकरा महिने विजेच्या बिलांमधून वसूल करण्यात येतील. त्यानंतर दर महा ११० रुपये अकरा महिने विजेच्या बिलांमधून वसूल करण्यात येतील. घरगुती ग्राहक १ एल.ई.डी. दिवा एकंदरीत १२० रुपयांमध्ये विकत घेऊ शकतो ते देखील ३ वर्षाच्या फुकट हमी वर. पण बाजारात त्याची किंमत ३५०-४०० रुपयो आहे. असा अंदाज आहे कि, घरगुती ग्राहकांची प्रत्येक एल.ई.डी. दिव्या मागे विजेच्या बिलामध्ये वार्षिक १६२ रुपयांची बचत होईल. (सध्याच्ये सरासरी दराप्रमाणे) ही बचत १२० रुपयांच्या किंमती पेक्षा जास्त आहे.

सरकारच्या दोन योजनांचा एकत्रित परिणाम म्हणजे वाराणसीला १०४ दशलक्ष के.डब्लू.एच. वार्षिक उर्जा बचत करायला मदत होईल म्हणजेच वाार्षिक ६८ कोटी रुपयांची बचत होईल.

उर्जा कार्यक्षमता हीच केंद्र आणि राज्य सरकारची मुख्य लक्षावेधी क्षेत्र आहे आणि त्याच्या अंमलबजावणीवर विशेष भर देण्यात येईल. राष्ट्रीय स्तरावर पुढील ३ वर्षात तप्त होणारे दिवे बदलून त्यांची जागा एल.ई.डी. दिवे घेतील.

# आपल्याला माहित आहे का ?

## राष्ट्रीय आयुष (AYUSH) मिशन

आयुर्वेद, युवानी सिद्ध आणि होमिओपॉथी या चार पारंपारिक, ऐतिहासिक उपचार पद्धतींचे महत्व मध्यंतरीच्या काळात कमी होऊ लागल्याने तसेचं भारतीय, विदेशी विद्यार्थ्यांना या औषधोपचार पद्धतींचे ज्ञान व्हावे, या पद्धतींवर संशोधन व्हावे या दृष्टीने केंद्र सरकारने, राष्ट्रीय आयुष मिशन स्थापन केले असून याद्वारे या औषधांच्या निर्मितीवर दर्जा नियंत्रणासाठी मदत झाली आहे. आयुष स्थापन झाल्यापासून संबंधित हॉस्पिटलला कच्चा माल मुबलक प्रमाणात मिळायला सुरुवात झाली आहे. नॉन अलायन्स मुव्हमेंट अर्थात नाम द्वारे आयुषाचा प्रचार प्रसार करण्यात येत आहे.

हे मिशन आरोग्य शिक्षण पुरविणा-या दर्जेदार संस्थांच्या संख्येत वाढ करुन आयुष शिक्षणात सुधारणा करेल. आयुष सेवा उत्तमप्रकारे जनतेपर्यंत पोहोचली जावी यासाठी आयुष मार्फत इस्पितळे, दवाखाने यांच्या संख्येत वाढ केली जाईल, औषधे आणि मनुष्यबळ सहज उपलब्ध करुन दिले जाईल, आयुष यंत्रणेसाठी कच्चामालाचा पुरेसा पुरवठा केला जाईल, दर्जेदार कच्च्या मालाचा सातत्याने पुरवठा राहावा म्हणून आणि दर्जात्मक मानकांसाठी प्रमाणित यंत्रणेला पाठिंबा द्यावा म्हणून योग्य शेती उत्पादने अर्थात Good Agricultural Products (GAP) चा अवलंब करुन औषधी वनस्पतींच्या पिकांच्या शेतीला उत्तेजन दिले जाईल, फार्मसीज, दवाखाने, औषधीय प्रयोगशाळा आणि आयुष औषधांमध्ये सुधारणा करुन त्यांचा दर्जा नियंत्रित केला जाईल. तसेचं एकूण आर्थिक स्त्रोताच्या २०% स्त्रोत हे राज्य व केंद्रशासित सरकारांनी सुचविलेल्या आयुष अधिक परिवर्तनशील घटकांसाठी खर्च करीत आहे.

राष्ट्रीय पातळीवर हे मिशन राष्ट्रीय मिशन संचालनालय शासित करते. त्याचा सचिव राष्ट्रीय आयुष मिशनचा अध्यक्ष असतो तर राज्य पातळीवर मिशन 'स्टेट आयुष मिशन सोसायटी' शासित तथा कार्यवाहित करते. त्याचा मुख्य सचिव हा अध्यक्षीय पद भूषवतो.

# आर्थिक विकासासाठी भारताची आर्थिक मुत्सद्देगिरी

**— राम उपेंद्र दास**



**आर्थिक मुत्सद्देगिरीत फार मोठ्या प्रमाणावर बदल झाले असून सरकारी पातळीवरील परंपरागत पद्धतीचा संवाद आणि राजकीय व लष्करी भेटीगाठी याव्यतिरिक्त जनतेचा-जनतेशी संपर्क आणि देशा-देशांमध्ये आर्थिक देवाणघेवाण यांचा त्यात समावेश झाला आहे. अशाप्रकारे, द्विपक्षीय तसेच प्रादेशिक पातळयांवर, सध्या वापरात असलेल्या साहित्यातदेखील सुचवण्यात आल्याप्रमाणे व्यापक स्वरूपाच्या आर्थिक दुव्यांच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक मुत्सद्देगिरीचा वापर करणे अधिक अर्थपूर्ण ठरले आहे. प्राथमिकता दोन्ही बाजूंना प्रवाही असल्याने देशांतर्गत आणि परकीय, परराष्ट्रीय करार यांच्यामध्ये स्पष्टपणे फरक करणे अवघड असल्याचे देखील लक्षात आले आहे.**

भारताच्या जागतिक स्तरावरील आर्थिक हितसंबंधांनी आकाशाला नव्याने गवसणी घातली असून भविष्यात ते आणखी उंची गाठतील अशी अपेक्षा आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांमुळे गुंतागुंतीच्या आणि विविध प्रकारच्या क्रिया-प्रतिक्रियांना सामोरे जावे लागत असल्याने हे स्पष्टपणे समजून घेण्याची आवश्यकता आहे. त्याचा महत्त्वाचा परिणाम हा धोरण निश्चितीची प्रक्रिया आणि बाजारपेठेमुळे मिळालेली प्रेरणा यावरदेखील होतो. मुत्सद्देगिरी आणि आर्थिक मुत्सद्देगिरी या दोन्हींना या संदर्भात नवीन अर्थ प्राप्त झाले असून दोन्हीचे मतप्रवाह भिन्न आहेत.

**आर्थिक मुत्सद्देगिरीचा नवा संदर्भ**

स्वतंत्र देशांच्या सरकारदरम्यानचे अधिकृत संबंध हाताळण्यासाठी वापरली जाणारी बुद्धिमत्ता आणि चातुर्य म्हणजे मुत्सद्देगिरी असे मुत्सद्देगिरीच्या एका व्याख्येत मानले जाते. (सॅटॉ, १९६१). मात्र, काळाच्या ओघात मुत्सद्देगिरीच्या क्षेत्रात नव्या दृष्टिकोनांचा समावेश झाला आहे. एक म्हणजे, देशा-देशांमधील देवाण-घेवाण ही काही आता केवळ अधिकृत स्तरावर असलेल्या दोन सरकारमधील संबंधांपुरती मर्यादित राहिलेली नाही, त्याऐवजी एका देशातील जनतेचा दुसऱ्या देशातील जनतेशी असलेला संपर्कदेखील वाढला आहे. दुसरे म्हणजे, मुक्त आर्थिक धोरण आणि उदारीकरणाच्या युगात राजकीय, लष्करी आणि व्यूहरचनात्मक हितसंबंधांच्या दृष्टिकोनातून देशा-देशांमधील संबंधांत असलेल्या प्राथमिकता वाढत्या प्रमाणात दुय्यम ठरत आहेत आणि आर्थिक देवाणघेवाणीच्या अंगाने त्याकडे बघितले जात आहे. आंतरराष्ट्रीय हितसंबंधातील या दोन वैशिष्ट्यांनी भारताच्या संदर्भातदेखील आर्थिक मुत्सद्देगिरीला प्राथमिकता मिळवून दिली आहे.

बहुपक्षीय, प्रादेशिक आणि द्विपक्षीय स्तरांवर होत असलेल्या संस्थात्मक घडामोडींमुळे आर्थिक मुत्सद्देगिरीला देखील फार मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. यामध्ये ब्रेटॉन वूडस् इन्स्टिट्यूशन्सच्या बाबतीत झालेला भ्रमनिरास त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रांचे संरक्षण प्राप्त असतानाही कोणताच अर्थपूर्ण आर्थिक करार होऊ न देणे आणि दोहा येथे झालेल्या परिषदेतील चर्चेनंतरही जागतिक व्यापार संघटनेच्या वाटाघाटींमध्ये पुरेशी प्रगती होऊ न शकणे यांचादेखील समावेश आहे. दुसरीकडे द्विपक्षीय आणि प्रादेशिक स्तरावरील आर्थिक करारांच्या प्रमाणात सर्वत्र अभूतपूर्व वाढ होत आहेत. आर्थिक सहकार्य करारांमध्ये वस्तू व्यापाराच्या जोडीला सेवा आणि गुंतवणूक यांच्या व्यापाराचा समावेश

झाल्याने हा आर्थिक करारदेखील अधिक सर्वसमावेशक होत आहेत. त्यांच्या वाटाघाटी वेगवान होत असून स्वयंस्फूर्त ताकद म्हणून ते उदयाला आले आहेत. (दास आणि इतर, २०१२). जगाच्या विविध भागात आर्थिक मुत्सद्देगिरीच्या अनेकविध व्यूहरचना उदयाला येण्यासाठी यामुळे मोठी चालना मिळाली.

**दृष्टिकोनातील आमुलाग्र बदलाच्या अनिवार्यता : शांतता आणि समृद्धीच्या दिशेने मार्गक्रमण**

आर्थिक मुत्सद्देगिरी अधिक प्रभावी बनवायची असेल तर आपल्या देशाच्या इतर देशांबरोबर असलेल्या बांधिलकीच्या दृष्टिकोनात आमुलाग्र परिवर्तन करण्याच्या अनिवार्यतेवर भर देणे महत्त्वाचे आहे. याचा अर्थ असा असू शकेल की, आर्थिक मुत्सद्देगिरीच्या मागील भूमिका द्विपक्षीय पातळीवर शांतता प्रस्थापित करण्यासाठी सहाय्यभूत ठरेल अशी असावी आणि ती प्रत्यक्षात अस्तित्वात येण्यासाठी आर्थिक मुत्सद्देगिरीद्वारे 'शांतता निर्माण करणाऱ्या समृद्धी' वर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. याचा अर्थ असा की, इतर देशांशी पहिल्यांदा शांततामय संबंध निर्माण करण्याचा आणि त्यानंतर आर्थिक बांधिलकी अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा ती दृढ होण्यापूर्वीच त्याचे परिणाम दिसू लागतील अशा स्वरूपात प्रयत्न केले गेले पाहिजेत. ज्यायोगे, शांतता निर्माण करण्यासाठी द्विपक्षीय आणि प्रादेशिक करारांच्या माध्यमातून आर्थिक समृद्धी साधण्यावर लक्ष केंद्रीत करता येईल, परिणामी, जागतिक शांतता प्रस्थापित करण्यातील पायाचा दगड म्हणून ते कार्य करू शकतील. आर्थिक मुत्सद्देगिरीचा पाठपुरावा करण्यासाठी सर्वाधिक स्पष्ट आणि औचित्यपूर्ण ठरेल अशा लिखित साहित्याचा उल्लेख करणे या संदर्भात महत्त्वाचे आहे.

फ्रेंच तत्ववेत्ता माँटेस्क्यू (१७४८) यांच्या मते शांतता हा 'आर्थिक व्यवहारांचा नैसर्गिक परिणाम' असतो. इटलीतील अर्थतज्ञ पार्शो (१८८९) यांनी असे म्हटले आहे की, देशा-देशांमध्ये शांतता स्थापित करण्यात व्यापाराला देण्यात येणारा पाठिंबा सहाय्यभूत ठरू शकतो. या विधानांवरून असे दिसून येते की, प्रादेशिक आर्थिक एकात्मतेतून सदस्य देशांना शांततेचे फायदे मिळू शकतात हे फार पूर्वीच अनुभवास आले होते. (शिफ्स आणि विन्टर्स, २००३, पान १८९वर नमूद केल्याप्रमाणे).

अगदी अलिकडच्या काळात, ब्राऊन आणि इतरांच्या (२००५) मताप्रमाणे, प्रादेशिक व्यापार एकात्मतेतून शांततेचे फायदे मिळू शकतात असे सुचविणारे असंख्य दावे करण्यात आले आहेत. त्यातील काही दावे असे : (i) आर्थिक एकात्मतेमुळे व्यापारातून मिळणाऱ्या फायद्यावर विपरीत परिणाम होऊ शकत असल्याने प्रत्येक देशासाठी संघर्ष अधिक तोट्याचा ठरतो; (ii) युद्धाच्या परिसरातील जमिनीतून हिऱ्यांचे उत्खनन करून त्याच्या विक्रीतून मिळणारा पैसा घुसखोरीसारख्या कामांसाठी पुरवणे (blood diamonds) आणि लाकडाचा अवैध व्यापार यासारख्या व्यापारात संघर्ष निर्माण करणारी कारणे कमी करण्यात प्रादेशिक सहकार्य सहाय्यभूत ठरू शकते. उदाहरणार्थ, १९९८ मध्ये पश्चिम आफ्रिकी देशांच्या आर्थिक समुदायाने (ECOWAS) अन्य सदस्य देशांच्या परवानगीशिवाय नवीन शस्त्रे आयात करण्यावर बंदी घालून प्रथमच लहान शस्त्रे रोखण्याची प्रादेशिक स्तरावर व्यवस्था केली; आणि (iii) प्रादेशिक व्यापार करारांमुळे विवादास्पद मुद्दे गैर-लष्करी मार्गाने सोडवण्याची तसेच देशा-देशात समन्वय व संवाद वाढवण्याची संधी उपलब्ध झाली.

ली आणि प्यून (२००९) यांच्या मते, माँटेस्क्यू, कान्ट, अँगेल आणि स्कम्पटर यांनीदेखील राज्यशास्त्रामधील "मुक्त शांतता" हा दृष्टिकोन परस्परावलंबी आर्थिक सहकार्यामुळे शांततेचा राजमार्ग तयार होऊ शकतो यावर भर दिला आहे. याचा अर्थ असा की, द्विपक्षीय आर्थिक परस्परावलंबित्वामुळे दोन देशांमधील संबंधांमध्ये लष्कराचा उपयोग कमी होतो. देशा-देशांमधील करारामुळे होणारे व्यापारी फायदे गमावावे लागण्याची किंमत मोजावी लागण्याची शक्यता असल्याने एखादा देश व्यापारी सहकार्य असलेल्या अन्य देशाशी संघर्ष करण्याची शक्यता कमी असते. त्यापेक्षादेखील परस्पर संघर्षावर होणारा व्यापारी एकात्मतेचा परिणाम त्या दोन विशिष्ट

देशांच्या गुणधर्मांवर अवलंबून असल्याने वेगवेगळा असतो. शिफ्स आणि विंटर्स (१९९८) यांच्या मते, शेजारील देशांमधील व्यापारामुळे, त्या देशांमधील परस्पर विश्वास आणि संवाद वाढल्याने, सुरक्षिततेची भावना वाढीला लागते. मार्टीन आणि इतरांनी (२०१०), प्रादेशिक व्यापार करारावर (RTA) स्वाक्षरी करायची की नाही, याबाबतचा निर्णय घेण्यासाठीच्या विविध पद्धती उलगडून दाखवण्यासाठी एक साधी सैद्धांतिक कार्यपद्धती प्रत्यक्ष उपयोगात आणली. राजकीय नेते नेहमीच्या प्रमाणित व्यापारी फायद्यांच्या बरोबरीने शांतता वाढीला लावणाऱ्या सुरक्षेच्या हिताचे दोन प्रकार विचारात घेतात : (i) विवादास्पद विषयांवर तोडगा काढता येत असल्याने प्रादेशिक व्यापार करारांचा उपयोग राजकीय मंचासारखा होतो; आणि (ii) प्रादेशिक व्यापार करारांमुळे सुसंधींसाठी मोजावी लागणारी किंमत व्यापारात घट करणाऱ्या कोणत्याही संभाव्य युद्धामुळे वाढते.

सदस्य देशांमध्ये शांतता वाढीला लागावी या प्रमुख हेतूने अनेक व्यापारी करारांची आखणी करण्यात आली. उदाहरणार्थ, दक्षिण-पूर्व आशियाई देशांची संघटना (ASEAN) आणि दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (SAARC) यारखे प्रादेशिक गट बिगर आर्थिक क्षेत्रातील सहकार्याच्या आधारावर सुरू झाले आणि औपचारिक व्यापार करारांच्या स्वरूपातील आर्थिक विषयपत्रिका त्यांच्या चर्चांमध्ये खूप नंतर आली. याचप्रमाणे, अर्जेंटिना आणि ब्राझील या देशांमधील तणाव दूर करण्यासाठी मूळात MERCOSUR ची स्थापना करण्यात आली. सन २००० मध्ये, युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या बाल्कन क्षेत्राची आर्थिक घडी बसवण्यास आणि एकात्मता निर्माण करण्यास चालना देण्यासाठी मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण करण्याचे प्रयत्न दक्षिण-पूर्व युरोपमध्ये करण्यात आले. सन २००४ मध्ये इजिप्त आणि ईस्रायल या देशांनी अमेरिकेबरोबरच्या व्यापारी शिष्टाचार करारावर स्वाक्षरी केली. त्यात इजिप्तच्या वस्तूमालाला अमेरिकेच्या बाजारपेठेत मुक्त प्रवेश मिळेल अशी पाच विशेष क्षेत्र निर्माण करण्याच्या कराराचा समावेश होता. या वस्तूमालापैकी ३५ टक्के माल इस्रायल-इजिप्त यांच्या सहकार्यातून तयार झालेला असला पाहिजे. (ब्राऊन आणि इतर २००५). आफ्रिकेतील रक्तरंजित संघर्षांमुळे असे मानण्यात येते आणि तसा दावाही केला जातो की, संघर्षाची मूळ कारणे कमीतकमी करून प्रादेशिक व्यापार करारांमुळे परिस्थिती नियंत्रणात ठेवता येऊ शकते. त्यामुळे शेजारी देशांमधील संशयाचे वातावरण दूर करता येऊ शकते. प्रादेशिक करारांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिल्याने देशा-देशातील संघर्ष टाळता येऊ शकतो. (आफ्रिकी विकास बँक, २०००).

थोडक्यात, प्रादेशिक व्यापार करार अस्तित्वात आल्यामुळे सदस्य देशांमधील लष्करी संघर्ष घसरणीला लागला आहे आणि शांततेला चालना मिळाली आहे यावर सध्या अस्तित्वात असलेल्या लिखीत साहित्यातून भर देण्यात आला आहे.

**देशांतर्गत आणि परदेशातील दुहेरी प्रासंगिकता**

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अन्य एका अतिशय महत्वाच्या दृष्टिकोनाकडे लक्ष वेधण्याची गरज आहे व आर्थिक मुत्सद्देगिरीच्या संदर्भात त्यावर मत मांडणे अतिशय प्रस्तुत ठरेल आणि तो म्हणजे देशांतर्गत आर्थिक अनिवार्यता व देशाबाहेरील, परदेशातील आर्थिक परिस्थिती यांच्यातील दुवा. प्रासंगिकता दोन्ही दिशांनी प्रवाही असते, ज्यामुळे देशांतर्गत आणि परदेशातील निकषांबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केली जातात. आर्थिक मुत्सद्देगिरीचा संबंध आंतरराष्ट्रीय आर्थिक मुद्यांशी असतो. तत्त्वत:, यामुळे विश्लेषण साधेसोपे व्हायला हवे. मात्र, 'देशांतर्गत' कशाला म्हणायचे आणि 'आंतरराष्ट्रीय' म्हणजे काय यांच्यात कोणतीही स्पष्ट रेषा आखणे सातत्याने कठीण होत चालले आहे. १९५० च्या दशकापासून आर्थिक परस्परावलंबित्वात वाढ होत असून गेल्या काही वर्षात त्याला गती मिळाली आहे. याचाच अर्थ यापूर्वी ज्याला देशांतर्गत (किंवा युरोपीय) मानले जात होते त्यालाच आता आंतरराष्ट्रीय वाटाघाटींमध्ये स्थान मिळाले आहे. (बायेन आणि वूलकॉक, २००३).

अशा परिस्थितीत, परदेशांच्या संदर्भात भारताने घेतलेले देशांतर्गत आर्थिक विकासासाठीचे पुढाकार लक्षात घेणे महत्त्वाचे ठरेल, ज्यामुळे आर्थिक मुत्सद्देगिरी अधिक हेतुपूर्वक पद्धतीने पुढे नेता येईल.

**'मेक इन इंडिया'चे आंतरराष्ट्रीय महत्त्व**

भारताच्या पंतप्रधानांनी 'मेक इन इंडिया'साठी घेतलेल्या पुढाकारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दीर्घ काळापासूनच्या गरजा पूर्ण होणार आहेत. मात्र, त्यात उत्पादन क्षेत्राच्या वाढीवर आणि रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला असल्याने नेहमीच चुकीने त्याचा संबंध केवळ 'देशाच्या अर्थव्यवस्थे'शीच असल्याचे समजण्यात येते. तसे जरी असले तरी या पुढाकाराला महत्त्वाचा परदेशी आयाम आहे आणि अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रांपेक्षा उत्पादन क्षेत्र वेगळे काढता येत नाही.

सध्या, परकीय थेट गुंतवणुकीचा देशात येणारा आणि देशातून बाहेर जाणारा ओघ तसेच वस्तू आणि सेवा यांचा व्यापार याची बेरीज केली तर ती अगदी हात राखून केलेल्या कोणत्याही अंदाजानुसार देखील भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या निम्म्यापेक्षा जास्त आहे. उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील तुलनात्मक आणि स्पर्धात्मक फायद्यांसह विविध घटकांमुळे परकीय क्षेत्रांचा पूर्व-प्रभाव दिसून येतो; परदेशी भांडवलाची अनिवार्यता, तंत्रज्ञान, कौशल्य आणि व्यवस्थापकीय तज्ञता, प्रादेशिक मूल्य व्यवस्था हे इतर घटकांपैकी आहेत. देशांतर्गत आणि परकीय अशा दोन्ही स्वरूपाच्या अर्थकारणाची अनिवार्यता व त्यांचे परस्पर आंतरसंबंध 'मेक इन इंडिया'साठीचा पुढाकार अधोरेखित करतात हे स्पष्टपणे लक्षात येते : विशेष करून आर्थिक मुत्सद्देगिरीच्या प्रारंभापासून आणि त्याची रूपरेषा ठरवण्यापर्यंत.

'वाढीचे इंजिन' म्हणून उत्पादन क्षेत्र समजून घेणे अतिशय सोपे आहे. पुरवठा आणि मागणी अशा दोन्ही बाजूंनी ते आपले योगदान देते. त्याचा परिणाम उत्पादकतेद्वारे तर रोजगारामुळे अर्थव्यवस्था व्यापक होण्यातून दिसून येतो. उत्पादनातील विशेषत: संशोधन आणि रोजगार निर्मिती यांच्यामुळे उत्पादन क्षेत्राच्या वाढीला चालना देण्यासाठीची विशेष गुणवत्ता आहे असे अभ्यासांमधून दिसून आले आहे. बाजारपेठेतील मर्यादांच्या प्रमाणामुळे उत्पादन क्षेत्राची एकाच देशात नेहमीच वाढ होत नसल्याने अर्थव्यवस्थेच्या विस्ताराचे फायदे मिळण्यावर बंधने येतात. जसे की, मागणीचा बाजूकडील अभाव आणि तंत्रज्ञानात्मक आणि उत्पादकतेतील अभाव यांच्यामुळे विशेषज्ञतेला मर्यादित संधी. म्हणजेच पुरवठ्याच्या अभाव, व्यापार आणि परकीय थेट गुंतवणूक यांच्या माध्यमातून सर्व देशांमधील प्रादेशिक आर्थिक एकात्मता हीच टिकून राहू शकेल असा पर्याय ठरतो. याचे कारण उत्पादित मालाच्या संदर्भात करपात्र आणि करमुक्त असे उदारीकरण व सेवांमधील नियमनांचे उदारीकरण यामुळे सहकारी देशांमधील बाजारपेठेतील प्रवेशात वाढ झाली, त्यातून मागणीकडील अभाव समोर आला. दुसऱ्या बाजूला, पुरवठ्याच्या बाजूकडील अभावांवर प्रादेशिक परकीय थेट गुंतवणुकीच्या सुविधेच्या माध्यमातून तोडगा काढता येऊ शकतो, ज्यामुळे केवळ आर्थिक पाठबळच उपलब्ध होते असे नाही तर प्रादेशिक परिस्थिती तसेच व्यवस्थापकीय व तांत्रिक कौशल्य यांना अनुरूप असे तंत्रज्ञान देखील उपलब्ध होते. असे असले तरी हे स्पष्ट आहे की, उत्पादन क्षेत्राला वाढीचे इंजिन बनवण्यासाठी प्रादेशिक व्यापाराबाबत एकात्म दृष्टिकोन आणि गुंतवणूक एकात्मता आवश्यक ठरू शकते. यातूनच आर्थिक विकासाला हातभार लागू शकतो, हे घडून येण्यासाठी आर्थिक मुत्सद्देगिरीत प्रादेशिक एकात्मतेच्या अर्थकारणाची दखल घेतली गेली पाहिजे.

या विश्लेषणात पुढे जाऊन असे म्हणता येईल की, उत्पादित वस्तूमालाच्या व्यापाराच्या जोडीला सेवांच्या व्यापारासाठी संस्थात्मक संरचना अस्तित्वात आल्याशिवाय उत्पादित वस्तूंच्या व्यापारात वाढ करता येणार नाही. उदाहरणार्थ, माल पाठवल्यानंतरची पत, पाठविलेल्या मालाचा विमा, बँकेची हमी, वाहतूक सेवा इ. यासारख्या सोयीसुविधा उपलब्ध असणे या सर्व गोष्टी वस्तूमालाच्या व्यापारात मोडतात, ज्या केवळ व्यापारासाठी सोयीसुविधा

पुरवत नाहीत तर निर्यातीच्या कार्यक्षमतेतदेखील भर घालतात. दुसऱ्या बाजूला, आरोग्यासारख्या क्षेत्रातील सेवांचा व्यापार हा आरोग्य सेवा देणाऱ्यांचा विश्वास असलेली वैद्यकीय उपकरणे आणि औषधे यासारख्या या विशिष्ट सेवा क्षेत्राशी संबंधित वस्तूमालाच्या व्यापारावर अवलंबून असतो. अशाप्रकारे, कोणत्याही प्रादेशिक व्यापार करारात हा वस्तूमाल आणि सेवा यांच्यातील दोन्ही बाजूंचा दुवा लक्षात घ्यावा लागतो. मात्र, प्रत्यक्षात याच्या अगदी विरूद्ध परिस्थिती देखील दिसून येते. प्रत्यक्षात अनुभवता येणाऱ्या आणि न येणाऱ्या वस्तू यांच्यात परस्परसंबंध नसल्याचे वाढते प्रमाण लक्षात घेता, उदाहरणार्थ, बांधकाम क्षेत्र आणि पतपुरवठा क्षेत्र, वस्तूमालाचा व्यापार आणि सेवांचा व्यापार, यामध्ये वाढीचे स्वत:चे स्वतंत्र मार्ग अवलंबले जात असल्याचे दिसून येते. कोणत्याही परिस्थितीत वस्तूमाल आणि सेवा या दोन्हींच्या व्यापारातील स्वायत्त प्रवाहांचा हिशोब मांडला पाहिजे. पायाभूत सेवांच्या सुधारणांमधील सहकार्य हे व्यवहारासाठी येणारा खर्च कमी करण्यासाठी, प्रादेशिक संदर्भ लक्षात घेऊन उत्पादने स्वस्तात उपलब्ध करून देण्यासाठी सहाय्यभूत ठरते हे वास्तव लक्षात घेऊन हा अतिरिक्त मुद्दा मांडला आहे.

व्यापार-गुंतवणूक यांच्यातील दुवा मजबूत करणे हे प्रादेशिक व्यापार आणि त्याचा विकासात्मक प्रभाव उच्च पातळीवर नेण्यासाठी अतिशय महत्त्वाचे असल्याचे मान्य करण्याची गरज आहे. प्रादेशिक गटातील देशांमध्ये निर्यात पुरवठ्याची क्षमता वाढवण्यासाठी असे दुवे सहाय्यभूत ठरतात. त्यामुळे व्यापार उदारीकरणाचा फायदा उठवण्यासाठी केलेल्या गुंतवणुकीतून प्रादेशिक स्तरावर अधिक रोजगार देखील निर्माण होतात. मुक्त व्यापार करारामुळे गुंतवणुकीचा ओघ कार्यक्षमतेच्या शोधात जेव्हा नव्या प्रदेशात वेगाने येतो तेव्हा व्यापारनिर्मिती करणारे संयुक्त उपक्रमच प्रादेशिक व्यापाराच्या वाढीवर निर्णायक प्रभाव पाडतात. व्यापारनिर्मिती करणारे संयुक्त उपक्रम प्रादेशिक मुक्त आर्थिक कराराचा फायदा उठवण्याच्या स्थितीत असतात. उत्पादन क्षेत्राच्या वाढीच्या गतिमानतेवर थेट परिणाम होत असतो.

या संदर्भात, परस्परांच्या देशात गुंतवणूक करून सर्व स्तरांवर एकात्मभाव आणि समांतर पातळीवरील विशेषज्ञत्व यावर देखील लक्ष केंद्रीत केले तर व्यापार-गुंतवणूक यांच्यातील दुवे मजबूत होतात, मोठ्या प्रमाणातील व्यापार आणि गुंतवणुकीचा ओघ यांच्या माध्यमातून होणाऱ्या फायद्यांमुळे फार मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करणे शक्य झाले आहे. एखाद्या विशिष्ट उद्योगात प्रादेशिक स्तरावर एकात्म पद्धतीने म्हणजे सर्व स्तरांवर एकात्मता, उत्पादनाच्या विविध पातळ्यांचे वितरण; आणि संपूर्ण प्रादेशिक स्तरावर उत्पादनाच्या वेगळेपणाच्या मदतीने उत्पादनाच्या एकाच पातळीवर विशेषज्ञत्व म्हणजे समांतर विशेषज्ञत्व असा याचा अर्थ नक्कीच असू शकेल.

वरीलप्रमाणे विचार केला तर रोजगार निर्मितीसाठी सकारात्मक अनिवार्यता असलेले वाढीचे इंजिन म्हणून उपयोगात येऊ शकेल असे प्रादेशिक समन्वय असलेले उत्पादन क्षेत्र निर्माण करण्याचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी प्रादेशिक संदर्भात प्रादेशिक मूल्य साखळ्या (RVCs) निर्माण करणे महत्त्वाचे ठरते.

उत्पादनाचा मुळ उद्देश निश्चित करण्यासाठींच्या नियमांचे एक प्रमुख कार्य म्हणजे विविध रुप रेखांद्वारे माहितीत मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणण्याचा असतो यासाठी मुक्त व्यापार करारातील व्यापार संतुलन आवश्यक आहे. असे असले तरी, हे नियम आणि त्यांची रुपरेखा एकत्रितपणे, उत्पादन होत असलेल्या देशात मुल्यवर्धनाची सुविधा उपलब्ध करतात. आणि रोजगार निर्मितीच्या परिणामांमधून विकासात्मक भूमिका पार पडतात ही बाब प्रशंसनीय नाही. हे मांडायचे कारण उत्पादन प्रक्रियेत मूल्यवर्धन केल्यामुळे कामगारांना रोजगार आणि पगार, भांडवलावर व्याज, जमिनीचे भाडे आणि उद्योजकांना नफा देण्याची परवानगी संस्थेला मिळते. याचा अर्थ उत्पादनात मूल्यवर्धन जितके अधिक तितकी केवळ कामगारच नाहीत तर उत्पादनातील सर्व घटकांना सहभाग करून घेण्याची शक्यता अधिक. उच्च प्रमाणात

मूल्यवर्धन म्हणजे तितक्या जास्त प्रमाणात नफा कमावण्याची उद्योजकांना मिळालेली संधी. थोडक्यात, मुक्त व्यापार कराराच्या अंतर्गत उत्पादनाच्या मूळ देशाबाबतचे नियम उत्पादनाबरोबरच त्यात वाढ करणे आणि रोजगार निर्मितीचा परिणाम साधणे याद्वारे विकासात्मक भूमिका बजावू शकतात.

अशाप्रकारे **'मेक इन इंडिया'** ही मोहिम अन्य क्षेत्रांबरोबरच उत्पादन क्षेत्राकडे एकात्म भावनेतून बघितले आणि उत्पादनाचा मूळ देश निश्चित करण्यासाठीच्या नियमांसारखे त्याचे बाह्य स्वरूप योग्य पद्धतीने समजून घेतले तर खणखणीत नाणे ठरू शकते. आंतरराष्ट्रीय करारमदारांचे अर्थकारण हा आर्थिक मुत्सद्देगिरीसाठीचा पाया ठरलाच पाहिजे यावर भर देणे अवघड नाही. अशा प्रयत्नातूनच रोजगार निर्मिती, गरीबी निर्मूलन आणि जनतेच्या जीवनमानात एकूणच सुधारणा यासारखी उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी आर्थिक मुत्सद्देगिरी सहाय्यभूत ठरावी यासाठीच तर अखेर हा सगळा खटाटोप असतो.

**समारोप**

वरील विवेचनावरून हे स्पष्ट झाले असेल की, असा एक पुढाकार जो देशांतर्गत समजला जातो पण ज्याला नक्कीच आंतरराष्ट्रीय महत्त्व आहेत तो म्हणजे **'मेक इन इंडिया'**. उत्पादन क्षेत्राच्या वाढीचे महत्त्व वाढवण्याचे आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे ध्येय असलेल्या या पुढाकाराकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर फार मोठ्या प्रमाणात लक्ष वेधले गेले आहे. परकीय थेट गुंतवणुकीसाठी भारत हा या प्रदेशातील अतिशय आकर्षक देशांपैकी एक देश आहे हे लक्षात घेता 'मेक इन इंडिया' सारख्या पुढाकाराने उच्च पातळीवरील आर्थिक विकास गाठण्यासाठी चालना मिळू शकते. मात्र, त्यासाठी उत्पादन क्षेत्रांची अर्थव्यवस्थेच्या अन्य क्षेत्राशी सांगड घालून एकात्म दृष्टिकोन स्वीकारावा लागेल आणि त्याचवेळेस बाह्य परिस्थितीचे स्पष्ट आकलन करून घ्यावे लागेल.

अशाप्रकारे, आंतरराष्ट्रीय वाटाघाटी आणि परराष्ट्र धोरणातील उद्दीष्टांमध्ये आर्थिक मुत्सद्देगिरीचा एक भाग म्हणून आर्थिक चिंतनाला स्थान देणे महत्त्वाचे आहे. या संदर्भात, भारताचे परराष्ट्र धोरण देशांतर्गत आर्थिक प्राधान्यांशी जोडण्यासाठी आणि आर्थिक विकासाची सुप्त क्षमता प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आणि जगातील एक मोठी आर्थिक सत्ता बनण्यासाठी एक साधन म्हणून आर्थिक मुत्सद्देगिरीचा अधिक प्रभावीपणे उपयोग करणे अनिवार्य झाले आहे.

*(**डॉ. राम उपेंद्र दास** हे नवी दिल्ली स्थित रिसर्च अँड इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर डेव्हलपिंग कंट्रीज, नवी दिल्ली या वैचारिक गटात प्राध्यापक आहेत.*

**संपर्कासाठी मेल**:
upendra@ris.org.in




विकास समर्पित
मासिक
**योजना**
नियमित वाचा,
वर्गणीदार व्हा.

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# आपल्याला माहित आहे का ?

☞ **औषध साक्षरतेचा शुभारंभ**

औषधांच्या किंमती तसेच उपलब्धता यांच्या माहितीकरिता ग्राहकमंचासाठी उपयोगी पडेल तसेच त्या संबंधित तक्रारींचे निराकरण करता येईल, याकरिता **'फार्मा जनसमाधान'** या संकेतस्थळाचा शुभारंभ अलिकडेच करण्यात आला. राष्ट्रीय औषधे किंमत प्राधिकरण अर्थात National Pharmaceutical Pricing Authority (NPPA) यांनी या संकेत स्थळाची निर्मिती केली आहे. या योजनेचा उद्देश असा की, औषधांसंबंधातील किंमती तथा उपलब्धता संबंधातील समस्यांचे निराकरण तात्काळ व्हावे. ई-गर्व्हनन्स सारख्या सशक्त माध्यमातून हे एक तऱ्हेचे शस्त्र, ग्राहकांचे हित जपण्यासाठी तसेच औषधे (किंमत नियंत्रण), अधिसूचना यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता तयार केले गेले आहे. **'फार्मा जनसमाधान'** योजनेमुळे औषध ग्राहकांना तसेच इतरांना त्यांच्या विविध तक्रारी मांडण्याकरिता ही ऑनलाईन सुविधा मिळणार आहे. उदा. औषधांसाठीची अरिरिक्त किंमत मोजावी लागणे किंवा औषधे उपलब्ध नसणे किंवा त्यांचा तुटवडा असणे इ. NPPAच्या संमतीशिवाय एखादे नवीन औषध विक्रीला आणणे, एखादे औषध पुरेसा साठा उपलब्ध असताना पुरवठा करण्यास नकार देणे, सबळ कारणाशिवाय ग्राहकाला उपलब्ध न करुन देणे. इत्यादीकरिता हे एखादे व्यासपीठच ठरावे. राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरण (NPPA) ही तक्रार मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासाच्या आत कार्यवाहीस प्रारंभ करते. हे औषध साक्षरता अभियान नियंत्रकापेक्षा समाजामध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य करेल अशी आशा आहे. त्याचबरोबर औषधाचा काळाबाजार रोखण्यावर तथा अप्रमाणित औषधांचा बाजार व औषधांच्या अवाजवी किंमतीवर देखील नियंत्रण आणू शकेल.

☞ **रोटा व्हायरस लसनिर्मिती**

आपल्याकडे प्रथमच विकसित व निर्मिती केलेली रोटा व्हायरस लस **'रोटाव्हिक'**चा शुभारंभ पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला. ही लस बालकांना डायरिया संबंधित आजारांवर उपयुक्त ठरणार असून खाजगी क्षेत्राशी केलेल्या भागीदारीतून उदयास आली आहे. केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, अमेरिकास्थित शासकीय संस्था उदा. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ तसेच भारत बायोटेक इंडिया लिमिटेड व इतर अशासकीय संस्था त्याचप्रमाणे बिल आणि मेलिंदा गेट प्रतिष्ठान आणि भारत बायोटेक इंडिया लिमिटेड यांनी या लसीचे विकसन आणि परिक्षण करण्यामध्ये मोलाची भूमिका बजावली. यासाठी त्यांनी सातत्याने २५ वर्षे अथक प्रयत्न केले. शुभारंभाप्रसंगी पंतप्रधानांनी मुक्त कंठाने बोलताना भारताच्या संशाधनातील उच्च क्षमतेच्या संशोधन आणि विकासाबद्दल प्रशंसोद्गार काढले. सद्य स्थितीतील आव्हान ठरलेल्या औषधक्षेत्रातील उत्पादने ही खाजगी क्षेत्राच्या भागीदारीतून सर्व सामान्यांना परवडतील अशाच तऱ्हेने निर्मिती करण्याचा मनोदय व्यक्त केला. पंतप्रधानांनी याच वेळी भारत व अमेरिका यांच्या संयुक्त भागीदारीतून निर्माण केलेल्या लसीचा सर्वसामान्यांना फायदाच होईल असेही म्हटले.

☞ **महिलांच्या शिक्षणाकरिता अंकीय मार्गदर्शिकेचा प्रारंभ**

अलीकडेच केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाने पौगंडावस्थेतील मुलींच्या शिक्षणाकरीता संगणकीय मार्गदर्शिकेचा शुभारंभ केला गेला. यात शालेय शिक्षण तसेच साक्षरता विभागानेसुद्ध पुढाकार घेतला. अशा तऱ्हेचे कार्यक्रम विकसित करण्याकरिता युनिसेफचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमांतर्गत मुलींच्या शिक्षणातील कमी असलेल्या

विभागाच्या शोध लावणे शक्य होईल. यामुळे विशेषत: अनुसुचित जाती जमाती तसेच मुस्लिम अल्पसंख्यांक यांच्या मधील मुलींच्या शिक्षणावर प्रकाश टाकणे शक्य होईल.

ही मार्गदर्शिका आपल्याला तुलनात्मक पृथ्थकरण करण्यास मदतगार ठरते. यात अंदाजे तीन वर्षांच्या अभ्यासाद्वारा माहिती संकलित झालेली असल्याने दृश्य स्वरुपातील दिसणारे बदल जोखता येतात. ज्यामुे प्रादेशिक प्रादेशिक पातळीवर सुरु केलेल्या बदलांमुळे काही बदल निदर्शनास येतात वा नाही याचीही पहाणी करता येते. अशा तऱ्हेचे हे मुक्त व्यासपीठ आहे. ज्यामध्ये अधिकृत व्यक्तीद्वारा आलेल्या माहितीमुळे अद्ययावतता आपोआप होते. युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्येकेशन (२०११-२०१४), जनगणना २०११ आणि जिल्हास्तरीय आरोग्य सर्वेक्षण (२००७-०८), यांकडून माहिती मिळवून जेन्डर ॲटलास अर्थात उपरोक्त मार्गदर्शिका राज्य, जिल्हा आणि घटक पातळीवर भौगोलिक आणि गणितीय बाबींमध्ये दिशादर्शन करते आणि प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील स्त्री शिक्षणाच्या मुख्य्य निर्देशकाविषयी अधिक माहिती पुरवते.

शारिरीक अपंगत्व असलेल्या मुलींसहित सर्व स्तरातील असुरक्षित समजल्या जाणाऱ्या बालिकांचा शोध घेऊन त्यांना बरोबरीचे शिक्षण देणे हाच ह्या अंकीय मार्गदर्शिकेचा मूळ उद्देश्य आहे. हे सहज साध्य होईल हे लक्षात घेता, ही मार्गदर्शिका निर्णायक ठिकाणी कृतीत उतरेल आणि व्यवस्थापनाच्या हातातील लक्ष्यवेधी साधनाच्या रुपाने विकसित राहील.


☞ **प्रवासीअभिमुख ऑनलाईन सेवेचा प्रारंभ**

ग्राहकांना तक्रार करणे किंवा सूचना करणे याकरिता, भारतीय रेल्वेने 'कन्झुमर कम्प्लेंट वेब पोर्टल अँड मोबाईल ॲप्लिकेशन' (अँड्रोइड विंडोज यावर आधारित) अलीकडेच सुरु केलेली आहे. ग्राहक तक्रार किंवा सूचना URL www.com.indianrailways.gov.in वरुन मोबाईल ॲप्लीकेशनद्वारा डाऊनलोड करु शकतात. तसेच ग्राहक किंवा प्रवासी www.com.indianrailways.gov.in या संकेत पत्रावर तक्रार नोंदवू शकतात, अन्यथा 91-9717630982 मोबाईल क्रमांकावर sms द्वारे तक्रार सूचना नोंदविण्याची सोय आहे.


☞ **अचूक मतदार याद्या**

भारतीय निवडणूक आयोगाने अलीकडेच 'राष्ट्रीय मतदार याद्या शुद्धीकरण व प्रमाणीकरण कार्यक्रम' राबवला आहे. National Electoral Roll Purification and Authentification Programme अर्थात (NERPAP) असे याचे संक्षिप्त स्वरुप आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदार यादी आधारकार्डाशी प्रमाणीकरणाकरिता संलग्न करण्यात येईल. या मोहिमांतर्गत सुधारणांवर लक्ष केंद्रीत करण्यावर तसेच चुकांमध्ये सुधारणा करण्यांवर भर दिला जाणार आहे. मतदारांना ह्यांच्या आधारकार्डा संबंधित माहिती स्वत:च भरण्याकरिता sms, इमेल, मोबाईल अनुज्ञप्ती तसेच नॅशनल व्होटर्स सर्व्हिस पोर्टल (NVSP) इ. चा वापर आयोगाच्या संकेतास्थळावरुन वापरता येईल. मतदान आधारकार्डासंबंधीची माहिती नोंदवण्याकरिता १९५० ह्या राज्यस्तरीय क्रमांकावर फोन करु शकतात. किंवा आधारकार्डाची प्रत तसेच EPICच्या कार्डाची प्रत कटाक्षाने हजर करु शकतात. या साऱ्या बरोबरच मतदाता नोंदणी अधिकारी (Electroral Registration Officer) आधारकार्डासंबंधात विविध मेळावे आयोजित करुन किंवा मतदाता संपर्क केंद्रे तसेच 'ई' सेवा केंद्रे, इत्यादीच्या माध्यमातून याचा उपयोग करुन प्रसार करु शकतात. बुध लेवल अधिकारी घरोघरी सर्वेक्षण करुन माहिती जमा करतात. दिनांक १२.०४.२०१५ रोजी आयोगाचे नोंदणी अधिकारी देशव्यापी मोहीम राबवणार आहेत. याच मोहीमेअंतर्गत ज्या मतदारांची एकापेक्षा अधिक वेळा नोंदणी झाली असल्यास आपणहून खुलासा करण्याची संधी देखील देण्यात आली आहे. १५ ऑगस्ट २०१५ला हा कार्याक्रम पूर्णत्वाला गेलेला असेल.

# REACTIONS OF SOME SUCCESSFUL STUDENTS IN UPSC



**Vivekanad Jadhwar**
(AIR 799 / 2014)
"During my initial journey of civil services Preparation the book by Ranjan Kolambe sir Was the base. Sir has very good skill to make things simple. It helped me a lot in UPSC preparation. Thank you sir."



**Rajesh Gavali**
(AIR 1118 / 2014)
"Ranjan sir harbours a Mircro University in himself: teaching of many subjects in simple yet organised manners."




**Harshit D. Bari (IRS)**
" Known as 'one man army ', Ranjan Sir is the best bet."



**Adinath Dagde**
(AIR 1000 / 2014)



**Vijay Kulange**
(AIR 176 / 2013)
" Importance and relevance of Ranjan Kolambe Sir to Civil Services coaching is beyond doubt, his very name instills confidence."



**Dr. Satish Shitole (IRS)**
**(AIR 514 / 2013)**
" Bhagirath Symbolizes hard work, It's manifestation in this sector is Ranjan Kolambe Sir, and it's reflection is unmistakably found in his vast student community".

***Our Publications by :*** **Ranjan Kolambe Sir**




## MPSC RESULT 2014-15

**40 + Students Class - I**


**109 + Student Class- II**

## UPSC | MPSC

**Mains + Prelim** पूर्व + मुख्य परिक्षा

FOUNDATION BATCH 2015-16
BATCHES STARTS FROM 1 JULY 2015

**By : Ranjan Kolambe & Bhagirath Team**



**अभयसिंह मोहिते**
(Dy. Collector) **राज्यात प्रथम**
माझ्या यशामध्ये रंजन कोळंबे सर आणि सरांच्या पुस्तकांचा मोलाचा वाटा आहे. सरांच्या मॉक इंटरव्ह्युचा मला खूप फायदा झाला.



**समाधान शेंडगे**
(Dy. Collector) **राज्यात द्वितीय**
सरांच्या पुस्तकांचा मला UPSC व MPSC दोन्ही परीक्षांसाठी खुप फायदा झाला आहे. आणि मी सलग दोन वर्षे सरांकडे मॉक इंटरव्ह्यू दिला, सरांनी विचारलेले प्रश्नच मला आयोगांच्या पॅनलमध्ये विचारण्यात आले.



**प्रशांत खेडेकर**
(Dy. Collector) **राज्यात तृतीय**
MPSC चा अभ्यास सुरु करतांना सर्वात पहिले पुस्तक वाचलं ते रंजन कोळंबे सरांचे 'भारतीय अर्थव्यवस्था' माझ्या यशामध्ये सरांच्या सर्व पुस्तकांचा सिंहाचा वाटा आहे.



**वनश्री लाभशेटवार**
(Dy. Collector) **मुलींमध्ये प्रथम**
रंजन कोळंबे सरांच्या इंटरव्हूचा मला खुप फायदा झाला. माझ्यातल्या Positive Quality आणि अजून काय करण्याची गरज आहे, याचे खुप चांगले मार्गदर्शन केले आणि इंटरव्हुच्या लेक्चरमध्ये पण मुलांनी कुठल्या विषयाचा अभ्यास करावा यापासुन कुठला पोषाख घालून इंटरव्हूला जावे इथपर्यंत सरांनी मुलांना मार्गदर्शन केले रंजन सरांसारखे मार्गदर्शन कुणी करु शकत नाही.



**स्नेहल कनिचे**
(Dy. Collector)
रंजन कोळंबे सर म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानमुर्ती, मार्गदर्शनाबरोबर जिद्द, चिकाटी ! जे येथील भगिरथी ते नक्कीच होतील अधिकारी ! भगिरथ प्रयत्न व रंजन सरांचे मार्गदर्शन यामुळे अशक्य स्वप्न सहज सोपे झाले.

'विद्यादाना' च्या पवित्र कार्याचे संपूर्ण 'व्यापारीकरण' कधी झाले कळलेच नाही ! 'जाहिरात म्हणजे कायद्याच्या चौकटीत राहुन केलेली थापेबाजी होय' हे H.G.Wells या ब्रिटिश विचारवंताचे वक्तव्य अक्षरश: खरे करण्याची चढाओढ सुरू झाली. ''आमचे १०० विद्यार्थी पास झाले'' असे जर चार संस्था म्हणत असतील तर त्यातील ९० विद्यार्थी कॉमन असतात. कारण सर्वश्रुत आहे. पुण्यात-महाराष्ट्रात स्पर्धा परीक्षार्थींच्या यशासाठी मनापासून झटणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. 'भगीरथ ॲकॅडमी' ही त्यातील एक! वर्षातून केवळ दोन बॅचेस! "Teaching Quality + Quantity + मर्यादीत फी' या त्रिसुत्रीने 'अद्वितीय' ठरलेली! त्यामुळे 'भगीरथ ॲकॅडमी' च्या योग्यतेची पूर्ण खात्री असल्याशिवाय प्रवेश घेऊ नका. अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेट द्या किंवा जाणकारांकडून माहिती मिळवा. खरे यश विद्यार्थ्यांचेच, त्यांच्या कष्टाचे व इच्छाशक्तीचे ! खऱ्या खुऱ्या 'भगीरथा' प्रमाणे! आमचा वाटा केवळ खारीचा !!!!

... रंजन कोळंबे

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC

मंत्री हाईटस, २ रा मजला, शनिवार पेठ, पुणे -३०.
फोन नं. : ०२०-६४०१३४५० ९९७०२९८९९७

www.bhagirathacademy.com
bhagirathacademypune@gmail.com
Bhagirath IAS Academy

# भारत चीन संबंध — युद्धापेक्षा विकास बरा

**— भावना गोखले**



**केंद्रसरकारला विविध राज्यांच्या सीमावादाच्या प्रश्नांसकट शेजारील छोटीमोठी राष्ट्रे, त्यांचे सार्वभौमत्व जपणे, स्वातंत्र्यबाबत जागरुकते-दरम्यान सीमेवरील तणाव न वाढू देणे याकडे लक्ष देण्याची अत्यंत गरज असते. भारत-चीन सीमा तणावाकडे दोन्ही राष्ट्रांनी डोळस नीती अवलंबून, प्रामुख्याने भारताने चीन बाबत सामंजस्य धोरण पत्करले होते. क्षेत्रनीहाय सर्वांगीण विकासादरम्यान चीनमधील विकासित क्षेत्रे, त्यांचे निर्यात धोरण, चीनचा डरडोई उत्पन्नाचा दर, त्यांच्या आर्थिक विकास दराशी जुळण्या करता भारत विकासित आर्थिक वृद्धी सहज गाठू शकेल. हा आत्मविश्वास भारतीय अर्थतज्ञांना आहे. परंतु त्याचबरोबर सीमा प्रश्नावर शांतता तोडगा हा मुद्दाही भारताने ऐरणीवर घ्यायला हरकत नाही.**

भारत चीन हिमालयीन पर्वतरांगांच्या पलीकडे असल्याने ते एकमेकांना आणि जगाला आपल्या प्रादेशिक वादाची आठवण करुन देत असतात आणि तो वाद आजही संपलेला नाही. भारत ज्या प्रदेशाची व्यवस्था बघतो अशा ३२००० चौरस मैल भारतीय भूभागावर चीन आपला हक्क सांगतो. याच प्रदेशात अरुणाचल हे राज्य येते. भारत चीनच्या पूर्वेकडील सरहदद्जीवळचा प्रदेश ज्यामुळे खराखुरा निाश्चित होतो त्या मॅकमोहन रेषेच्या दक्षिणेकडे हा प्रदेश आहे.

चीनच्या ताब्यातील साधारण १७००० चौरस मैल भागाबाबतही भारताचा वाद आहे. हा भाग झिनजिआंग आणि तिबेटला जोडणारा अक्साई चीन या मोक्याच्या प्रदेषाच्या वायव्येला आहे. एप्रिल २०१३ मध्ये चीनच्या सीमेवरील सैन्याने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचे जेव्हा या भागात उल्लंघन केले तेव्हा या भागातला तणाव वाढला. प्रत्यक्ष नियंत्रण रषेच्या पलीकडील भारताच्या बाजूवर चीनच्या सैन्याने तंबू ठोकले तर भारतीय अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार या वर्षात सप्टेंबरच्या मध्याला शेकडो चिनी सैनिकांनी सीमा ओलांडली.

चीनने केलेल्या मोठया हल्ल्यानंतर आणि सीमेवरुनच्या पाकिस्तानी हल्ल्यामुळे भारत त्याच्या राष्ट्रीय हिताबाबत कधीच तडजोड करत नाही. या दृष्टीने मागोवा घेतला तर १९७२ साल हे भारताच्या दृष्टीने फार महत्वाचे ठरले; भारताला स्वत:चे धोरण आणि सुरक्षिततेचे डावपेच बदलण्याची जाणीव झाली. भारतातील अन्नधान्याचा साठा कसा वाढेल. दरडोई उत्पन्न कसे वाढेल, सामजिक आणि आरोग्याचे प्रश्न कसे कमी करता येतील इ. प्रश्न प्राधान्याने सोडवणे त्याला महत्वाचे वादू लागले. इतर जगाशी स्पर्धा करण्याच्या दृष्टीने भारताने क्षेत्रनिहाय विकासावर लक्ष दिले. त्यावेळेस इंग्लड, अमेरिका इ. विकसित राष्ट्रे त्यांचा व्यापार आणि व्यवसाय भारतात वाढविण्यास उत्सुक होते. कारण भारतातील उच्चशिक्षित आणि कौशल्यपूर्ण मनुष्यबळ परदेशी काम करण्यास योग्य असेच होते. व्यवसायासाठी अनेक देशांनी भारताशी आंतरराष्ट्रीय व्यवसाय पध्दतीवर आधारित करार केले. भारताने आधुनिक जगात आणि वैष्विक वातावरणात प्रवेश केला. वेगवेगळया क्षेत्राात वेगाने प्रगती होण्यासाठी भारताने मुक्त उदारमतवादी धोरण स्वीकारले. भारताच्या स्वातंत्र्यानंतर या सदुसष्ट वर्षाच्या कालावधीत भारताने पंचवार्षिक योजनांद्वारे वेगवेगळया क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आणि स्वावलंबन आणि स्वयंपूर्णता साध्य केली.

५०० जागतिक पातळीवरील मुख्य कार्यकारी अधिकारी आणि

भारतीय उद्योगाचे नेते यांना नवी दिल्लीत विज्ञानभवनात २५ सप्टेंबर रोजी पंतप्रधान भेटले. 'भारत निर्माण' या नव्या संकल्पनेचा पंतप्रधानांनी उल्लेख केला. हा उपक्रम म्हणजे भारतातील उद्योजकतेला सबल करणे आणि भारतातील आयात कमी करणे, भारतातील उत्पादन वाढवणे यातून रोजगार निर्मिती वाढवणे आणि पर्यायाने गरीबांची क्रयशक्ती वाढवणे हे हेतू साध्य करण्यासाठी उचललेले महत्वाचे पाऊल होते. भारताने आंतरराष्ट्रीय व्यापार स्पर्धेत आपले स्थान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

**पंतप्रधानांनी असेही सांगितले की, लोकशाही, लोकसंख्या आणि झपाटयाने वर येणाऱ्या मध्यमवर्गाकडून (वस्तूंची) मागणीतील वाढ अशा तिन्ही गोष्टी असलेला भारत हा जगातील एकमेव देश आहे.** भारताला वैश्विक उत्पादन केंद्र म्हणून प्रसिध्दीस येण्यासाठी केंद्र राज्य संबंध जवळिकीचे राहतील अशी व्यवस्था या मोहिमेद्वारे करण्यात आली आहे. जर राज्यांत गुंतवणूक आली तर ती भारतात येणारच. राज्ये आणि केंद्र यांनी ख़ांद्याला खांदा लावून एकत्रितपणे संघ म्हणून काम करायचे आहे.

मात्र सीमा वाद अजूनही रेंगाळतो आहे. भारतचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दोन्ही देशातील परिस्थिती पूर्ण माहीत आहे. त्याशिवाय चीनचे अमेरिका आणि जपानशी ताणलेल्या संबंधाचीही त्यांना कल्पना होती. तरीही त्यांनी विचारपूर्वक १४ ते १६ मे २०१५ दरम्यान चीनला भेट दिली. ते म्हणाले, "वरिष्ठ चिनी नेतृत्वासोबत आशियातील स्थैर्य आणि सुबत्ता वाढविण्यासाठी फलदायी चर्चा होण्याची ते अपेक्षा करत आहेत." सर्व मानवजातीच्या उज्जल भविष्यासाठी एकत्र काम करुन 'हिंदी चिनी भाई भाई,' भाग २ पुढे चालवण्यावर त्यांनी भर दिला. झी आणि मोदी यांना युद्ध आणि त्यातून निर्माण झालेली कटुता आणि अपमान याचे पूर्ण स्मरण आहे. तथापि त्यांनी आपले संबंध सुधारण्यावर भर दिला आहे.

झी भारतात येताना अनेक भेटी घेऊन आले. २००० कोटी डॉलरची गुंतवणूक भारताच्या पायाभूत आणि औद्योगिक प्रकल्पासाठी करण्याचे वचन त्यांनी दिले. भारत आणि चीनच्या परस्परावलंबित्वाबाबत चीनच्या दीर्घ मुदती निष्ठेचा तो संदेष होता.

चीनप्रमाणेच भारतही विकसनशील देशांपैकी एक आहे. दोघांनीही राजकीय व्यावसायिक आणि सांस्कृतिक संबंध इतर शेजाऱ्यांशी प्रस्थापित केले आहेत आणि जगातील काही उच्च श्रेणीच्या देशांप्रमाणेच त्यांचे स्थूल घरगुती उत्पन्न आहे.


भारताचा व्यापार, त्याचे आयात निर्यात धोरण, इंधन, पेट्रोल आणि तेलासाठी इतर देशांवरील त्याची अवलंबिता तांत्रिक मदत आणि सरंक्षण सामग्री उत्पादन लक्षात घेऊन भारत चीनशी या क्षेत्रात व्यवसाय करण्यास इच्छूक आहे. भारतीय उद्योजकतेला सबल करणे, भारताची आयात कमी करणे आणि परकीय उद्योजकांना भारतात गुंतवणूक करण्यास निमंत्रण देणे हे भारत-चीन व्यापाराचे उद्देश आहेत. उद्योग व्यापाराला प्रोत्साहन, उत्पादन क्षेत्रात स्वावलंबन, एकत्रित करप्रणाली हे मुददेही चीनशी व्यापार वाढवण्यात अंतर्भूत आहेत.

उत्पादन प्रकल्पांना मान्यता मिळण्यातील विलंब कमी करणे. पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि कंपन्यांना भारतात व्यवसाय करण्यास अनुकूल वातावरण निर्माण करण्याबाबत भारत पूर्ण एकाग्रतेने प्रयत्नशील आहे. या कार्यक्रमांतर्गत वाहन उद्योग वाहनाचे सुटे भाग, जैवतंत्रज्ञान, रसायन उद्योग, सरंक्षणसामग्री इ. २५ महत्वाची क्षेत्रे निर्धारित केली आहेत.

**भारताची महत्वाची क्षेत्रे :-**

भारतीय अर्थव्यवस्थेत तीन महत्वाची क्षेत्रे आहेत. शेती आणि अनुशंगिक, उद्योग आणि सेवा क्षेत्र, कृषी क्षेत्रात शेती (शेती आणि पशुपालन, वानिकी आणि व्यापारी उपयोगासाठी लाकूड तोड, मासेमारी आणि त्यासंबंधातील उपक्रम) येतात. उद्योग क्षेत्रात उत्पादन (नोंदीकृत आणि अनोंदीकृत) क्षेत्र, वीज, नैसर्गिक वायू, पाणीपुरवठा आणि बांधकाम यांचा अंतर्भाव होतो. सेवा क्षेत्रात व्यापार, दुरुस्ती, भोजन वसतीगृह आणि भोजनालये, वाहतूक, वखारी, संदेशवहन इत्यादी सेवा आणि प्रसारण संबंधी सेवा, आर्थिक स्थावर विषयक आणि व्यावसायिक सेवा, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा इत्यादींचा समावेश होतो.

सेवा क्षेत्र हे भारतातील सर्वात मोठे क्षेत्र आहे. वर्ष २०१४-१५ मध्ये अमेरिकेच्या तुलनेत भारतात सेवाक्षेत्राचे स्थूल मुल्याधिष्ठीत ६१.९४ लाख कोटी रुपये झाले. भारताच्या ११६.८९ लाख कोटी रुपये मुल्याधिष्ठीतपैकी ५२.९९ टक्के सेवा क्षेत्राचा वाटा आहे. उद्योग क्षेत्राचा वाटा ३०.०५ टक्के आहे. तर कृशी आणि अनुशांगिक क्षेत्राचा वाटा १६.९६ टक्के आहे. २०११-१२ च्या किंमती लक्षात घेता शेती आणि अनुशांगिक उद्योग आणि सेवा क्षेत्राचा वाटा १६.२०, टक्के, ३१.२२ टक्के आणि ५२.५८ टक्के अनुक्रमे आहे.




पूर्वीच्या पध्दतीने १९५०-५१ मधील किमतींना आधार धरले तर शेती आणि अनुशांगिक, उद्योग आणि सेवा क्षेत्राचा वाटा अनुक्रमे ५१.८१ टक्के, १४.१६ टक्के, ३३.२५ टक्के असा होता. कृषी अनुशांगिक क्षेत्राचा वाटा २०१३-१४ मध्ये १८.२० टक्के इतका घसरला. तर सेवा क्षेत्राचा वाटा ५७.०३ टक्के इतका झाला. उद्योग क्षेत्राचा वाटाही २४.७७ टक्के पर्यन्त वाढला.

**स्थूल घरगुती उत्पन्न (कोटीत) आजच्या किंमतीप्रमाणे**

**GDP (Rupees in Crore) at currnt prices**

| | क्षेत्र | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | टक्के वाटा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषी वानिकी आणि मत्स्योद्योग | १,५०५,५८० | १,६६८,६७६ | १,८८१,१५२ | १,९८२,२८१ | १६.९६ |
| २ | खाणकाम | २६२,८१३ | २८४,७७१ | २९८,५४४ | २९७,३१० | २.५४ |
| ३ | उत्पादन | १,४८२,१५८ | १,६५४,०८४ | १,८०८,३७० | १,९९१,१९१ | १७.०३ |
| ४ | वीज, इंधन वायू पाणी पुरवठा आणि इतर सार्व. सेवा | १९४,४०३ | २१३,८२६ | २४४,२२० | २८६,५१७ | २.४५ |
| ५ | बांधकाम | ७७४,०९३ | ८०१,८८४ | ८६८,८०८ | ९३८,१२६ | ८.०३ |

| | क्षेत्र | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | टक्के वाटा |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | व्यापार, दुरुस्ती, भोजन वसतीगृह आणि भोजनगृह | ८८२,९५७ | १,०४६,२४१ | १,२५७,३२४ | १,४२६,४८४ | १२.२० |
| ७ | संदेशवहन आणि प्रसारण सेवा | ५३०,१६३ | ६१४,२३६ | ६८८,७३६ | ७५५,५१४ | ६.४६ |
| ८ | आर्थिक | १,५३९,५७५ | १,८०७,६९९ | २,०७४,६२३ | २,४४०,९८५ | २०.८८ |
| ९ | सामाजिक आणि वैयक्तिक सेवा | १,०२३,८०३ | १,१६०,६३४ | १,३५५,३६२ | १,५७१,२९७ | १३.४४ |
| | **मूळ किंमतीला स्थूलमूल्यवर्धन** | **८,१९५,५४६** | **९,२५२,०५१** | **१०,४७७,१४०** | **११,६८९,७०५** | |


आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या जागतिक आर्थिक दृष्टीकोनानुसार (एप्रिल २०१५) भारताचे स्थूल घरगुती उत्पन्न साधारणपणे २०४९.५ सहस्त्र दशलक्ष इतके आहे.

एकूण जगाच्या स्थूल घरगुती उत्पन्नाच्या तुलनेत चलन विनिमय दर लक्षात घेता भारताच्या स्थूल घरगुती उत्पन्नाचा वाटा २.६५ टक्के इतका आहे. एकंदर जगाच्या लोकसंख्येपैकी भारताची लोकसंख्या १७.५ टक्के आहे तर जगाच्या भूभाग क्षेत्रफळापैकी भारताचे भूभाग क्षेत्रफळ २.४ टक्के आहे. संपूर्ण जगात भारताची अर्थव्यवस्था नवव्या क्रमांकावर आहे. आशियाई देशात चीन आणि जपाननंतर म्हणजे तिसऱ्या क्रमांकावर भारत आहे. संपूर्ण आशियाच्या स्थूल देशीय उत्पन्नापैकी (सर्वसाधारण) भारताचा वाटा ८ टक्के आहे.

क्रयशक्तीच्या समतोलाच्या आधारे भारताची अर्थव्यवस्था ७३७५.९ सहस्त्र दशलक्ष आंतरराष्ट्रीय डॉलर इतकी आहे, म्हणजेच संयुक्त राष्ट्रे आणि चीननंतर ती तिसऱ्या क्रमांकाची बलाढय अर्थव्यवस्था आहे. एकंदर जगाच्या स्थूल देशीय उत्पन्नाच्या (क्रयशक्तीसमतोल) तुलनेत भारताचे प्रमाण ६.८३ टक्के आहे तर संपूर्ण आशियाच्या स्थूल देशीय उत्पन्नाचा (क्रयशक्ती समतोल) विचार करता भारताचा वाटा १५.४४ टक्के इतका आहे. भारताच्या क्रयशक्ती समतोलावर आधारित स्थूल देशीय उत्पन्न हे सर्वसाधारण स्थूल देशीय उत्पन्नाच्या ३.६ पट जास्त आहे.

२०१७ मध्ये भारत ही जगातील सातवी बलाढय अर्थव्यवस्था असेल असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. त्यावेळेस त्याचे स्थूल देशीय उत्पन्न (सर्वसाधारण) २३०८ डॉलर इतके राहिल.

२००४-०५च्या किमतींना आधारभूत धरले तर मागील दहा वर्षात भारताची अर्थव्यवस्था १.९३ पटीने वाढली, आणि १९५०-५१च्या तुलनेत २०.५३ पटीने वाढली. सध्याच्या किमतींचा विचार करता मागील दहा वर्षात भारताची अर्थव्यवस्था ३.५२ पट विस्तारली.




**भारताचे प्रतिडोई उत्पन्न**


| वर्ष | स्थूल घरगुती उत्पन्न (प्रतिडोई) भारतीय रुपये | |
|---|---|---|
| | आजची स्थिती | २०११-१२ |
| २०११-१२ | ७२,३९४ | ७२,३९४ |
| २०१२-१३ | ८०,८७९ | ७५,१४८ |
| २०१३-१४ | ९०,६८८ | ७९,३०५ |
| २०१४-१५ | ९८,९८३ | ८४,००९ |

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या जागतिक आर्थिक दृष्टीकोनानुसार (एप्रिल-२०१५) सध्याच्या किंमतीनुसार २०१४ मध्ये भारताचे प्रतिडोई स्थूल घरगुती उत्पन्न (सर्वसाधारण) १६२७ डॉलर होते तर २०१३ मध्ये ते १५०८ डॉलर होते. भारत ही जगातील नववी अर्थव्यवस्था आहे. परंतु भारताच्या १.२६ सहस्त्र दशलक्ष अशा अवाढव्य लोकसंख्येमुळे प्रतिडोई स्थूल देशीय उत्पन्नाचा विचार केला तर भारत हा एकषेपंचेचाळीसाव्या स्थानावर आहे. जगाचे सरासरी दरडोई उत्पन्न हे १०८८० डॉलर इतके आहे. त्याच्या तुलनेत भारताचे ६.६९ पट कमी इतके दरडोई उत्पन्न आहे. जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्रांच्या तुलनेत हे दरडोई उत्पन्न ६८.६६ पट इतके कमी आहे तर जगातील सर्वात गरीब राष्ट्रांच्या तुलनेत ते ६.५ पट जास्त आहे. आशियाई राष्ट्रांच्या यादीत भारत चौतीसाव्या स्थानावर आहे.

क्रयशक्ती समतोलाच्या आधारे २०१४ मधील भारताचे प्रतिडोई स्थूल घरगुती उत्पन्न ५८५५ आंतरराष्ट्रीय डॉलर इतके आहे तर जगाचे प्रतिडोई स्थूल देशीय उत्पन्न हे १५१८९ आंतरराष्ट्रीय डॉलर इतके आहे. भारताचे जगातील स्थान एकशेपंचविसावे आहे तर आशियातील स्थान तिसावे आहे.

२०१५ सालापर्यन्त भारताचे सर्वसाधारण पध्दतीने प्रतिडोई उत्पन्न १८०८ डॉलर आणि क्रयषक्ती समतोल पध्दतीने प्रतिडोई उत्पन्न ६२६६ डॉलर इतकी असेल आणि अनुक्रमे १४१ वे आणि १२४वे स्थान असेल,



**चीन विरुध्द भारत आणि त्यांचे स्थूल देशीय उत्पन्न :**

चीन आणि भारत या जगातील दोन उदयाला येणाऱ्या अर्थव्यवस्था असून हे दोन्ही देश जगातील दुसऱ्या आणि दहाव्या क्रमांकावरचे मोठे देश आहेत. क्रयशक्ती समतोलाच्या आधारावर २०१४ मध्ये चीन हा पहिल्या स्थानावर तर भारत तिसऱ्या स्थानावर होता. सर्वसाधारण आणि क्रयशक्ती समतोल अशा दोन्ही पध्दतीने विचार केला असता दोन्ही देशांची मिळून संपत्ती ही एकूण जागतिक संपत्तीच्या अनुक्रमे १५.९८ टक्के आणि २३.२८ टक्के इतकी आहे. सर्व आशियाई देशांना विचारात घेतले असता, चीन आणि भारत मिळून स्थूल घरगुती उत्पन्न एकूण आशियाच्या स्थूल घरगुती उत्पन्नाच्या ५२.८४ टक्के (क्रयशक्ती समतोलाच्या आधारे) आणि ४८.४८ टक्के (सर्वसाधारण) इतकी होते.

सर्वसाधारण पध्दतीने आणि क्रयषक्ती समतोल पध्दतीने चीनचे स्थूल घरगुती उत्पन्न भारताहून अनुक्रमे ५.०६ पट आणि २.४२ पट जास्त आहे. विनिमय दराच्या पध्दतीवर १ दशलक्ष डॉलरचा पल्ला १९९८ मध्येच चीनने गाठला तर भारताने २००७ मध्ये गाठला. २०१४ मध्ये भारताने २ दशलक्षचा पल्ला गाठला तर चीनने दहा दशलक्षची सीमा पार केली. १९८० मध्ये चीनच्या आणि भारताच्या अर्थव्यवस्थेचा आकार अनुक्रमे ३०९ आणि १८१ डॉलर होता.

चीनच्या क्रयशक्ती समतोलाच्या आधारे असलेले स्थूल देशीय उत्पन्न हे सर्वसाधारण स्थूल घरगुती उत्पन्नाहून १.७ पट जास्त आहे. भारताचे हेच गुणोत्तर ३.५५ आहे.

स्थूल देशीय उत्पन्नाची वाढ - चीनचा २०१४ मधील विकास दर ७.३८ टक्के आहे. भारताचा २०१४ मधील विकास दर ५.६३ टक्के असल्याचा अंदाज आहे. १९८०-२०१४ या कालावधीत सरासरी स्थूल देशीय उत्पन्न वाढीचा दर चीनचा ९.८ टक्के होता तर याच कालावधीसाठी भारताचा ६.११ टक्के होता. १९८४ मध्ये चीनच्या विकासाचा दर सर्वात जास्त म्हणजे १५.२० टक्के होता. तर कमीत कमी विकासाचा दर १९९० मध्ये ३.८० टक्के होता.

१९८० ते २०१४ या पस्तीस वर्षात चीनच्या विकासाचा दर १६ वर्षात दहा टक्क्याहून जास्त वाढला ; तर भारताचा फक्त ६.११ टक्क्याने वाढला, भारताचा विकास दर आजवर सर्वात जास्त २०१० मध्ये १०.२६ टक्के तर विक्रमी कमी दर म्हणजे १.०६ टक्के १९९१ साली होता. भारताचा चार वर्षातील वाढीचा दर ९ ते १० टक्के होता तर चीनने हाच दर सात वर्षात कायम राखला.

दरडोई स्थूल घरगुती उत्पन्न - सर्वसाधारण पध्दतीने चीनचे दरडोई स्थूल घरगुती उत्पन्न ७५७२ डॉलर आहे. तो जगात ऐंशीव्या स्थानावर आणि आशियात अठराव्या स्थानावर आहे. भारताचे दरडोई स्थूल घरगुती उत्पन्न हे साधारण १६२६ डॉलर आहे. भारताचे याबाबतीत जगातील स्थान १४४वे आणि भारतातील स्थान ३४वे आहे. क्रयषक्ती समतोलाच्या आधारे दरडोई स्थूल घरगुती उत्पन्न हे चीनचे १२८९३ डॉलर आहे तर भारताचे ५७७७ डॉलर आहे.

या सर्व बाबींच्या तुलनात्मक अभ्यासानंतर असे लक्षात येते की, चीनचा अर्थविकासात्मक आलेख हा भारतापेक्षा वाढीव असला तरी भारताने संभाव्य वृद्धी क्षेत्रांच्या विकासांवर लक्ष केंद्रीत केल्यास तिन्ही क्षेत्रांसकट भारताला चीनच्या बरोबरीने आर्थिक वृद्धी गाठणे कठिण नाही. किंबहुना उदारमतवाद, तंत्रज्ञान हस्तांरण, आर्थिक विकासासह सीमावाद प्रश्नावर बोलणी करण्यास भारताला हरकत नाही.

**संदर्भ :-**


१) कल्पितदास यांचा अभ्यास निबंध

२) www.google.com

३) www.statistic.com

४) www.indiastatistic

५) नियोजन आयोग

६) आंतराष्ट्रीय नाणेनिधी

७) भारताचे आर्थिक सर्वेक्षण

८) फ्रीप्रेस जर्नल



*(लेखिका **भावना गोखले** या भारतीय माहिती सेवेच्या अधिकारी असून सध्या योजना मासिकाच्या संपादक म्हणून कार्यरत आहेत.)*

**संपर्कासाठी ई-मेल :**
bhavanagokhale2004@gmail.com
myojanadpd@gmail.com

# बहुराष्ट्रीयतेची माघार, प्रादेशिक सहकार्याची आगेकूच ?

**— दिलीप सिन्हा**




**आज विविध राष्ट्रसमुहांची परस्पर व्यापार, राजकीय आणि संरक्षण धोरणे बघितल्यास, जी राष्ट्रे एका विशिष्ट उद्दिष्टाने एकत्र आली होती. त्यांच्या संबंधात अनेक बाबींमध्ये तडजोड न झाल्याने कटू संबंध प्रस्थापित झाले आहेत. या परिस्थितीत 'संरक्षण, राष्ट्रीय सुरक्षा व आर्थिक विकास या तीन प्रमुख बाबींवर विचार आवश्यक ठरतो. जी-२०, जी-७, ब्रीक्स, पुर्व-पश्चिमी देश त्यांची व्यापार नीती या सर्वांचा विचार केल्यास भारताने आत्तापर्यंत "एक संरक्षक" अशी प्रतिमा स्थापन केली होती ती प्रामुख्याने "एक मध्यस्थ" अशा अर्थाने होती, परंतु येणाऱ्या नवीन काळात ही भूमिका व्यापक झाली असून भारताची प्रतिमा "बदलाचा अग्रदूत" अशी मानण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहसंबंधात भारताचे योगदान संयमी व विकसनशील आहे. यामध्ये "सर्वसमावेशक विकासक" ही संकल्पना अभिप्रेरित आहे.**

पूर्व व पश्चिमी देशातील संबंधात अलिकडे निर्माण झालेला तणाव व जागतिक आर्थिक पेचप्रसंग यामुळे आंतरराष्ट्रीय संबंध ताणले जात आहेत व बहुराष्ट्रीय संस्थांचा संकोच होत आहे. जागतिकीकरणाच्या संकल्पनेबाबत १९९० मध्ये जो उत्साह होता तो आता अस्तंगत झाला आहे. बेरोजगारी वाढली आहे, असमानता वाढली आहे, धार्मिक संघर्ष वाढला आहे, त्यामुळे जागतिकीकरणाच्या कट्टर समर्थकांचेही अवसान गळाले आहे.

आंतरराष्ट्रीय समुदायाला अफगाणिस्तान, इराक, लिबिया व दक्षिण सुदानमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी महत्वाकांक्षी योजना आखूनही यश आलेले नाही. त्यामुळे विकसनशील देशांना आता पाश्चिमात्य देशांनी या देशांमध्ये घेतलेल्या पुढाकाराबाबतच संशय येत आहे. या देशांमध्ये सगळा गोंधळ माजला आहे, मानवतावादी समस्या आहेत, शरणार्थींचे लोंढे वाढत आहेत.

अनेक शक्तिमान आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना आता उदयास आल्या आहेत त्या मोठे प्रदेश पादाक्रांत करीत आहेत व त्यांच्या लढाईसाठी तरूणांची भरती करून विविध खंडातून निधीही गोळा करीत आहेत, त्यामुळे जागतिक व्यवस्थेला मोठा धोका निर्माण झाला आहे. सध्याच्या बहुराष्ट्रीय संस्था या जागतिक व्यवस्थेतून जन्माला आलेल्या आहेत, त्या दुसऱ्या महायुद्धानंतर उदयास आल्या आहेत. त्यानंतर शीतयुद्धाचा काळ होता, विविध देशांच्या लष्करी आघाड्या व आर्थिक संघटना यांच्यात वैमनस्य होते, पण आता पूर्व व पश्चिमेतील मतभेद त्रासदायक तर ठरत नाहीत ना अशी शंका आहे. बहुराष्ट्रीय व्यवस्था टिकू शकतील की नाही हे नवे आव्हान आहे.

### पुन्हा पूर्व-पश्चिम तणाव

पूर्व-पश्चिम यांच्यातील तणाव भीतीदायक पातळीवर वाढत चालला आहे, शीतयुद्धाची समाप्ती जणू काही फसवी होती असे वाटू लागले आहे. स्लॉस एलामू या जर्मनीतील शहरात ७-८ जूनला जी-७ देशांची शिखर बैठक झाली. त्यात पाश्चिमात्य देशांनी युक्रेनविषयी रशियाला सज्जड इशारा दिला. क्रायमियावरचे आक्रमण आम्ही मान्य करणार नाही व रशियाने आणखी निर्बंधांना तोंड देण्यास तयार रहावे, त्याचा आर्थिक फटका रशियाला बसेल.

रशियाचे अध्यक्ष पुतिन क्रायमियावर माघार घ्यायला तयार नाहीत, क्रायमियातील मूळ रशियन असलेल्या लोकांनी मार्च २०१४ मध्ये रशियन महासंघात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. पूर्व युक्रेनमधील लोकांना

मदत करण्यास पुतिन यांनी मागेपुढे पाहिले नाही. रशिया पाश्चिमात्य देशांवर नाराज आहे कारण ते नाटो आघाडीचा विस्तार करून रशियाच्या नाकावर टिच्चून विरोध करीत आहेत, पूर्वीच्या वॉर्सा करारातील किमान दहा देश आता नाटोमध्ये आहेत. रशियाला धमकावण्यांची भीती वाटली आहे व तो चीनशी संबंध मजबूत करीत आहे. चीनचा राजकीय पाठिंबा व व्यावसायिक फायदा मिळावा असे रशियाला वाटते.

**रशियावर निर्बंध**

रशियावरील निर्बंधांचा परिणाम युरोपीय समुदायावर झालेला आहे. रशिया हा युरोपचा तिसरा मोठा व्यापारी भागीदार आहे. ऊर्जा आयातीचा तिसरा प्रमुख स्त्रोत आहे. रशियातील बाजारपेठ आकर्षक आहे, तेथे युरोपच्या वस्तूही विकल्या जातात. युरोपीय समुदाय व रशिया यांच्यातील व्यापार २०१२ मध्ये शिखरावर होता त्यावेळी युरोपीय समुदाय उर्जेच्या बाबतीत रशियावरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी प्रयत्नशील होता. पण स्पर्धात्मक पर्यायांमुळे त्यात प्रगती झाली नाही.

चीन-रशिया यांच्यातील फुटीपूर्वीही शीतयुद्धाच्या प्रारंभीच्या दिवसात पाश्चिमात्य देशांनी चीनला लक्ष्य केले होते आताही जवळपास तीच स्थिती आहे, जी-७ देशांनी जो जाहीरनामा केला आहे त्यात चीनचे नाव न घेता असे स्पष्ट केले आहे की, पूर्वेचे देश व दक्षिण चीनमधील तणावाची आम्हाला चिंता वाटते. दक्षिण चीन सागरातील भाग मुक्त व बेकायदा वापरण्याच्या मुद्द्यावर शांततामय तोडगा काढण्याची गरज आहे. भीती दाखवणे, दडपशाही करणे, बळाचा वापर करणे, एकतर्फी कारवाया करणे आहे ती स्थिती बदलणे, सागरात भराव टाकून भूप्रदेश तयार करून त्यावर दावा सांगणे याला आमचा विरोध आहे.

याचा अर्थ शीतयुद्ध परत सुरू झाले काय असा प्रश्न निर्माण होतो पण तज्ज्ञ लोक तसे म्हणायला तयार नाहीत व त्याला काही कारणेही आहेत. जगात दुसऱ्या महायुद्धानंतर जसा तणाव व अस्थिरता होती तशी त्यानंतरही तिसऱ्या महायुद्धाची शक्यता वर्तवली जात असताना कधीही नव्हती. आज सगळ्या देशांची तोंडे तशी गप्प आहेत, काहीवेळा व्यापारी हिताच्या मुद्द्यावरून थोडीफार बोलाचाली होते. आंतरराष्ट्रीय संघटनामध्ये काहीवेळा प्रश्नांवर चर्चा होते पण त्यातही वातावरणाचा पारा चढलेला नसतो, संबंधित महाशक्तीमान देशातील मतभेदांनंतरही त्या संघटनांमध्ये त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मोकळी वाट करून दिली जाते पण तरीही त्यांना निर्णय घेणे जड जाते. अलिकडे देश सहकार्यासाठी प्रादेशिक गटांकडे वळताना दिसतात

**जी-२०**

उदयोन्मुख देशांना जागतिक आर्थिक प्रश्नांवर चर्चेसाठी एकत्र आणण्यातून १९९९ मध्ये जी-२० गटाची निर्मिती झाली. २००८च्या आर्थिक पेचप्रसंगात हा गट मार्ग काढण्यात उपयोगी पडला, विशिष्ट कालांतराने या गटाच्या बैठका होत आहेत पण तो आता जागतिक कृतीचा मंच राहिलेला नाही. अलिकडेच जी-२० त्या ब्रिस्बेन जाहीरनाम्यात गेल्या नोव्हेंबरमध्ये जी आवाहने करण्यात आली होती ती वाऱ्यावरच गेली, त्याचे काही झाले नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत सुधारणा व २०१० मध्ये जो कोटा ठरवून देण्यात आला होता त्याची अंमलबजावणी करणे या पंधराव्या सार्वजनिक आढावा जाहीरनाम्यातील आश्वासने पाळली नाहीत. या बाबी वर्षअखेरीस झाल्या नाहीत तर आम्ही नाणेनिधीला त्यांच्या कामाबाबत व भूमिकेवर जाब विचारू तसेच पुढील पर्याय शोधण्याची कारवाई करू असा इशाराही देण्यात आला होता. बदलाची अपेक्षा करणारे काही देश अजूनही जी-२०चे सदस्य असले तरी या मागण्या अजून प्रलंबित आहेत.

**संयुक्त राष्ट्रांचे सुरक्षा मंडळ**

संयुक्त राष्ट्रांमध्ये शीतयुद्धोत्तर काळात सुरक्षा मंडळाने जी कृतीशीलता दाखवली ती आता संपली आहे आता केवळ मानवतावादी आवाहने, काही ठराव केले जातात, पण संघर्ष मात्र चालूच राहतात त्यामुळे सुरक्षा मंडळाचा काही वचक राहिलेला नाही. २०११ मध्ये सुरक्षा मंडळाने दक्षिण सुदानमध्ये शांती सैन्य पाठवले पण तेथे काय झाले ते आपण पाहिले.लिबियात कारवाईची सुरक्षा मंडळाने परवानगी दिली पण त्यातही प्रश्नार्थकताच अधिक होती.

पाश्चिमात्य आघाडीच्या सहकार्य पर्वाला दोन दशके लोटली त्यात सुरक्षा मंडळातील पाच स्थायी सदस्य देशही आहेत. रशिया व चीन यांनी सीरियाविरोधात ठरावावर गेल्या मार्चमध्ये नकाराधिकार वापरला व तेथील लष्करी कारवाई रोखली. सुरक्षा मंडळातील सुधारणांचा विषयही गती घेत नाही. संयुक्त राष्ट्रांचे तत्कालीन सरचिटणीस बुट्रोस घाली यांनी जून १९९२ मध्ये सुधारणेच्या चर्चेला हात घातला त्यांनी "ॲन अजेंडा फॉर पीस" नावाचा अहवालही त्यावेळी सादर केला. २००५ मध्ये सुरक्षा मंडळातील सुधारणांची चर्चा शिगेला पोहोचली. स्थायी सदस्यांसह अनेक सदस्य देशांनी सुरक्षा मंडळात सुधारणा करणे आवश्यक आहे असे सांगितले पण त्याबाबत नेमके काय करायला पाहिजे याच्या मसुद्यावर मतैक्य झाले नाही. त्यामुळे सुरक्षा मंडळाचा जगावर अधिकाराचा वचक राहिला नाही, त्यांच्यातील मतभेदच पुढे येत गेले.

**जी-७ चे पुनरागमन**

पाश्चिमात्य देश जी-७ गटाकडे पुन्हा वळले. १९७५ मध्ये हा अंतर्गत सल्लागट स्थापन करण्यात आला होता. रशियाला या गटात घेऊन जी-८ गट तयार करण्याचा प्रयत्न फसला त्यामुळे जाहीरनाम्यांचा व मसुद्याचा सूर बदलत गेला. रशियाच्या अस्तित्वामुळे भाषेत जो फरक पडला असता तो दिसत नाही कारण गेल्या वर्षी रशियाला काढून टाकण्यात आले व शिखर बैठकीचे ठिकाण सोशी ऐवजी ब्रुसेल्स करण्यात आले, आता जी-७ देशांच्या जाहीरनाम्यात चीन व रशियाला लक्ष्य केले जाते पण विकसनशील देशांच्या मागण्याही अधिक कठोर रूप धारण करत आहेत.

एलमाऊ येथील जी-७ जाहीरनाम्यात जगासाठी पश्चिमेचा कार्यक्रम काय आहे हे सांगण्यात आले असे असले तरी जगाला बहुराष्ट्रीय क्षमतेमुळे हलवण्याची ताकद आता पश्चिमी देशात राहिलेली नाही, व्यापार बोलणीचे उदाहरण घेतले तर दोहा येथे पंधरा वर्षांपूर्वी जागतिक व्यापार संघटनेची बोलणी झाली, त्याला दोहा विकास चर्चा असे म्हटले गेले पण आता त्या चर्चेला काही अर्थ उरलेला नाही कारण पाश्चिमात्य देशांनी व्यापार सुलभता करारातून अंग काढून घेतले आहे. जी-७ देशांनी या कराराला डिसेंबरमध्ये नैरोबी येथे होणाऱ्या जागतिक व्यापार संघटनेच्या अधिवेशनापर्यंत तरी मान्यता मिळावी अशी अपेक्षा केली आहे. दोहा विकास चर्चेतील इतर प्रश्नांवर अशी तातडीची गरज दाखवण्यात आली नाही.

इलामाऊ येथील जाहीरनाम्यात बहुविध करार करून देशांच्या गटांना त्यावर स्वाक्षऱ्या करण्याची मुभा देण्यात आली, यात नेहमीच जागतिक व्यापार पद्धतीचा अवमान करण्यात आला. जाहीरनाम्यात असे म्हटले होते की, बहुराष्ट्रीय व्यापार प्रणाली मजबूत करणे हा आमचा अग्रक्रम आहे, त्यात आम्ही द्विपक्षी व प्रादेशिक मुक्त व्यापार करारांचे स्वागत करतो व अनेकविध देशातील व्यापार सेवा व माहिती तंत्रज्ञान विस्तार तसेच पर्यावरण वस्तू करारांना प्रोत्साहन देतो. ट्रान्स पॅसिफिक भागीदारीचे व ट्रान्सअ‍ॅटलांटिक व्यापार व गुंतवणूक करारांचे स्वागत करतो या करारांमध्ये पाश्चिमात्य देशांना स्वारस्य आहे. हे करार पारदर्शक व उच्च दर्जाचे तसेच सर्वसमावेशक असतील याची हमीही देण्यात आली, व ते जागतिक व्यापार संघटनेच्या व्यवस्थेस पूरक असण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दोन दशकांपूर्वी स्थापन झालेली जागतिक व्यापार संघटना आता फार महत्वाची उरलेली नाही तिचे नूडल्सचे बाऊल बनले आहे.

**हवामान बदलातील राजनैतिक वाटाघाटी**

हवामान बदलातील वाटाघाटी आता सीओपी-२१ या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदल करारा अंतर्गत पॅरिस येथे होत असलेल्या २१ व्या परिषदेच्या निमित्ताने एका नव्या टप्प्यात प्रवेश करीत आहेत. सहेतूक राष्ट्रीय सहभागाची प्रत्येक देशाची भूमिका त्यात ठरवली जावी व हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्याबाबतच्या प्रयत्नांसाठी करार करण्यात यावा अशी अपेक्षा आहे. जागतिक तपमानवाढ २०५० पर्यंत जागतिक सरासरी तपमान वाढीच्या २ अंश खाली ठेवण्याचा उद्देश आहे पण किती देश त्यात स्वत:हून प्रयत्न करतील किंवा तशी प्रतिज्ञा करतील हा

प्रश्नच आहे त्यामुळे उत्सर्जन कमी करण्याचे आव्हान वाढतच जाणार आहे. इंटरगव्हर्नमेंटल पॅनल ऑफ क्लायमेट चेंज या संस्थेने असे म्हटले आहे की, २०१०च्या तुलनेत २०५० मध्ये हरितगृह वायू उत्सर्जन ४० ते ७० टक्के कमी करायला पाहिजे तरच जागतिक तपमानवाढ सरासरी वाढीपेक्षा दोन अंश खाली ठेवता येईल. यात प्रत्येकाची उत्सर्जन कमी करण्याची जबाबदारी संयुक्तिक असली तरी त्याचे प्रमाण हे वेगळे आहे पण हा मुद्दा अंतर्भूत असलेला यू.एन.एफ.सी.सी.सी.चा १९९२चा करार बासनात गुंडाळला जाईल यात शंका नाही. क्योटो करारात १९९७ मध्ये कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी वेगवेगळ्या देशांना ठरवून दिलेली उद्दिष्टेही बाजूला ठेवली जातील. विकसित देशांचे एकत्रित कार्बन उत्सर्जन हे जागतिक तपमानवाढीला कारण आहे पण ते उलट विकसनशील देशांनाच कार्बन उत्सर्जन कमी करण्यास सांगत आहेत त्यामुळे त्यांना कार्बन उत्सर्जनात वाटेकरी नको आहेत. विकसनशील देशांच्या विकास प्रक्रियेत कार्बन उत्सर्जन होणार आहे हे ते मान्य करायला तयार नाहीत. पर्यावरण स्नेही तंत्रज्ञान देण्यात ते तयार नाहीत. विकसनशील देशांनी ते तंत्रज्ञान व्यावसायिक दराने विकत घ्यावे असे त्यांचे मत आहे. २००९ मध्ये कोपनहेगन बैठकीत करार करताना पाश्चिमात्य देशांनी निधीची जी आश्वासने दिली होती त्यांची पूर्तता झाली की नाही हे पाहणे आवश्यक आहे.विकसनशील देशांना आता विकासाची उद्दिष्टे साध्य करायची आहेत, पण त्याचबरोबर उत्सर्जनाचे निकष व मर्यादा पाळायच्या आहेत ही तारेवरची कसरत आहे व अन्यायही आहे.

विकासासाठी सहकार्याचे वातावरण अनुकूल बनवण्यास हे जागतिक वातावरण पोषक नाही. भारतासारख्या देशात परदेशी गुंतवणुकीची गरज आहे. आर्थिक वाढीसाठी निर्यातीची गरज आहे त्या स्थितीत हे आव्हानात्मक काम आहे, एकतर विकसनशील देशांची आर्थिक वाढ कमी आहे त्यांच्या अर्थव्यवस्था स्पर्धात्मक नाहीत अशा परिस्थितीत विकसित देश उत्सर्जन मर्यादेबाबत अन्याय्य अटी घालून विकासात अडथळा आणीत आहेत. विकसनशील देशांना मदत देण्यास विकसित देश तयार नाहीत, बाजारपेठा खुल्या करण्यास ते तयार नाहीत. विशेषत: कृषी उत्पादनांसाठी बाजारपेठा खुल्या करण्याची तयारी नाही. परदेशी स्पर्धात्मकतेपासून आपल्या कंपन्यांना ते सुरक्षित ठेवत आहेत. विकसनशील देशांना आणखी बंधनात अडकवण्यासाठी पर्यावरण व कामगार कायद्यांच्या मानकांचा तसेच बौद्धिक संपदा कायद्याचा बडगा उगारत आहेत.

**भारताचे शेजारी देशांशी संबंध**

बहुराष्ट्रीय संस्थांमध्ये सुधारणांसाठी आग्रह धरण्याची ही योग्य वेळ नाही कारण विविध देश त्यांच्या राजकीय व आर्थिक हितसंबंधांच्या रक्षणासाठी प्रादेशिक गटांकडे वळत आहेत. एकूण परिस्थिती बघता भारताने शेजारी देशांशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे कारण आर्थिक सहकार्य महत्वाचे आहे. मित्र व शेजारी देशांशी कठीण काळात चांगले संबंध ठेवून विश्वास संपादन करण्याचा भारताचा उद्देश आहे. बांगलादेश बरोबरचा जुना सीमा प्रश्न आपण सोडवला. बांगला देश, भूतान, भारत, नेपाळ यांच्यातील वाहन करारात घेतलेला यशस्वी पुढाकार हा बहुराष्ट्रीय सहकार्याचा नमुना होता.

भारताने शेजारी देशांच्या व्यतिरिक्त यावर्षी नंतरच्या काळात ५४ आफ्रिकी देशांची भारत-आफ्रिका परिषद आयोजित केली आहे. १९८३ च्या अलिप्ततावादी राष्ट्र चळवळीतील देशांच्या बैठकीनंतरची ही सर्वात मोठी बैठक असून त्यावेळी अनेक परदेशी नेते उपस्थित राहणार आहेत. चीनशी स्पर्धा करण्यात भारताची दमछाक होत असताना भारत ही परिषद घेत आहे. चीन या देशांना मोठ्या प्रमाणात अर्थसाह्य देऊ शकतो त्यांची तेवढी क्षमता पायाभूत सुविधा उद्योगातही आहे. भारताची ताकद केवळ मनुष्यबळ हीच आहे व काही प्रमाणात माहिती तंत्रज्ञान उद्योगात भारताचा वरचष्मा आहे. त्यांचा फायदा भारताला योग्य प्रकारे उचलता आला पाहिजे.

**ब्रिक्स**

आंतरराष्ट्रीय आर्थिक क्षेत्रात भारत ब्रिक्समध्ये क्रियाशील आहे. (ब्रिक्स-

ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका) ब्रिक्स विकास बँक व नवीन विकास बँक स्थापन करण्यात भारत व चीन यांचा पुढाकार होता, या बँका पुढील वर्षी कार्यान्वित होतील. ब्रिक्स बँकेचे पहिले अध्यक्ष ठरल्या प्रमाणे भारतीय आहेत ५० अब्ज डॉलर्सच्या भांडवलावर ही बँक सुरू होत आहे. आयात निर्यात समतोलाच्या गरजा भागवण्यासाठी सदस्य देशांना मदत करता यावी याकिरता निधी राखीव ठेवणे त्यात अपेक्षित आहे.

पाश्चिमात्य देशांनी इतर देशांना त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या मानाने जागतिक आर्थिक संस्थात स्थान न दिल्यामुळे ब्रिक्सची स्थापना करण्यात आली. पाश्चिमात्य देशांनी त्यांच्या संस्थांच्या माध्यमातून मानवी हक्क व पर्यावरणाच्या मुद्द्यांचा बागुलबुवा करून विकसनशील देशांना पुढे जाऊ दिले नाही, त्याचा विकसनशील देशांना राग होता त्यामुळे ब्रिक्ससारख्या पर्यायांचे या देशांनी स्वागतच केले.

प्रादेशिक सहकार्य पुढे नेण्यात भारत एकटा नाही, चीनही स्वत:ची विकास बँक स्थापन करून नवीन आर्थिक इच्छाशक्ती दाखवत आहे त्यांनी आशियायी पायाभूत सुविधा विकास बँक स्थापन केली असून त्याचे पायाभूत भांडवल १०० अब्ज डॉलर्स आहे, भारतासह ५७ देश त्यात सहभागी आहेत, अमेरिकेने जागतिक व्यापार संघटनेच्या नाकावर टिच्चून दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिका खंड, ओशनिया व आशिया भागातील निवडक देशांशी ट्रान्स पॅसिफक भागीदारी, व्यापार व गुंतवणूक करार करण्यास प्रोत्साहन देण्यास सुरूवात केली आहे.

**आंतरराष्ट्रीय योग दिन उपक्रम**

भारताने बहुराष्ट्रीय सहकार्याला नेहमीच पाठिंबा दिला आहे, संयुक्त राष्ट्रात भारताने जगातील लोकांना एकत्र आणण्यासाठी जागतिक योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला, त्यात व्यक्तिगत व सामाजिक अशा दोन्ही कृती आहेत. व्यापक राजकीय, आर्थिक व पर्यावरण प्रश्नांवर उत्तरे शोधणे अवघड आहे. ती बहुराष्ट्रीय व देश पातळीवर प्रत्येकाची जबाबदारी आहे. हे प्रश्न सोडवण्यासाठी सुरूवात कशी करता येईल यासाठी प्रत्येक देश काय करू शकतो याबाबत जागरूकता आवश्यक आहे. भारताचा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा पुढाकार हे त्यासाठीचे एक छोटे पाऊल आहे व आंतरराष्ट्रीय सामंजस्य घडवण्याचा व बहुराष्ट्रीयतेचा वापर राष्ट्रीय आदर्श ठरवण्यासाठी करण्याचा हा प्रयत्न आहे, हे एक मोठे यश आहे. भारताने योग दिनाचा मांडलेला प्रस्ताव १७५ देशांनी पुरस्कृत केला व संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत तो मतैक्याने मंजूर झाला.

योग दिनाचा हा पुढाकार हा राजनैतिक प्रयत्नांचा भाग होता, भारताने गेली अनेक वर्षे संयुक्त राष्ट्रांना आकार देण्याचा प्रयत्न करून युद्धोत्तर काळात परिस्थिती जैसे थे ठेवण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची एक संरक्षक म्हणून असलेली भूमिका नवीन काळात "बदलाचा अग्रदूत' अशी व्यापक करण्यात यश मिळवले. संयुक्त राष्ट्रांनी निर्वसाहतीकरणाला उत्तेजन, वंशवादाला विरोध, विकासाचा पुरस्कार ही तत्वे रूजवण्याचा प्रयत्न केला. नैसर्गिक संपत्ती ओरबाडण्याची सवय लागलेल्या जगाला प्राचीन भारतीय तत्वज्ञानातील निसर्गाशी मैत्रीचे बाळकडू भारताने पाजले, त्याला युवक व पुरोगामी विचाराच्या युवा पिढीनेही साथ दिली.


भारताने प्रादेशिक सहकार्यासाठी घेतलेल्या या पुढाकारांपैकी किती यशस्वी होतात हे आताच सांगणे कठीण आहे दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या बहुराष्ट्रीय संस्था ज्या कारणास्तव स्थापन झाल्या त्यापासून हे देश दूर जात आहेत, त्यामुळे आता पाश्चिमात्य व बलाढ्य देशांनी आंतरराष्ट्रीय गरजा व वास्तवता यांचे प्रतिबिंब या बहुराष्ट्रीय संस्थांमध्ये पडण्यासाठी सुधारणा करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. त्यांनी तसे केले नाही तर बहुराष्ट्रीय संस्था व त्यांच्या सहकारी संस्थांना माघार घ्यावी लागेल किंबहुना त्या बदलत्या काळात संदर्भहीन ठरतील.

*(लेखक **दिलीप सिन्हा** हे ग्रीस आणि जिनेस या संयुक्त राष्ट्र संघाच्या देशासाठी भारताचे राजदुत म्हणून कार्यरत. ते विदेशी व्यवहार मंत्रालयाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. ते पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि ईराण या देशांसाठी प्रमुख म्हणून कार्यरत होते.)*

**संपर्कासाठी मेल :**
dilipsinha@hotmail.com

# मोदी सरकारचे पहिले वर्ष : परराष्ट्र संबंधात संरक्षणाची महत्वाची भूमिका

**— अशोक बन्सल**




**भारताचा इतिहास, स्वातंत्र्योत्तर काळ आणि वर्तमान काळ बघता भारताने अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, इस्त्राईल, रशिया या सर्वांसह राष्ट्रसुरक्षे संदर्भात करार केले आहेत. हे करार केवळ व्यापार किंवा संरक्षण निती म्हणून सामोरे न येता, विविध विदेशी नवीन तंत्रज्ञात युक्त संरक्षण अवजारे, विमाने, नौका या सर्वांच्या तंत्रज्ञान हस्तांतरणाचाही सहभाग आहे. आंतरराष्ट्रीय संबंधात भारताची स्वतःची अशी वेगळी प्रतिमा आहे, जी परस्पर विश्वास वृद्धीगंत करतेच त्याबरोबर भारतीय सुरक्षा दलांवरील वाढता विश्वास दर्शविते यामुळे विविध देश भारताशी व्यापाराद्वारे जोडण्यास उत्सुक आहेत. यामुळे इतर देशांचे सहकार्य तर वाढेलचं परंतु त्याचा परिणाम "मेक इन इंडिया" यशस्वी होण्यास मदत होईल.**

गेल्या एका वर्षात आंतरराष्ट्रीय संबंधांच्या क्षेत्रात भारताने नवीन उंची गाठली आहे. जरी या काळात भारताने सर्वच क्षेत्रात सर्वच बाजूंनी सुधारणा साधली असली तरी सरकारचे मुख्य यश आंतरराष्ट्रीय संबंधांच्या क्षेत्रात आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकाच्या एका वर्षाच्या कालावधीत राष्ट्रांच्या सलोख्या मध्ये भारताची पत उंचावली आहे असे म्हटल्यास ती अतिशययोक्ति ठरू नये. संरक्षण आणि परराष्ट्र धोरण या एकमेकांशी संबंधित गोष्टी आहेत. संरक्षण सिद्धता हा सुरक्षा महत्वाचा घटक आहे. हा लेख राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या आंतरराष्ट्रीय संबंधांना सुरक्षेच्या संबंधित बाबींनी कसे प्रभावित केले आहे (खासकरून देशाच्या संरक्षण सिद्धतेत सुधारणा करण्याबाबत) यावर प्रकाशझोत टाकतो.

भारत हा लष्करी सामुग्रीचा सर्वात मोठा आयातदार आहे ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. भूतकाळात युद्धाच्या वेळी संरक्षण सामुग्रीच्या पुरवठ्या पासून भारत वंचित राहिला होता आणि इतर वेळी आपली धोरणे बदलण्यासाठी आणण्यात आलेला दबाव लक्षात घेतल्यास संरक्षण क्षेत्रात सहकार्य हे अजूनच महत्त्वाचे ठरते. दुसऱ्या मुद्याचे उत्तम उदाहरण म्हणजे पोखरण-II नंतर भारतावर घालण्यात आलेले निर्बंध. यामुळे शत्रूंशी तुलना केल्यास त्याची परिणिती भारताची संरक्षणाची बाजू कमकुवत होण्यात झाली आहे. "मेक इन इंडीया" अंतर्गत परदेशी कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी सरकारने भारताच्या "संरक्षण क्षेत्राचा आयातदार" या प्रतिमेचा वापर केला आहे. कंपन्यांना मोठ्या मागणीची आणि स्वस्त श्रमिकतेची हमी असेल ज्यामुळे भारताच्या संरक्षण क्षेत्राला आवश्यक उपकरणांची हमी मिळतानाच दुसरीकडे रोजगार निर्मितीचीही क्षमता मिळून भारतात अनेक तंत्रज्ञाने येऊ शकतील. परंतु संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्र विविध मर्यादांनी नियंत्रित असल्यामुळे सरकारने परदेशी सरकारांशी संवाद साधणे आवश्यक आहे कारण त्यामुळे अशी तंत्रज्ञाने भारताला मिळण्यातले अनेक अडथळे दूर होऊ शकतील.

सत्तेत आल्यावर सरकारने शपथविधीसाठी शेजारील राष्ट्रांना आमंत्रित करून भारताच्या विशाल लष्कराचा त्यांना धोका नसून नैसर्गिक आपत्ती आणि इतर आंतरराष्ट्रीय आपत्तींच्या वेळी तो त्यांना मदतीचा हात देईल याबाबत हमी दिली. त्यानुसार भारतीय लष्कराने अलीकडे नेपाळ मध्ये झालेल्या भूकंपाच्या वेळी नेपाळला मदतीचा हात दिला. एवढेच नाही तर

इराक आणि येमेन मध्ये संघर्ष असलेल्या भागातून भारतीय लष्कराने शेजारी राष्ट्रांच्या नागरीकांची सुटका केली. या वर्षात भारत इतर देशांबरोबर डावपेचात्मक (स्ट्रॅटर्जिक) भागिदारीत सहभागी आणि अस्तित्वात असलेल्या डावपेचात्मक (स्ट्रॅटर्जिक) भागिदार्यांचे सबलीकरण करताना दिसला ज्यामुळे भारताची संरक्षण सिद्धता मजबूत होऊ शकेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या दक्षिण आशियाच्या बाहेरील पहिल्याच विदेश दौर्यात जपान मध्ये भारत-जपान द्विराष्ट्रीय संबंधांना 'विषेश धोरणात्मक / व्युहरचनात्मक (स्ट्रॅटर्जिक) जागतिक भागिदारीच्या स्तरावर नेले आणि संरक्षण क्षेत्रात सहकार्य आणि देवाणघेवाणीचा करार केला. भारत आणि जपानने त्यांच्यातील संरक्षण क्षेत्रातील सहकार्याला नवीन झळाळी तर दिलीच आणि त्याच बरोबर तिला सबल करण्याचे ठरवतांना लष्करी सामुग्रीसाठी सहयोग दृढ करण्यासाठी संयुक्त चर्चेला सुरवात केली आणि जपानी बनावटीच्या युएस-२ ऍंफिबियन विमानांच्या विक्रीसाठी वाटाघाटींनाही चालना दिली. संयुक्त निवेदनात संरक्षण तंत्रज्ञान, सामुग्री यासहित एकूणच संरक्षण सहकार्य यात नवीन उमेद आणि दिशा देण्याचा दोन्ही देशांचा मनोदय आहे आणि शांतता, स्थैर्य आणि सामरिक संरक्षणातील त्यांचे संयुक्त स्वारस्यही अधोरेखित केले. १९९८च्या अणू चाचण्यांच्या पार्श्वभूमीवर घालण्यात आलेली हिंदुस्तान ऍरोनॅटीक्स लिमिटेड (एच.ए.एल.) आणि इतर पाच भारतीय संस्थांवरील बंदीही जपानने शिथिल केली आहे. दोन्ही देश द्विराष्ट्रीक सामायिक सराव करण्यावरही सहमत झाले त्यात भारत-अमेरीका मलबार सामायिक सराव मालिकेत जपानच्या सहभागावरही दोन्ही देशांचे एकमत झाले.

या बरोबरच पंतप्रधान, परराष्ट्र व्यवहार मंत्री, परराष्ट्र व्यवहार खात्याच्या राज्यमंत्र्यांच्या प्रत्येक विदेश दौऱ्यांची आणि मान्यवरांच्या विदेश दौऱ्यांची संरक्षण क्षेत्रातील महत्वाच्या करारांमध्ये परिणीती झाली आहे.

**भारत-अमेरीका संरक्षण सहकार्य**

अमेरीका ही महासत्ता असून ती एकूण जागतिक खर्चाच्या एक तृतीयांश खर्च संरक्षणावर करते ज्याला तंत्रज्ञानातील आधुनिकतेची जोड आहे ज्यामुळे संरक्षण क्षेत्रात अमेरीके बरोबर सहकार्य खुप महत्वाचे ठरते. गेल्या वर्षात अमेरीका आणि भारताने संरक्षण क्षेत्रात जवळून सहकार्य करण्यासाठी नवीन रचनात्मक करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत ज्यात भारताने संरक्षण क्षेत्रात सज्ज राहण्यासाठी पावले उचलण्यावर भर दिला. १० वर्षांचा हा संरक्षण रचनात्मक कराराचे अमेरीकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्या जानेवारीत झालेल्या भारत दौर्यात नूतनीकरण करण्यात आले तर अमेरीकेचे संरक्षण सचिव ऍश कार्टर यांच्या भारत दौऱ्यांची दौऱ्यादरम्यान औपचारिकपणे सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्यात. याच दौऱ्यांची जवानांसाठी जैविक आणि रासायनिक युद्धापासून संरक्षण करण्यासाठी बचाव करणारी सामुग्री संयुक्तपणे तयार करण्याच्याही करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले ज्यात जनरेटर बनवण्याच्या कराराचाही समावेश होता. अनेक प्रकल्प ही मंजूर झाले आणि दोन्ही देशांमध्ये संरक्षण संबंधाची वाढ होण्यासाठी भारतीय नेत्यां बरोबर चर्चा करण्यात आली. भारतीय लष्कराला हत्यारांचा स्त्रोत म्हणून अमेरीकेने रशियाला गेल्या काही वर्षात मागे टाकले आहे आणि संरक्षण तंत्रज्ञानाचा संयुक्तपणे विकास आणि उत्पादन करण्याचाही प्रस्ताव भारताला देण्यात आला आहे. जवानांसाठी बचाव करणारी वस्त्रे आणि युद्धभूमीसाठी पुढच्या पिढीचे ऊर्जेचे शक्ती स्त्रोत बनवणे अशा दोन्ही प्रकल्पांसाठी १ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतके भांडवल असेल आता ज्यात दोन्ही देशांचा संयुक्त वाटा असेल.

संरक्षण तंत्रज्ञान आणि व्यापार प्राधान्य जे डॉ. कार्टर यांनी संरक्षण सचिव पदावर बढती मिळण्या अगोदर स्वत: सादर केले त्यातील दोन प्रकल्पांचा संबंध सी-१३० लष्करी दळणवळण विमानासाठी रेव्हन मिनी-युएव्ही आणि पाळत ठेवण्याच्या प्रणालीशी संबंधित आहे. भारतही ब्रिटनकडून जवळजवळ ३० वर्षापूर्वी घेतलेल्या विमानांच्या जीर्ण होत असलेल्या शृंखलेची जागा घेण्यासाठी अमेरिकन विमान उड्डाण तंत्रज्ञान विमानांच्या निर्मितीसाठी लक्ष्य ठेवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे की, अमेरीकन

कंपन्या खास करून संरक्षण उत्पादन क्षेत्रात काम करणार्या कंपन्या "मेक इन इंडीया" उपक्रमात सहभागी होतील आणि तंत्रज्ञान हस्तांतरणासहित भारतात उत्पादन केंद्रांची निर्मिती करून जागतिक पुरवठा मालिकेत सहभागी होतील.

### भारत-फ्रान्स संरक्षण सहकार्य आणि रफेल करार

संरक्षण क्षेत्राच्या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदींचा सगळ्यात महत्वाचा दौरा हा **फ्रान्सचा** होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रांन्सचे अध्यक्ष फ्रांकोसिस हॉलंडे यांच्या बरोबर विविध मुद्यांवर चर्चा केल्यावर भारत आणि **फ्रान्सने** संरक्षण आणि सुरक्षेला लक्षात घेऊन अनेक करारांवर स्वाक्षर्या केल्या ज्यात महाराष्ट्रात रखडलेल्या जैतापूर अणू प्रकल्पाचाही समावेश होता. स्थानिकीकरण, आर्थिक व्यवहार्यतेत सुधारणा करून जैतापुर प्रकल्पाचा खर्च कमी करण्यासाठी लार्सन आणि टुब्रो आणि अरेवा यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे तंत्रज्ञान हस्तांतरण ही शक्य होऊन भारतीय बनावटीच्या अणू तंत्रज्ञानाचा विकास ही शक्य होणार आहे. एन.पी.सी.एल. आणि अरेव्हा यांच्यात अभियांत्रिकी करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या ज्याचा भर तंत्रज्ञानाशी संबंधित बाबींवर स्पष्टता आणण्याचा आहे ज्यामुळे सर्व भागधारक (अरेवा, अल्सटोम आणि एन.पी.सी.एल.) त्यांच्या किंमती ठरवू शकतील आणि सर्व जोखमीच्या तरतुदींचा या स्तरावर वापर करणे शक्य होईल जे प्रकल्पाच्या या स्तरावरील खर्चात समाविष्ट असेल. जरी हे करार नागरी अणू ऊर्जेच्या बाबतीत असले तरी ज्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण केले जात आहे जे संरक्षण क्षेत्रासाठी ही खूप उपयुक्त आहे आणि यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "मेक इन इंडीया" अभियानालाही चालना मिळणार आहे.

दोन्ही नेत्यांनी अवकाश क्षेत्रा बाबतही चर्चा केली. भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो) आणि फ्रान्सच्या राष्ट्रीय अवकाश अभ्यास केंद्र (सी.एन.ई.एस.) यांच्यात भारतीय उड्डाण यंत्र पीएसलव्ही द्वारे सोडण्यात आलेल्या भारत-फ्रान्स मेघा उष्ण कटिबंध उपग्रह माहिती देवाणघेवाणीच्या कराराला दोन वर्षांची मुदतवाढ देण्याच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दोन्ही अवकाश संघटनांमध्ये सुदूर संवेदन उपग्रह क्षेत्र, उपग्रह संभाषण आणि हवामान उपग्रह क्षेत्रात सहकार्य यांसाठी करार करण्यात आला.

**फ्रान्स** जेव्हा उड्डाणाच्या स्थितीत असलेली ३६ रफेल फायटर विमाने भारताला त्वरीत देण्यास तयार झाला तो करार सर्वात महत्त्वाचा संरक्षण करार होता. भारतीय वायुसेनेने बऱ्याच काळापूर्वी रफेल विमानाची स्वत:ची १२६ बहुउद्देशीय विमानांची गरज पूर्ण करण्यासाठी निवड केली होती. १८ विमाने आयात केल्यानंतर ही बहुतेक विमाने एच.ए.एल. अर्थात येथे उत्पादीत केली जाणार आहेत. परंतु फ्रेंच कंपनी एच.ए.एल. बाबत समाधानी नसल्यामुळे एच.ए.एल. मध्ये उत्पादीत झालेल्या विमानांसाठी जबाबदार रहायला तयार नसल्यामुळे करार रखडला होता आणि कराराची अंमलबजावणी ही होऊ शकली नव्हती. या सगळ्या दरम्यान भारतीय वायुसेनेला प्रत्युत्तर देण्यासाठीच्या क्षमतेत घट झाल्यामुळे कमतरता जाणवायला लागली. भारतीय वायुसेनेने मंजूर केलेल्या आणि चाचणी केलेल्या ठेवणी अनुसार ३६ विमाने मिळणार नसल्यामुळे आणि फ्रांन्सने भारतीय वायुसेनेच्या वापरात्मक गरजां ठरवल्यानुसार अधिक काळ देखभालीची जबाबदारी घेतली आहे.

### भारत-रशिया संरक्षण सहकार्य

पाच दशकांपासून युएसएसआर आणि त्याच्या विघटना नंतर रशिया हा भारतासाठी संरक्षण सामुग्रीचा मुख्य पुरवठादार राहीला आहे. त्यामुळे रशिया बरोबर संरक्षण सहकार्य हे भारतासाठी महत्त्वाचे राहीले आहे जे काळाच्या विवीध कसोट्यावंर आणि संकटातून गेले आहे. अध्यक्ष पुतीन ११ डिसेंबर २०१४ रोजी वार्षिक शिखर परिषदेसाठी नवी दिल्लीत आले होते जी नरेंद्र मोदी सत्तेत आल्यानंतरची पहिलीच भेट होती. सदर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियन बनावटीच्या आय.एन.एस. विक्रमादित्य वाहकाचे संरक्षण सहकार्य वाढवण्याचे उदाहरण दिले आणि असे प्रतिपादन केले की, "भारताचे पर्याय वाढले असले तरी रशिया भारतासाठी संरक्षण क्षेत्रातील आघाडीचा सहकारी राहील" जे दिर्घ कालीन संरक्षण संबंधांचे द्योतक होते

**'मेक इन इंडीया'** कार्यक्रमाच्या अधीन राहून रशियन तंत्रज्ञान वापरून

मिल एमआय-१७ आणि कामोव्ह का-२२६ हेलिकॉप्टर्सच्या भारतात संयुक्त उत्पादन बाबत दोन्ही बाजूं मध्ये सहमती झाली तसेचं बराच काळ रखडलेल्या हलक्या वाहतूक विमानांचे संयुक्त विकास आणि उत्पादना सारख्या प्रकल्पांना वेग देण्या बाबतही सहमती झाली. सुखोई आणि एच.ए.एल. यांच्या द्वारे पाचव्या पिढीचे संयुक्त फायटर प्लॅटफॉर्म निर्माण करण्यासाठी ही बोलणी झाली. अंतिम रचनेच्या आराखड्यावर लवकरच स्वाक्षरी करण्यात येणार आहे. आय.एन.एस. चक्र जी आधीच सेवेत आहे त्यानंतर 'अकुला क्लस' ही अणू सक्षम पाणबूडी द्यायला ही रशियाने तयारी दर्शवली आहे

रशियन "एम. आय. ३५" ही आक्रमक हेलिकॉप्टर्स पाकिस्तानला विक्री केल्यामुळे रशिया–पाकिस्तान संरक्षण क्षेत्र सहकार्यांतर्गत येणाऱ्या वातम्यांमुळे भारतला रशियाच्या व्यापार निती बद्दल शंका होत्या परंतु रशियन राजदुतांनी रशिया भारताच्या सुरक्षेला बाधक ठरणार नाही असे सांगून खंडन केले. स्वत: पुतिन यांनी पीटीआय या भारतीय वृत्त संस्थेला दिलेल्या मुलाखतीत रशिया-पाकिस्तान संबंध हे भारताच्या दीर्घकालीन हिताचे असतील असे प्रतिपादन केले आहे.

**भारत-ऑस्ट्रेलिया संरक्षण सहकार्य**

गेल्या वर्षात भारत आणि ऑस्ट्रेलिया यांनी द्विराष्ट्रीय संरक्षण सहकार्यासाठी एक रचनात्मक ढाचा तयार केला आहे ज्या द्वारे त्यांनी आपली संरक्षण आघाडी प्रांतिक शांततेत वाढ करणे आणि दहशतवादाचा बिमोड करणे अशा आव्हानांसाठी घट्ट केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे ऑस्ट्रेलियन सहकारी टॉनी ऍबॉट्ट यांनी दोन्ही देशांच्या वाढत्या सुरक्षेचा आणि संरक्षण आघाडी वाढवण्यासाठी संरक्षण सहकार्याचा रचनात्मक ढाचा तयार करण्यावर चर्चेद्वारे सहमती दर्शवली. त्यांनी ऑस्ट्रेलीया आणि भारत यांच्या दृष्टीने एकत्रित अशा कळीच्या मुद्द्यांवर सहकार्य आणि मदत वाढवण्यासाठीचा रचनात्मक ढाचा तयार केला. या सहकार्याचा मुख्य भर साामायिक सुरक्षेवर होता. ऑस्ट्रेलियन संसदेला संबोधित करताना पंतप्रधान असे म्हणाले की "आपण सामायिक सुरक्षा राखण्यासाठी जास्त एकत्रित येऊ. सागरासाठी आपण एकत्रित कार्य करावे आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर संयुक्त असावे. आणि आंतराष्ट्रीय कायदे आणि जागतिक नियमांचा वैश्विक आदर व्हावा यासाठी कार्य करावे."

सदर निर्णय म्यानमार पूर्व आशिया आणि आसियान शिखर परिषदांमध्ये घेतलेल्या सामरिक सुरक्षेसाठीच्या भागीदारी नुसार आहे. त्यानुसार भारताच्या आणि ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी कृती आराखड्यावर सहमती दर्शवली, ज्यानुसार वार्षिक शिखर परिषद आणि परराष्ट्र धोरण देवाण घेवाण यात समन्वय असेल. सदर आराखड्यानुसार पंतप्रधानांची वार्षिक बैठक असेल ज्यात बहु राष्ट्रीय बैठकींची रूपरेखा ही असेल. यात संरक्षण मंत्र्यांच्या बैठकींचाही समावेश असेल ज्यानुसार संरक्षण धोरण, सेवांद्वारे सहकार्य ज्यात उच्च स्तरीय दौरे, कर्मचार्यांची वार्षिक चर्चा, संयुक्त प्रशिक्षण, कवायती आणि द्वैराष्ट्रीक सामरीक सराव यांचाही समावेश असेल. यात भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या संरक्षण साहित्य समुहांच्या दौऱ्यांद्वारे आणि उद्योगांच्या जोडणीद्वारे संरक्षण संशोधन आणि विकास सहकार्य यांना चालना देण्याचा ही प्रयत्न करण्यात आला आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या कृती आराखड्यात दहशतवादाला प्रत्युत्तर आणि इतर सीमा पलीकडचे गुन्हे, दहशतवादाला रोखण्याबाबत सहकार्य, बॉम्बस्फोट, विस्फोटक उपकरणांना रोखण्यासाठीच्या तज्ञांमध्ये देवाणघेवाण आणि प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान व संबंधित आशयांबाबत वार्षिक संयुक्त कृती दल यांचाही समावेश आहे. कृती आराखड्यावरील प्रगतीचा आराखडा स्थापन करण्यात आलेल्या संस्थात्मक रचनांद्वारे ज्यात परराष्ट्र मंत्र्यांचा कृती आराखड्याद्वारे संवाद आणि संरक्षण मंत्र्यांची बैठक यांचाही समावेश असेल.

**इतर देशांबरोवर संरक्षण सहकार्य**

गेल्या वर्षात भारत आणि दक्षिण कोरिया यांनी संरक्षण सहकार्यात वाढ करण्याचे नुकतेच ठरविले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दक्षिण कोरिया दौर्याच्या वेळी जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनातील १० पैकी सात मुद्यांमध्ये संरक्षण सहकार्यावर भर देण्यात आला आहे. यात मुख्यत्वे दक्षिण कोरिया आणि भारत यांच्या जहाज

बांधणीच्या कारखान्यांमध्ये देवाणघेवाण यांचा मुख्यत्वे समावेश आहे. या अंतर्गत दक्षिण कोरिया आणि भारत दरम्यान संयुक्त विद्यमाने, तंत्रज्ञान हस्तांतरणांर्गत, भारतीय नैदलासाठी युद्ध नौकांची बांधणी यांचा समावेश आहे.

त्याप्रमाणेच भारत आणि कॅनडा यांच्या कंपन्यांमध्ये अणू ऊर्जा, एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रात व्यावसायिक करार, गेल्या वर्षभरात जाहीर करण्यात आले आहेत. यातील एका व्यावसायिक करारांतर्गत संस्काचव्हन स्थित कॅमेको कंपनी भारताला आगामी पाच वर्षात ७ दशलक्ष पौंड एवढ्या किंमतीचे युरेनियम देईल. भारत सरकारच्या प्रयत्नांनी वाटाघाटी झालेल्या भारत-कॅनडा अणू सहकार्य करारामुळे सदर करार शक्य झाला आहे.

भारताशी निकटचे पारंपारिक संरक्षण संबंध असलेल्या मॉरिशिअस बरोबरही सुधारित संरक्षण सहकार्य गेल्या वर्षात दिसून आले आहे. सदर बेटावरील पहिल्या भेटीत परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज २ नॉव्हेबर २०१४ रोजी अप्रवासी दिवसाच्या समारंभात सहभागी झाल्या. सदर दौऱ्यांची व्युहात्मकदृष्ट्या महत्वाच्या हिंदी महासागराच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे असे भारतीय नौदल आणि मॉरिशिअसच्या तटरक्षक दल यांच्यातील सहकर्य हा आघाडीचा मुद्दा होता. भारताच्या तीन महत्वाच्या युद्धनौका भारतीय नौदल आणि मॉरिशिअसच्या तटरक्षक दलाच्या सहकार्याला अधिक बळकटी देण्यासाठी सदर कार्यक्रमाच्या काळात मॉरिशिअसच्या समुद्रात तळ ठोकून होत्या.

निकटचे संरक्षण सहकार्य लाभलेला आणखी एक देश म्हणजे इस्त्राईल. दोन्ही देशांनी दहशतवादाला रोखण्यासाठी भागीदारी केली होती आणि क्षेपणास्त्र, मानवरहीत हवाई वाहने अशी अत्याधुनिक संरक्षण उपकरणे भारताला देण्यात इस्त्राईल आघाडीवर राहीला आहे. सदर भागिदारीचा गेल्या वर्षात विस्तार झाला आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या वर्षात इस्त्राईलचा दौरा करणार आहेत जी भारतीय पंतप्रधानांची इस्त्राईलला पहिली भेट असेल.

**सारांश**

जगातील विविध देशांबरोबर भारताच्या संरक्षण सहकार्यात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. हे सगळे आंतरराष्ट्रीय समुदाय भारता बाबत करत असलेल्या उत्तम भविष्याचे द्योतक आहे आणि त्याच बरोबर भारतीय सुरक्षादलांवरील वाढता विश्वास ही दर्शवतो. आपली सुरक्षितता वाढवण्यासाठी भारताच्या बाजूने येण्याकडे देशांचा मोठ्या प्रमाणावर कल आहे. येणाऱ्या दिवसांमध्ये हे सहकार्य अजून वाढणार आहे आणि देशाचे भविष्य बदलण्याची क्षमता असलेल्या **"मेक इन इंडिया"** कार्यक्रमालाही चालना मिळणार आहे.

*(लेखक **अलोक बन्सल** हे सुरक्षा आणि व्युहरचना धोरण केंद्र, इंडिया फाऊंडेशनचे संचालक आहेत.*

**संपर्कासाठी ई-मेल :** alokbansal_nda@yahoo.com

## आगामी अंक

**ऑगस्ट – २०१५**

**"आंतर्रभूत वृद्धी आणि सामाजिक बदल"**

**या विषयावर असेल**

# दूरवैद्यक आणि आरोग्य विकास

— डॉ. सुजाता वॉरियर



**भारताच्या ग्रामीण भागातील अपघात, हार्ट अटॅक, बाल, शिशु व माता मृत्युदराचे प्रमाण बघता अत्यंत प्रभावी, खर्चीक परंतु आवश्यक असलेली दूरवैद्यक पद्धतीची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. यामुळे सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असलेल्या रुग्णांना दूरवैद्यक पद्धतीमुळे तत्काळ, घरपोचं किंवा ग्रामीण रुग्णालयात उपचार घेता येऊन उपरोक्त बाबींमुळे होणाऱ्या मृत्युदरात घट आणता येईल. यासाठी जनजागृती बरोबरचं नवीन वैद्यकीय तंत्रज्ञानाची आवश्यकता आहे. भारत सरकारने आरोग्य विकासांतर्गत दूरवैद्यक प्रणाली विकसनाला प्राथमिकता दिली आहे काय आहे दूरवैद्यक प्रणाली ?**

एखाद्या राष्ट्राचा विकासासाठी तिथल्या रहिवाशांनी चांगल्या आरोग्याचा आस्वाद घेणे महत्त्वाचे आहे. निरोगी कामगार ही राष्ट्राची संपत्ती आहे व त्यांच्या यशस्वी आयुष्यासाठी गुणवत्तापूर्ण आरोग्य आवश्यक आहे. 'आरोग्य विकास' या शब्दाचा अर्थ लोकांच्या आरोग्याचा आलेख सुधारणे. यातून मृत्युदरातील घट, जुनाट व संसर्गजन्य रोगांचे उद्भव निर्मुलन, वैद्यकीय साक्षरता वाढविणे आणि भारतीय नागरिकांना गुणवत्तापूर्ण स्वास्थ्याची समान उपलब्धता सूचित होते. आरोग्य ही संपत्ती मानली जाते आणि भारतात 'स्वास्थ्य निगा' तरतूद ही जबाबदारी मुख्यत्वे राज्यांची आहे, म्हणून भारतातील लोकांच्या आरोग्याची काळजी सर्वसाधारणपणे सरकारकडून घेतली जाते. बरेचसे सार्वजनिक स्वास्थ्य निगा उपक्रम ब्रिटिश काळात व स्वातंत्र्योत्तर काळात राबवण्यात आले असले तरीही त्यातून फारसे काही साध्य झाले नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून ६८ वर्षे झाल्यानंतरही आरोग्याविषयक कामगिरी कमीच म्हणावी लागेल. सरकारतर्फे अनेक स्वास्थ्य उपक्रम हाती घेण्यात आले मात्र ते लोकांपर्यंत पुरेसे पोहोचलेच नाहीत. सर्वांसाठी स्वास्थ्य निगा उपलब्ध होण्यामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात त्रुटी व तफावत आढळून आल्या आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील गरीबांपर्यंत कोणत्याही प्रकारची गुणवत्तापूर्ण स्वास्थ्य निगा सेवा अजिबात पोहचत नाही.

जगातील सगळ्या भागांत जागतिकीकरणाचा खूप खोलवर प्रभाव पडला आहे. त्याचे सकारात्मक तसेच नकारात्मक परिणाम आरोग्यावर पडले. सर्वसाधारणपणे 'राहणीमानाशी संबंधित आजार' असे ज्यांना म्हटले जाते त्या आरोग्याविषयीच्या अनेक जुनाट रोगांना जागतिकीकरणाने आमंत्रण दिले. दुसरीकडे त्याच जागतिकीकरणाने आरोग्याच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणेही शक्य झाले. दूरवैद्यक म्हणजेच टेलिमेडिसिन म्हणजे वैद्यक क्षेत्रात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करणे. टेली या ग्रीक शब्दाचा अर्थ दूर व मेडेरी ह्या लॅटिन शब्दाचा अर्थ बरे होणे. दूर अंतरावरून आजाराची निगा राखणे व त्यावर उपचार घेणे याअर्थी हा शब्द आहे. ह्यासाठी दूर-स्वास्थ्य हाही शब्द प्रचलित आहे. जगभरातील स्वास्थ्य निगा उद्योगात दूरवैद्यक हा महत्त्वाचा पैलू ठरत आहे. जगभरात आधीच खूप ओझ्याखाली दबलेल्या स्वास्थ्य निगा उद्योगात हा आता महत्त्वाचा तारणहार मानला जात आहे.

दूरवैद्यक ही पूर्णपणे नवी संकल्पना असली तरी अनेक युगांपासून ती वापरली जात आहे. दूरध्वनीच्या शोधानंतर, हृदय व यकृत या अवयवांची स्थिती जाणून घेण्यासाठी

त्याचे ध्वनी प्रशिक्षित तज्ज्ञाकडे पाठवण्याकरता दूरध्वनीचा उपयोग केला जात होता. खराब पारेषण प्रणालीत मात्र हा प्रयत्न अयशस्वी ठरू शकतो. इ.स. १९०६ मध्ये पहिल्यांदा ईसीजी पारेषित करण्यात आला. इलेक्ट्रोकार्डियोग्राफीचा जनक असलेल्या विलेम आईन्थोव्हेन या डॉक्टरने १९०६ मध्ये पहिल्यांदा टेलिफोन लाईनचा वापर करून पारेषणाचे तंत्र शोधून काढले. त्यावर इलेक्ट्रो कार्डियो ग्रामची शरीरक्रियाशास्त्रातील आंतरराष्ट्रीय प्राप्ती याविषयावर त्यांनी लेखही लिहिला. समुद्र किनाऱ्यावर आलेल्या जहाजांमधील लोकांना अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देण्यासाठी १९२० साली डॉक्टर्स रेडियोचा वापर करत असत. १९२४ साली दूरनिगेचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. अमेरिकेतल्या ओमाहामधील नेब्रास्का मानसोपचारशास्त्र संस्थेत १९५५ पासून दूरमानसोपचारशास्त्राची सुरूवात झाली. मॅसेशेटस् या अमेरिकेतील सर्वोपचार रुग्णालयाने विमानतळ कर्मचाऱ्यांसाठी व्यावसायिक आरोग्य सेवा देण्यास सुरुवात केली व अत्यावश्यक सेवा पुरवली. अलास्काच्या दुर्गम भागात व कॅनडातील गावांमध्ये उपग्रह दूरवैद्यकाची सुरुवात १९७० मध्ये झाली. दूरविकृतीशास्त्राद्वारे विकृतीशास्त्राच्या अहवालांची देवाणघेवाण करणे शक्य झाले, १९८६ साली पहिल्यांदा कॅनडात हा प्रयोग करण्यात आला.

दूरवैद्यकाद्वारे अंतरावरून वैद्यकीय सेवा पुरवणे सुकर होते. ग्रामीण भागातील रुग्णांना कमी किंमतीत वैशिष्ट्यपूर्ण स्वास्थ्य निगा पुरवण्यासाठी तसेच ग्रामीण डॉक्टरांचे व्यावसायिक दूरत्व कमी करण्यासाठी हा एक परिणामकारक मार्ग उपलब्ध झाला आहे. भारतात इस्रोने ग्रामीण भागातील अनेक रुग्णालयांना शहरातल्या वैशिष्टपूर्ण रुग्णालयांशी भारतीय उपग्रह इन्सॅटने यशस्वीरीत्या जोडले. इस्रोच्या मदतीने दूरवैद्यकाचा पहिला पथदर्शक प्रकल्प २००१ मध्ये सुरू करण्यात आला, या प्रकल्पाद्वारे चेन्नईच्या अपोलो हॉस्पीटलने आंध्र प्रदेशातल्या चित्तोर जिल्ह्यातील अरगोंदा गावातल्या अपोलो ग्रामीण रुग्णालयांना जोडण्यात आले. तत्पूर्वी लखनऊमधल्या संजय गांधी पदव्युत्तर वैद्यकशास्त्र संस्थेने १९९८ साली स्वास्थ्य आकडेवारीची साठवण व प्रक्रिया ह्यासाठी रुग्णालय माहिती प्रणाली विकसित केली, १९९९ पासून या संकल्पनेची तंत्रज्ञानाने चाचणी घेण्यास सुरुवात केली.

अनेक बहु-विशेषता रुग्णालयांमध्ये दूरवैदयकाचा वापर २००१ सालापासून करण्यात येऊ लागला. त्यामध्ये अमृता वैद्यकशास्त्र संस्था कोची, नारायण हृदयालय बंगळूरू, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस दिल्ली, टाटा मेमोरियल हॉस्पीटल अॅण्ड रिसर्च सेंटर परेल, मुंबई इत्यादी ठिकाणी दूरवैद्यक उपक्रम राबवले जातात. सध्या ही रुग्णालये रुग्णांवर उपचार करण्यासाठी व वैद्यक साक्षरता पुरवण्यासाठी दूरवैद्यकाचा वापर करतात. दूरवैद्यक उपक्रमांच्या मदतीने या बहु-विशेषता रुग्णालयांनी जगभरातल्या अनेकांचे जीव वाचवले आहेत.

कर्नाटक दूरवैद्यक प्रकल्प हा कर्नाटकात २००२ साली सुरू करण्यात आला. त्यातून चामराजनगर जिल्हा रुग्णालय व विवेकानंद स्मृती रुग्णालय सरगर, हुडकोट, ह्यांना जोडण्यात आले.सध्या नारायण हृदयालय हेल्थ सिटी, जयदेव हॉस्पीटल व एनआयएमएचएएनएस बंगळुरू यांसारखीअनेक जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सरकारी बहु-विशेषता रुग्णालयेह्याद्वारे जोडण्यात आली आहेत. ग्रामीण रुग्णालयांत रुग्णांना दाखल करून घेण्यात येते, व्हिडियो कॉन्फरन्सिंग वैद्यकीय अहवालांची व प्रत्यक्ष प्रतिमांची देवाणघेवाण करून ग्रामीण रुग्णालयांतील रोग्यांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व उपचार दिला जातो. सार्वजनिक आरोग्यातील माहिती व संपर्क तंत्रज्ञानाचे सामाजिक परिणाम व कार्ये या विषयावरील कर्नाटक दूरवैद्यक प्रकल्पातील पी.एच्.डी. संशोधनातील प्रकरण अभ्यासातून, ग्रामीण भागातील रोग्यांच्या आरोग्यात सुधारणा करण्यासाठी दूरवैद्यक प्रकल्प अत्यावश्यक असल्याचे आढळून आले आहे. या सर्वेक्षणात ९६ रुग्ण, १५ डॉक्टर्स, १५ दूरवैद्यक तंत्रज्ञ अशा एकूण १२६ प्रतिसादकांचा समावेश होता. हे एक गुणात्मक संशोधन होते. त्यात कर्नाटकातल्या चमराजनगर, उडुपी, देवांगरे, चित्रदुर्ग, कुंदापूर, बेंगलुरू या व पश्चिम बंगाल मधील बांकुरा, सिलिगुडी, कोलकाता या गावांतीलरुग्ण,

डॉक्टर्स, तसेच दूरवैद्यक ह्यांच्या मुलाखतींचा व त्यांना दिलेल्या प्रश्नमालिकांचा अंतर्भाव होता. स्वत: स्वास्थ्य निगा उपचार घेणे ज्यांना परवडत नाहीत अशा गरीब लोकांना दूरवैद्यक प्रकल्प फायदेशीर ठरले आहेत. बरेचसे रुग्ण पैसे उसने घेऊन, व्याज काढून किंवा मालमत्ता विकून चांगल्या उपचारांसाठी लागणारे पैसे उभे करतात. आरोग्य विमा किंवा तत्सम सुरक्षा योजनांच्या अभावामुळे गुणात्मक आरोग्य भारतातील जनतेसाठी लांबचे स्वप्नच राहते. या सर्वेक्षणातून खालील मुद्दे स्पष्ट होतात

**रुग्णांचे वयानुरूप वर्गीकरण**

खालील आकड्यांनुसार दूरवैद्यक सल्ला घेणारे मुख्यत्वे ५१ ते ६० या वयोगटातील असतात.

**रुग्णांचे लिंगनिहाय वर्गीकरण**

स्त्री आणि पुरुष ह्यांच्या स्वास्थ निगा सेवांचा वापर करण्यात बरीच तफावत असते असे या अभ्यासात दिसून आले. एकूण ७८.१२ टक्के पुरुष तर केवळ २१.८८ टक्के स्त्रिया उपचारासाठी दूरवैद्यकाचा वापर करतात. यातून हे स्पष्ट होते की, महिलांना हृदयविकाराचा इतिहास असला तरीही फुकट मिळणाऱ्या दूरवैद्यक तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेण्याकरता त्या इच्छुक नसतात.

**वैवाहिक स्थिती**

लग्न न झालेल्या रुग्णांपेक्षा लग्न झालेल्या रुग्णांमध्ये दूरवैद्यक तंत्रज्ञान वापरण्याची संख्या जास्त असते. लग्न झालेल्या रुग्णांच्या म्हणण्यानुसार,स्वास्थ्य निगेचे मौलिक तंत्रज्ञान जिथे वापरले जाते, त्या जवळच्याच रुग्णालयात जाणे त्यांनी पसंत केले, कारण तेथे त्यांच्या कुटुंबाची सोबत त्यांना मिळत होती. त्यामुळे त्यांच्या जबाबदाऱ्या त्यांना पार पाडता येत असल्याचे समाधान त्यांना मिळते.

**जातिव्यवस्था**


संशोधनातून हे उघड होते की, उच्च, मध्यम व निम्न वर्ग ह्यांच्यातील सगळ्याच जातीचे लोक स्वास्थ्य निगेच्या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करतात. भारतातील जातीप्रधान समाजात, अगदी आजही काही उच्चजातीय डॉक्टर्स खालच्या जातीतील रुग्णांना स्पर्श करण्यास अनुत्सुक असतात, अशावेळी खालच्या जातीतील रुग्णदूरवैद्यकाद्वारे मोफत सल्ला घेऊन कोणत्याही सामाजिक कलंकापासून दूर आणि तरीही आपल्या जातीत राहू शकतो.

**शैक्षणिक पार्श्वभूमी**

अशिक्षितदेखील स्वास्थ्य निगा तंत्रज्ञानाचा वापर करतात. त्यांची संख्या ३९.५८ टक्के इतकी आहे. सुशिक्षित रुग्णसुद्धा या तंत्रज्ञानाचा फायदा घेतात.

**दूरवैद्यकाचे कार्य**

आरोग्य ही खरी संपत्ती आहे, ही वस्तुस्थिती सगळ्यांना माहीत आहे. राष्ट्राची संपत्ती मानव संसाधनांवर अवलंबून आहे.



**व्यक्ती समुदाय समाज राष्ट्र जग**

मानव संसाधन विकास हा माणसाच्या श्रमातून होणारा विकास आहे. आरोग्यपूर्ण श्रमदान अधिक उत्पादक असते. कामाची कार्यक्षमता कामगाराच्या आरोग्यावर अवलंबून आहे. पूर्वी केलेले संशोधन असे सांगते की, एका व्यक्तीच्या एका दिवसाच्या आजारपणाच्या सुटीमुळे त्या व्यक्तीबरोबरच राष्ट्राचेही नुकसान होते. लोकसंख्या निरोगी असली तरच राष्ट्राचा विकास होतो. म्हणूनच निरोगी कामगार ही राष्ट्राची संपत्ती आहे. संशोधनातून सिद्ध झाल्याप्रमाणे दूरवैद्यक व्यक्ती, समुदाय, समाज, राष्ट्र, व जग या सगळ्यांना फायदेशीर आहे. काही फायदे पुढीलप्रमाणे

१. **वेळेची बचत –** दूरवैद्यकाच्या मदतीमुळे रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडे जाण्यासाठीचा वेळ वाया घालवावा लागत नाही. त्यांना दूरवैद्यक सेवा उपलब्ध असेल अशा जिल्हा सरकारी रुग्णालयात किंवा तालुका पातळीवरील रुग्णालयात दाखल करता येऊ शकते.

   सरकारी दवाखान्यात दाखल झालेल्या रुग्णांना दीर्घकालीन आरोग्य समस्या होत्या. ते सगळे हृदयरोगी होते. संशोधनातून असे दिसून आले की, ७८ टक्के रुग्णांनी सांगितले की, दूरवैद्यकामुळे त्यांचे आयुष्य वाचले. आणीबाणीच्या परिस्थितीत त्यांना दूरवर प्रवास करून बहु-विशेषता रुग्णालयापर्यंत जावे लागले नाही. त्यांचे योग्य ठिकाणी योग्य निदान झाले.

२. **पैशाची बचत –** संशोधनातून स्पष्ट झाले आहे की, दूरवैद्यकामुळे रुग्णांचे पैसे वाचतात. हृदयविकार किंवा कर्करोगासारख्या जुन्या आरोग्य समस्यांमध्ये भरपूर पैसे असलेल्या रुग्णाला बहु-विशेषता रुग्णालयातील हृदयरोग तज्ज्ञ किंवा कर्करोग तज्ज्ञ परवडू शकतो मात्र दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत असलेल्या गरीब रुग्णाला अशा खर्चिक शस्त्रक्रियांचा काही उपयोग नाही. अशा व्यक्तीचे दोन्ही बाजूने मरण होते, एक तर त्याची आर्थिक परिस्थिती व दुसरे आरोग्य समस्या. बऱ्याच वेळा गरीब व्यक्ती त्याच्या आरोग्यसमस्या कुटुंबसदस्यांना देखील सांगत नाहीत. त्यांच्या आर्थिक समस्यांमुळे त्यांना उपचारांपेक्षा मृत्यू बरा वाटतो. या पाहणीत असे दिसून आले की, ८१ टक्के रुग्णांना दूरवैद्यक पैशाच्या दृष्टीने परिणामकारक आहे. सर्वेक्षणातील एकूण रुग्णांपैकी बरेचसे रुग्ण गरीब शेतकरी वर्गात मोडणारे होते. त्यांनाही किंमतीच्या तुलनेत ही उपचार पद्धती फायदेशीर वाटली.

३. **निगा पुरवणे –** दूरवैद्यकने निगा पुरवली जाते असे या पाहणीतल्या ६५ टक्के रुग्णांचे मत होते. दूरवैद्यक सल्ल्याची निरीक्षणे आणि रुग्णांच्या घेतलेल्या मुलाखती हे सांगतात की, हृदयरोग झालेल्या व रुग्णालयात दाखल करून घेतल्यानंतरच्या गंभीर परिस्थितीत त्यांचा जीव वाचवण्यासाठी त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. दुसऱ्या दिवशी त्यांची प्रकृती स्थिर झाल्यानंतर संशोधकाने विचारलेल्या प्रश्नांनाही रुग्णांनी प्रतिसाद दिला. सरकारी रुग्णालयांमध्ये आणीबाणीच्या प्रसंगी हृदय विकारांत थ्रोम्बोसिसचा वापर रुग्णांमध्ये केला जातो. वेळोवेळी देण्यात आलेल्या अत्यावश्यक वैद्यकीय निगा व उपचार यांमुळे रुग्णांचा जीव वाचवता आला.

४. **रोगातून पीडानिवारण –** दूरवैद्यकाच्या मदतीने रुग्णांना त्यांच्या आजारातून विशेषतः हृदयरोगाचा जुना इतिहास असलेल्यांचे पीडानिवारण झाल्याचे संशोधनातून दिसून आले. जवळपास सगळेच रुग्ण दोन-तीन वर्षांपासून हृदयरोगाने पछाडलेले आहेत. त्यात ६४.५८ टक्के रुग्णांनी दूरवैद्यकाने त्यांच्या आरोग्याच्या समस्या सुटल्याचे सांगितले. या संशोधनातून हेही स्पष्ट होते की बऱ्याच रुग्णांनी आयसीटीचा वापर त्यांच्या आरोग्य समस्या सोडवण्यासाठी केला होता. जवळजवळ ६१.४६ टक्के लोकांनी दूरध्वनीचा वापर त्यांच्या आरोग्य समस्या सोडवण्यासाठी केला, तर २६.९८ टक्के रुग्णांनी संगणकाचा वापर करून त्यांच्या आरोग्याच्या समस्या सोडवल्या.

संगणकवापरकर्त्यांची संख्या अत्यल्प असली तरी कर्नाटकातील ज्या चित्रदुर्ग, कामराजनगर, उडुपी, दावणगिरी व कुंदापूर या पाच गावांत हे सर्वेक्षण घेण्यात आले त्यामानाने ती दखल घेण्याइतपत नक्कीच आहे. ग्रामीण भागातल्या एकूण लोकसंख्येपैकी अल्प लोकसंख्येच्या खेड्यांमध्ये, पुरेशा पायाभूत सुविधा नसतानासुद्धा, रुग्णांनी हे उपचार घेतले, हे येथे उल्लेनीय.

५. **रुग्णांना डॉक्टर जवळ असल्याचे समाधान मिळते –** भारत हा जातिव्यवस्थेचे वर्चस्व असलेला देश आहे. दूरवैद्यकामध्ये डॉक्टर्स स्पर्श करून तपासणार नसल्याने रुग्ण डॉक्टरांना धीटपणे सामोरे जाऊ शकतात. त्यामुळे ते डॉक्टरांच्या निकट असल्याचे भासण्यास मदत होते. उपचार करणारे डॉक्टर एकतर दूरवर आहेत आणि ते अनुभवी व तज्ज्ञ आहेत याची जाणीव रुग्णांनाही असते. मॉनिटरवर त्यांना बघितल्यावर त्यांच्याबद्दल रुग्णांच्या मनात आदर निर्माण होतो. ते दूर जरी असली तरी शहरातील नामवंत डॉक्टर आहेत त्यामुळे विशेष जवळीक तयार होते. दूरसल्लागार जवळचा वाटला का असे विचारल्यावर ७२.९ टक्के लोकांनी होकारार्थी उत्तर दिले तर २०.९० टक्के रुग्णांनी ते जवळचे वाटत नसल्याचे सांगितले. ज्या रुग्णांना डॉक्टर जवळचे वाटले त्यांना त्यांच्याबद्दल नितांत आदर वाटला तसेच ते अतिशय हुशार आणि परिस्थिती सांभाळण्यास सक्षम असल्याची खात्री पटली. मात्र ज्या रुग्णांना डॉक्टर्स जवळचे वाटले नाही अशांना फक्त क्वचित एकदाच व्हिडियो कॉन्फरन्सिंग द्वारे संवाद करू शकले. उर्वरित वेळी त्यांचे ईसीजी व इतर वैद्यकीय अहवालांची अंतरावरील डॉक्टरांशी देवाणघेवाण झाली. यात ६.२० टक्के लोकांनी या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. ते अशिक्षित होते शिवाय त्यांना भाषेच्या मर्यादा होत्या. तथापि, शहरातील डॉक्टरांशी केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यांच्याशी रुग्णांचे चांगले भावबंध तयार झाले. डॉक्टरांना मॉनिटरवर बघण्यात रस असल्याचे रुग्णांनी सांगितले. म्हणूनच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यांना विशेष समाधान मिळाले. दूरवैद्यक डॉक्टरांमुळे रुग्णांशी जवळीक निर्माण होण्याचा फायदा होत असल्यास व्हिडियो कॉन्फरन्सिंग हे दूरवैद्यक पुरवण्याचे चांगले माध्यम आहे. रुग्ण व दूरवैद्यक डॉक्टर यांच्यातील निकटता दाखवण्यासाठी पुढे पाय चार्ट दिलेला आहे. १८.९३ टक्के रुग्ण खालच्या जातीत मोडणारे होते. अशा वेगळ्या प्रकारच्या उपचाराने संतुष्ट झाल्याचे मुलाखती दरम्यान सगळ्या रुग्णांनी सांगितले. त्यामुळे कोणत्याही प्रकारची भीती कमी होण्यास मदत झाली. दूरवैद्यकात डॉक्टरांनी रुग्णाला कोणताही स्पर्श करायची गरज नाही किंवा रुग्णाला शारीरिकदृष्ट्या तपासावे लागत नाही, केवळ व्हिडियो कॉन्फरन्सिंग किंवा तत्सम पद्धतींचा अवलंब यात केला जातो. त्यामुळे रुग्णांना कोणत्याही प्रकारची न्यूनगंडाची भीती असत नाही. एचआयव्ही किंवा एडस् असलेल्या रुग्णांनाही सामाजिक कलंकाला तोंड द्यावे लागते. संसर्गजन्य रोग असल्याने कोणीही त्यांना स्पर्श करू नये असे वाटत असते. म्हणूनच त्यांच्या आरोग्य समस्यांना ते एकटेच तोंड देतात. दूरवैद्यक निश्चितच अशा रुग्णांना मदत करते. एडस् झालेल्या रुग्णांवर उपचारार्थ वापरलेले अनेक दूरवैद्यक प्रकल्प यशस्वी व फायदेशीर ठरले आहेत.

६. **रुग्णांना इतरांकडून मदत घेण्याचे टाळता येईल –** दूरवैद्यकाची सोय नसलेल्या अनेक ठिकाणी रुग्णांना आजाराचे योग्य निदान न झाल्यामुळे वेगवेगळ्या डॉक्टरांना भेटत रहावे लागते. रोग्याला वेगवेगळ्या डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली उपचार व विविध चाचण्या करत रहाव्या लागतात. वैद्यकीय तपासण्या, चाचण्या व अनावश्यक बाबींमुळे रुग्ण जेरीस येतो. त्याचा वेळ, पैसा व श्रम वाया जातात. दुरवैद्यकाच्या मदतीने

रुग्णांना आरोग्य समस्यांविषयी त्वरित निदान होते. हे निदान बऱ्याच अंशी विश्वसनीय आणि उत्तम दर्जाचे असते. एकदा का रुग्णांना योग्य वेळी योग्य आजाराचे निदान केले गेले म्हणजे त्यांना डॉक्टर बदलत फिरावे लागत नाही. जवळपास सगळ्याच रुग्णांनी तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपयुक्त सल्ला मिळाल्याचे सांगितले.

७. **आरोग्य समस्यांची खुली अभिव्यक्ती –** दूरवैद्यकामध्ये वापरले जाणारे व्हिडियो कॉन्फरन्सिंग हे एक महत्त्वाचे तंत्रज्ञान आहे, ज्यायोगे रोग्यांना त्यांच्या आरोग्याच्या अडचणी मोकळेपणाने डॉक्टरांसमोर मांडता येतात व आजाराची स्थिती समजावून देता येते. रुग्ण व डॉक्टर यांच्यात नियमितपणे संवाद होत असल्यामुळे त्या दोघांत एक विश्वासाचे नाते निर्माण होते, ज्याचा उपयोग रुग्णाला त्याच्या समस्या मोकळेपणाने सांगण्यात होतो. हेच दूरवैद्यकाचे खरे यश आहे. जवळ जवळ ५६.२५ टक्के रुग्ण त्यांच्या डॉक्टरांशी मोठ्या प्रमाणावर मुक्तपणे चर्चा करू शकतात. ३१.२५ टक्के रुग्ण काही प्रमाणात दूरवैद्यक सल्ल्याने स्वत:ला अभिव्यक्त करू शकतात.

८. **जुन्या आरोग्य समस्यांवर उपचार करण्यासाठी रुग्णांना मदत –** कर्करोग, हृदयरोग, एडस् अशा दुर्धर, जुन्या आजार झालेल्या रुग्णांना दूरवैद्यकाने निश्चित मदत झाल्याचे संशोधनातून दिसून आले. या सगळ्या रोगांमध्ये तातडीने रोगाचे निदान होणे आवश्यक असते आणि दूरवैद्यकाच्या मदतीने योग्य वेळी योग्य निदान होते. या पाहणीतले सगळे रुग्ण ५१ ते ९० या वयोगटातले हृदयरोगी होते. एकाहत्तराव्या वर्षी हृदयाची शस्त्रक्रिया झालेला रुग्ण ८१व्या वर्षापर्यंत दूरवैद्यकाच्या सहाय्याने डॉक्टरांना नियमितपणे भेटत होता. अशा रुग्णांबरोबर केलेल्या मुलाखतींमध्ये दूरवैद्यकाने त्यांचा जीव वाचवल्याचे दिसून आले.

९. **तज्ज्ञ उपलब्ध नसलेल्या दुर्गम व ग्रामीण भागात दूरवैद्यकाद्वारे रुग्णांना मदत –** प्रादेशिक तफावत ही भारताची ओळख आहे. भारतात ग्रामीण तसेच शहरी भाग आहे. शहरी भागात, स्वास्थ्य निगेसाठी गुणवत्तापूर्ण आधारभूत संरचना आहेत तर ग्रामीण किंवा दुर्गम भागातील स्वास्थ्य निगा निम्न गुणवत्तेच्या आहेत. ही पाहणी शहरांपासून २८० किमी अंतरावर असलेल्या गावांमध्ये करण्यात आली. ग्रामीण भागात दवाखाने किंवा खासगी डॉक्टर्स नसतात. क्वचित असलेच तरी महागडे असतात. जुन्या चिवट आरोग्य समस्यांनी पछाडलेल्या रुग्णांना सेवा देण्यासाठी दूरवैद्यकाने जिल्हा रुग्णालयांन नक्कीच उत्तेजन दिले आहे. सरकारी रुग्णालयांमधील अत्यवस्थ रुग्ण सेवेने (सी.सी.यू.ने) ग्रामीण भागातील अनेक लोकांचे प्राण वाचवले आहेत. काही कारणांमुळे सिलीगुडीचे ग्रामीण रुग्णालय बाहेरून बंद करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्याचे कार्य सुरू असल्याचे संशोधनात दिसून आले. तिथले दूरवैद्यक यंत्र बंद असल्यामुळे बऱ्याचशा हृदयरोग्यांना समुपदेशनाशिवाय परतावे लागते. एका सुशिक्षित तरुणाने विनम्रपणे दूरवैद्यक सल्लागार डॉ. देवी प्रसाद शेट्टी यांना पत्र लिहून हा विभाग पुन्हा सुरू करण्याची विनंती केली. दूरवैद्यकाद्वारे अनेकांचा जीव वाचवला असून त्याने मृत्यूदर कमी झाल्याचे या प्रकरण अध्ययनातून दिसून आले. त्याने रुग्णांच्या आरोग्याची स्थिती सुधारण्यासही मदत झाली. दुर्गम ग्रामीण भागातील दूरवैद्यक विभाग रुग्णांना त्यांच्या आरोग्याच्या समस्या सोडवण्याकरता गुणवत्तापूर्ण उपचार देण्यासाठी आवश्यक असल्याचे मत डॉक्टरांनी व्यक्त केले.

१०. **वापरण्यास सोपे –** दूरवैद्यक समुपदेशन अत्यंत सोपे आहे. जवळपास ७० टक्के रुग्णांना दूरवैद्यक वापरावयास सोपे वाटले. त्यापैकी केवळ ३० टक्के रुग्णांनी या प्रश्नाचे उत्तर दिले नाही, तरीही जवळपास सर्व रुग्ण अशा प्रकारच्या उपचार पद्धतीने समाधानी होते. दूरवैद्यकाचे डॉक्टरांना होणारे

फायदे, दूरवैद्यक तंत्रज्ञ, समाज, राष्ट्र व जग. कोणत्याही नवीन तंत्रज्ञानाचे फायदे अभ्यासण्यासाठी विविध पातळ्यांवर ते पडताळून बघावे लागतात. महा-विशेषता रुग्णालयातून देण्यात आलेल्या सल्ल्यांमुळे नुकत्याच एमबीबीएस झालेल्या डॉक्टरांचा आत्मविश्वास वाढला असल्याचे संशोधनात दिसले. दूरवैद्यकामुळे वैद्यक व परावैद्यक कर्मचाऱ्यांना त्यांच्या शंका विचारण्यास व खुल्या चर्चांना वाव मिळतो. दूरवैद्यक तंत्रज्ञ ज्ञान, नैपुण्य व अधिक अर्थार्जन प्राप्त करतात. दूरवैद्यकाच्या वापराने सार्वजनिक-खाजगी भागीदारीला चालना मिळते. डॉक्टर्स, तंत्रज्ञ व संचालक या सगळ्यांनीच दूरवैद्यक प्रकल्प सार्वजनिक स्वास्थ्य निगा कार्यक्रमाचा भाग म्हणून विकसित व विकसनशील देशांमध्ये वापरण्यात यावा असे मत व्यक्त केल्याचे संशोधन सांगते. ते समुदाय व राष्ट्राच्या अभिवृद्धी व विकासासाठी आवश्यक आहे.

११. **नवी वैद्यकीय संस्कृती व नीतीशास्त्राच्या उदयास मदत –** वैद्यकीय नीतीशास्त्र व करिष्मा यांची आरोग्याच्या क्षेत्रात प्रभावी भूमिका असते हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. दूरवैद्यक सल्लागारांकडे करिश्मा, समर्पण वृत्ती आणि व्यावसायिक नीतीशास्त्र असे गुण असल्यामुळे रुग्ण डॉक्टरांबद्दल समाधानी होते आणि कनिष्ठ डॉक्टरही त्यांना चांगला प्रतिसाद देत होते. म्हणूनच नीतीशास्त्राची तत्त्वे, व्यावसायिकता आणि समर्पण वृत्ती यांसह नव्या वैद्यक संस्कृतीतून आरोग्य विकास पर्यायाने राष्ट्र व समाजाचा विकास घडवून आणता येतो.

**दूरवैद्यकाचे आकलन**

या सर्वेक्षणातून ९५ टक्के रुग्णांना आपल्यावर दूरवैद्यक तंत्राद्वारे अंतरावर असलेले डॉक्टर्स उपचार करीत असल्याची कल्पना होती. ते अशिक्षित असले तरी त्यांच्यावर मॉनिटर सारख्या तंत्रज्ञानातून उपचार होत असल्याची माहिती होती. दूरवैद्यक तंत्रज्ञ व डॉक्टर यांना दूरवैद्यक हे एक उदात्त कार्य आहे व त्यामुळे सामाजिक विकास होण्यास मदत होते असे वाटले. जवळपास सगळ्यांनी सांगितले की दूरवैद्यक समुपदेशन ही त्यांच्या जुन्या आरोग्य समस्यांसाठी अत्यंत फायदेशीर उपचार पद्धती ठरली. विशेषत: ग्रामीण व दुर्गम भागातील गरीब लोकांना, जिथे चांगली इस्पितळे उपलब्ध नाहीत व ज्यांची आपल्या उपचारावर पैसे खर्च करण्याची ऐपत नाही, अशांना हे प्रकर्षाने वाटले. आश्चर्य म्हणजे ७७.०१ टक्के रुग्णांना स्वास्थ्य निगेसाठी वापरण्यात येणारे हे तंत्रज्ञान म्हणजे चमत्कार वाटला. ८०.४६ टक्के रुग्णांना दूरवैद्यक तंत्रज्ञान एखाद्या जादूप्रमाणे वाटले. याचा स्पष्ट अर्थ असा आहे की आयसीटी चा वापर करून आरोग्यसेवांमध्ये आश्चर्यकारक बदल करता येतील. भारतीय समाज बहुतांश अंधश्रद्धा असताना तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्यात उपचारासाठी नव्या तंत्रज्ञानाविषयीची गरज निर्माण होते. ग्रामीण भागात राहणाऱ्यांपैकी बरेचसे अशिक्षित असले आणि टेलिमेडिसीन हा शब्द त्यांना उच्चारता येत नसला तरीही त्यांना असे वाटले हे विशेष आहे.

३. **दूरवैद्यक वापराविषयी रुग्णांमधील समाधानाची पातळी –** संशोधन सर्वेक्षणात स्पष्ट केले की, १०० टक्के रुग्णांनी दूरवैद्यक समुपदेशनवर समाधानी असल्याचे सांगितले. तर ७० टक्के रुग्णांनी खूप समाधानी असल्याचे म्हटले.

**दूरवैद्यकांच्या वापराबद्दल डॉक्टरांना वाटणारे समाधान/असमाधान**

| समाधानाची पातळी | वारंवारता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १४ | ९३ |
| नाही | – | – |
| प्रतिसाद नाही | १ | ७ |
| **एकूण** | **१५** | **१००** |

अंदाजे २६.०४ टक्के रुग्णांनी अत्युत्तम आणि २७.०८ टक्के रुग्णांनी दूरवैद्यकावर बऱ्यांपैकी समाधानी असल्याचे म्हटले. मात्र कोणीही हे तंत्रज्ञान क्वचित कधीतरी ठीक किंवा अजिबात उपयुक्त नसल्याचे म्हटले नाही. ९७.९२ टक्के रुग्णांना बंगळुरूच्या महा-विशेषता दूरवैद्यक केंद्रात ग्रामीण रुग्णांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मिळणारे दूरवैद्यक समुपदेशन

आवडले. २.०८ टक्के रुग्णांना डॉक्टरांची वेळ मिळताना आलेल्या अडचणींमुळे संबंधित महा-विशेषता रुग्णालय आवडले नाही. त्यांनी सांगितले की, त्यांना डॉक्टरांची वाट बघत बराच वेळ लाईनवर रहावे लागले. पुष्कळदा त्यांना तांत्रिक अडचणींमुळेदेखील संपर्क साधता आला नाही. आश्चर्य म्हणजे ७२ टक्के रुग्ण दूरवैद्यक समन्वयन करून देणाऱ्या सरकारी सामान्य डॉक्टरांविषयी समाधानी होते, त्यांनी सरकारी रुग्णालयाच्या सीसीयूमध्ये चांगली वागणूक मिळाल्याचे सांगितले. त्याचबरोबर रुग्णांना महा-विशेषता रुग्णालयातील सामान्य डॉक्टरांबद्दल जिव्हाळा वाटला. जेव्हा रुग्णांना विचारण्यात आले की, प्रत्यक्ष डॉक्टरांशी भेटून उपचार घ्यायला आवडेल की दूरवैद्यकाद्वारे तेव्हा ५२.०८ टक्के रुग्णांनी दूरवैद्यक असे उत्तर दिले व १०.४२ टक्के रुग्णांनी प्रत्यक्ष डॉक्टरांना भेटण्यास पसंती दिली. १३.५४ टक्के रुग्णांना पारंपरिक घरी येऊन केलेली तपासणी बरी वाटते तर २३.९६ टक्के रुग्णांनी सगळ्या प्रकारचे उपचार चालतील असे सांगितले.

४. **दूरवैद्यकाच्या समुपदेशनाने मिळणाऱ्या समाधानाची विविध कारणे –** दूरवैद्यक समुपदेशनातून समाधान मिळण्याची कारणे रुग्णांना विचारण्यात आली. खालील तक्त्यात ती दर्शविण्यात आली आहेत.

दूरवैद्यक वापराने रुग्णांना त्यांच्या आरोग्याच्या समस्यांमधून पूर्णपणे आराम मिळाला, त्यांच्या समस्या त्यांना मांडता आल्या, व्यक्तिगत लक्ष मिळण्याची तरतूद असल्यामुळे शहरातील डॉक्टरांशी चांगले संबंध प्रस्थापित करता आले. असे या निरीक्षणातून दिसून आले. त्यांनी पुढे असेही सांगितले की त्यांना संवाद करताना कोणत्याही अडचणी आल्या नाहीत व दूरवैद्यक त्यांच्या आरोग्याच्या समस्या सोडवण्याचे माध्यम असल्याची त्यांची खात्री पटली.

**दूरवैद्यक वापराने रुग्णांना मिळालेल्या समाधानाची कारणे**

| समाधानाची कारणे | टक्केवारी |
|---|---|
| वापरास सोपे | ७०.८४ |
| आरोग्याच्या समस्यांपासून पूर्ण आराम | ७८.१३ |
| आरोग्य समस्यांचे मुक्त आविष्करण | ८७.५० |
| व्यक्तिगत लक्ष मिळण्याची तरतूद | ६२.५० |
| दूरवरच्या डॉक्टरांची समज | ८८.५५ |
| आरोग्य समस्यांबद्दल बोलताना कोणतीही अडचण नसणे | ७८.१२ |
| दूरवैद्यक केंद्राबद्दल समाधान | ४८.९६ |
| आरोग्य समस्यांची उकल | ६४.५८ |

### निष्कर्ष

कर्नाटक दूरवैद्यक प्रकल्पाच्या विश्लेषणाने स्वास्थ्य निगा संशोधनाच्या बाबतीत अद्याप न चोखाळलेल्या मार्गांचा उलगडा होणे शक्य झाले. रुग्णांची सामाजिक वैशिष्ट्ये व दूरवैद्यकाचा वापर यांचा अगदी जवळचा संबंध असल्याचे या निरीक्षणातून स्पष्ट झाले. भारतासारख्या शहरी-ग्रामीण असंतुलनाने ग्रासलेल्या व प्रचंड बहुविधता असलेल्या विकसनशील देशामध्ये दूरवैद्यक हे सर्वोत्तम लागू पडणारे औषध असल्याचे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. भारतासारख्या जातीआधारित समाजात दूरवैद्यक कोणत्याही भेदभावाशिवाय सगळ्यांपर्यंत पोहचू शकते. अनुसूचित जाती, जमाती, महिला, अल्पसंख्याक, अपंग इत्यादींना त्यांच्याबाबतीत मानवी हक्कांची पायमल्ली झाल्याचा अनेकदा अनुभव येतो. दूरवैद्यक ही भारतासारख्या देशात अतिशय अनुकूल अशी उपचार पद्धती आहे, आणि सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांमध्ये त्याचा समावेश करून घेतल्यास आरोग्य विकास व पर्यायाने राष्ट्राचा विकास साधता येईल. भारतातील आरोग्याचे चित्र बदलायचे झाल्यास वेळ व खर्चाची बचत करणाऱ्या, आयुष्य वाचवणाऱ्या दूरवैद्यक प्रकल्पांचा अंतर्भाव करून घेणे अत्यावश्यक ठरेल. अशा प्रकारच्या कल्पक तंत्रज्ञानाचा वापर भारतातील आरोग्य क्षेत्रात केला तर एक दिवस इतर देश भारताकडे आदर्श म्हणून

बघतील. सार्वजनिक आरोग्य विभागात अशा प्रकारच्या नव्या तंत्रज्ञानाचा वापर स्वास्थ्य निगेत करून घेण्यात पुढाकार घेतला तर जागतिक आरोग्य संघटनेने उद्घोषित केलेले सर्वांसाठी आरोग्याचे लक्ष्य २०२० पर्यंत पूर्ण होऊ शकते. तसेच खाजगी रुग्णालयांच्या सहयोगाने त्यात आणखी सुधारणा घडवून आणता येतील. तंत्रज्ञानाविषयी शंका घेण्यापेक्षा, सहकार्य, सहयोग, सांघिक कार्य आणि परस्पर विश्वासाच्या आधारावर राष्ट्राचे आरोग्य अवलंबून आहे हे समजण्याची वेळ आली आहे. सरकारी इस्पितळे, खाजगी इस्पितळे, अशासकीय संघटना, सामाजिक कार्यकर्ते, विद्वान, संशोधक या सगळ्यांनी एकत्र येऊन नव्या वैद्यकीय संस्कृतीची सुरुवात केली पाहिजे. अलिकडच्या काळातील माहिती व संपर्क तंत्रज्ञानाच्या यांत्रिक लाभातून हे प्राप्त करता येईल. दूरवैद्यक प्रकल्प समाधानकारक, वेळ तसेच आयुष्य वचावणारे उपकरण असल्याचे संशोधनाने सिद्ध झाले आहे. म्हणूनच दूरवैद्यक समुपदेशनाला उदात्त उपक्रम असल्याचे बऱ्याचं जणांनी म्हटले आहे. अर्थात म्हणूनच चांगली स्वास्थ्य निगा उपलब्ध नसलेल्या ग्रामीण भागात त्याची गरज जास्त आहे. स्वत:वर उत्तम वैद्यकीय उपचार करणे न परवडणाऱ्या गरीब जनतेसाठी दूरवैद्यक अत्यावश्यक उपचार पद्धती आहे. त्यात प्रचंड क्षमता आहे. भरमसाठ लोकसंख्या असलेल्या, वेगाने वाढणाऱ्या भारतासारख्या देशात, सगळ्याच कोपऱ्यांमध्ये रुग्णालये उघडणे कठीण आहे, परंतू सगळया रुग्णालयांमध्ये दूरवैद्यक जोडणी करणे सुचवण्यात आल्यास प्रत्येकाला त्याच्या आरोग्य समस्यांसाठी चांगले उपचार मिळू शकतील. एके काळी विकास व सुधारणांसाठी भारत विकसित देशांकडे बघत असे. मात्र आता २१व्या शतकात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या मदतीने इतर विकसित देश स्वास्थ्य निगेचे प्रतिमान म्हणून भारताकडे बघतात. सरकारकडून आर्थिक, नैतिक आणि इतर पाठींबा मिळाल्यास अत्याधुनिक माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या मदतीने शून्यातून उत्कृष्ट देश घडविता येतो, हेच ह्यावरून सिद्ध होते.

**शिफारशी**

रुग्णांची समाजशास्त्रीय वैशिष्ट्ये व दूरवैद्यकाच्या उपयोगकर्त्यांचे दृष्टीकोन ह्यांचा सखोल अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, दूरवैद्यक व समाजशास्त्रीय वास्तव ह्यांचा जवळचा संबंध आहे. त्यावरून असे सुचवावेसे वाटते की, आरोग्यसेवेच्या कर्नाटक प्रतिमानासारखे दूरवैद्यक प्रकल्प हे सार्वजनिक आरोग्याचे कार्यक्रम समजण्यात यावे आणि भारताच्या सर्व राज्यातून ते राबविण्यात यावेत. त्यातून ग्रामीण क्षेत्रातील सार्वजनिक इस्पितळे आणि खाजगी इस्पितळे ह्यांची भागीदारी निर्माण होऊ शकेल व त्यातून देशाचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल. माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानात खूप काही घडविण्याची संभावना आहे आणि म्हणूनच सर्वांच्या स्वास्थ्यासाठी त्याचा वापर करायला हवा. आरोग्याच्या क्षेत्रात तर हे तंत्रज्ञान चमत्कार घडवून आणू शकते. जगातील ह्या विषयावरील पहिल्या आचार्य पदवीसाठी सादर केलेल्या ह्या संशोधनाने हे दाखवून दिले आहे की, विसाव्या शतकातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाने फार मोठे बदल घडविणे शक्य आहे. ह्या तंत्रज्ञानाचा वापर करून साधा एम बी बी एस डॉक्टर ह्रदयरोग, कर्करोग किंवा कोणत्याही जुनाट रोगाच्या रुग्णांचे जीव वाचवू शकतो. डिजिटल व आरोग्यक्षेत्रातील अंतर मिटविण्यास त्याची मदत होऊ शकते. डॉक्टर रुग्णांवर प्रेम करतात आणि त्यांच्या आरोग्याविषयी दक्ष असतात अशा नव्या वैद्यकीय संस्कृतीचा त्यातून विकास होऊ शकतो. त्यामुळे डॉक्टर अधिक निष्ठावान व व्यावसायिक बनू शकतात. इस्रो ही ख्यातनाम संस्था ह्यासाठी आवश्यक उपग्रह जोडणी पुरविण्यास तयार आहे हेही आपण ध्यानात घेतले पाहिजे. दूरवैद्यक परामर्शासाठी प्रत्यक्ष इंटरनेट जोडणीचा वापर करता येतो. त्यामुळे दूरवैद्यक प्रकल्प हे ग्रामीण व तालुका पातळीवरील इस्पितळातून राबवले जाऊ शकतात. व्हिडीओकॉन्फरन्सींगचाही त्यासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग करता येतो. त्यामुळे दर्जेदार आरोग्य सेवा जेथे उपलब्ध नाहीत अशा ग्रामीण व सुदूर क्षेत्रात आरोग्याचा विकास निश्चितच होऊ शकेल.

*(**डॉ. सुजाता वॉरियर** या ट्रॉम्बे शिक्षण संस्थेच्या एन. जी. आचार्य व मराठे कॉलेज येथे समाजशास्त्र विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका आहेत.)*

**संपर्कासाठी मेल :**

avsujata@gmail.com

# आपल्याला माहित आहे का ?

## भारत आणि नेदरलॅन्ड दरम्यान रुबेला लस विकसन सामंजस्य करार

भारत सरकारच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत, जैवतंत्रज्ञान विभागातील केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या तसेचं उत्तर प्रदेश मधील बुलंद शहर स्थित 'धोला' या प्रयोगशाळेत मिसेल्स-रुबेला ही लस विकसीत करतील. यासाठी नेदरलॅन्डच्या ट्रान्सलेशनल व्हॅक्सीनोलॉजी (इंट्रा व्हाक) ही सरकारी संस्था तांत्रिक सहाय्य करेल. या करारांतर्गत इतर लसी आणि जैविके यांच्या विकासासाठी लागणारे सहकार्य डी.बी.टी संशोधन संस्थेकडून परिक्षण करण्यात येईल.

नेदरलॅन्डच्या आरोग्य, कल्याण आणि क्रीडा क्षेत्रांतर्गत, येणारी इंट्रा वाक ही संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर लस विकसित करण्यासाठी नावाजलेली आहे आणि तिला तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाचा दीर्घ इतिहास आहे. भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागांतर्गत (विज्ञान व तंत्रज्ञान) कार्यरत बिबकॉलने जैवतंत्रज्ञान विभागाच्या सहाय्याने मेसेल्स-रुबेला लसीच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षमता वाढविणाऱ्या प्रवासाला आरंभ केला आहे.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी सांगितले की, या सहकार्याने मेसेल्स - रुबेलाचे आणि गरज असलेल्या इतर उच्च प्रतीच्या लसीचे बुलंदशहर उ.प. मध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यात येईल आणि त्यामुळे देशातील शेकडो मुले अशा भयावह आजारांपासून वाचतील. पोलिओ उच्चाटनानंतरच्या काळात मेसेल्स मम्पस-रुबेला सारख्या रोगांचे उच्चाटन / नियंत्रण करणाऱ्या लसीवर भर असेल, असेही त्यांनी एका कार्यक्रमात सांगितले.


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ________________ date ________

Name (in block letters) : ________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ________________

________________

________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**DD किंवा MO Editor Yojana च्या नावे काढावा.**

# आपल्याला माहित आहे का ?

## डिजीटल इंडिया — वाढते सायबर गुन्हे रोखण्यासाठी एक जागरुक पाऊल

सरकारी कामकाजातील दिरंगाई, निर्णय प्रक्रियेतील शिथिलता आणि विचारांमध्ये नसलेली स्पष्टता, सर्वसामान्यांच्या त्रासाला कारणीभुत असल्याने, याच कारणांसाठी सरकारी विभागांवर ओढण्यात येणाऱ्या ताशेऱ्यांना कंटाळुन का होईना सरकारी पातळीवरील हे चित्र बदलण्याबरोबरचं प्रत्येक गाव इंटरनेटच्या माध्यमातून जोडण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'डिजीटल इंडिया'चा शुभारंभ केला.

गावातील प्रत्येक पंचायत हायस्पीड इंटरनेटच्या माध्यमातून जोडण्याचा प्रयत्न या योजनेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे या डिजीटल क्रांती अंतर्गत, भ्रष्टाचार, निर्मूलन, पारदर्शक व्यवहार, कार्यक्षम प्रशासन आणि श्रीमंत-गरीबांतील दरी दूर करणे याचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या संकल्पनेमुळे देशात या क्षेत्रात ४.५ लाख कोटींची गुंतवणूक झाली असून त्यातून १८ लक्ष नोकऱ्या उपलब्ध होतील. परंतु याबरोबरचं वाढत्या सायबर गुन्ह्यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यामुळे सायबर सुरक्षा हा देशाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात येणार आहे यासाठी ४.५ लाख कोटींची गुंतवणूक करण्यात येणार असून आवश्यक कागदपत्रे, सर्टीफिकेटस्, क्लाऊडवर उपलब्ध करण्यात येतील. भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये ही सेवा देण्यात येईल.


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, East Block-IV, Level-VII, R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. : 011-2610 0207, 011-2610 5590; Fax : 011-2617 5516**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054**, Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

# INSTITUTE OF CIVIL SERVICES

## स्पर्धा परीक्षांच्या दर्जेदार मराठी मासिकांचा मानबिंदू




**राजपथ**
अॅ । कॅ । ड । मी
MPSC ★ UPSC
*Login to Excellence & Success*

प्रा. मीता चौधरी
(संस्थापक-संचालिका, राजपथ अॅकॅडमी, पुणे )

### 'राजपथ टाइम्स'ची वैशिष्ट्ये

- MPSC / UPSC सह सर्व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त मार्गदर्शक
- ताज्या घडामोडींच्या अभ्यासपूर्ण, विस्तृत माहितीचे लेख
- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, प्रादेशिक, घडामोडींचा परामर्श
- राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, विज्ञान, पर्यावरण सह चौफेर, अद्यावत मुद्दयांचा समावेश.
- आगामी MPSC / UPSC परीक्षांचे मार्गदर्शन व सराव.
- अधिकाऱ्यांची प्रेरणादायी यशोगाथा.
- आकर्षक, सुस्पष्ट व सुयोग्य मांडणी.
- विद्यार्थ्यांचे व्यासपीठ

| MPSC राज्यसेवा परीक्षा | PSI/STI/ASST | UPSC बॅच |
|---|---|---|
| • एकत्रित बॅच - पूर्व +मुख्य + मुलाखत<br>• कालावधी - एक वर्ष<br>• विषय : GS, CSAT, मराठी, इंग्रजी , सामान्य अध्ययन पेपर १ ते ४<br>• बॅचचे माध्यम - मराठी तसेच इंग्रजी माध्यमाची बॅच उपलब्ध.<br>• बॅचेस सुरू : २५ जुलै,१० ऑगस्ट | • एकत्रित बॅच - पूर्व + मुख्य + शारीरिक चाचणी + मुलाखत<br>• कालावधी - एक वर्ष<br>• विषय : अभ्यासक्रमानुसार मराठी, इंग्रजी, सामान्य अध्ययन<br>• बॅचचे माध्यम - मराठी<br>• बॅचेस सुरू : २५ जुलै,१० ऑगस्ट | • एकत्रित बॅच- पूर्व +मुख्य + मुलाखत<br>• कालावधी - ११ महिने<br>• विषय - CSAT, सामान्य अध्ययन, निबंधलेखन<br>• वैकल्पिक विषय- भूगोल, राज्यशास्त्र, इतिहास<br>• माध्यम - मराठी व इंग्रजी<br>• बॅचेस सुरू: २५ जुलै,१० ऑगस्ट |

* नोकरी व कॉलेज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वीकएण्ड बॅचेस उपलब्ध

**आगामी पुस्तके:**
* कायदे व संक्षिप्त राज्यघटना * चालू घडामोडी १०वी आवृत्ती


**राजपथ**
अॅ । कॅ । ड । मी
MPSC ★ UPSC
*Login to Excellence & Success*

## राजपथ अॅकॅडमी

मुख्य कार्यालय :
२६, आप्पा बळवंत चौक,
अनमोल पुस्तकालयासमोर, पुणे.

शाखा :
लोकमान्य टिळकभवन, बी-विंग दुसरा मजला,
५६८ नारायण पेठ, केसरीवाड्याजवळ, पुणे.

फोन नं. :
०२०-३२४२ २२२१, ८००७९०९१६०
Email : info@rajpathacademy.com

www.rajpathacademy.com   90287 56551   follow us on f - rajpath academy

Yojana Marathi (Monthly) July 2015

RNI No. MAHMAR/2009/32156
Reg No. G/NMD/137/2013-15

Published Date : 12th July, 2015
Date of Posting : 12th July, 2015




Editor - **Bhavana Gokhale**

Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.